
जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय
e paper www.janmadhyam.com












# वकील संघ निवडणुकीत १३४९ जणांचे मतदान

## २३ उमेदवारांचे भवितव्य पेटीत बंद, आज मतमोजणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा वकील संघाची द्विवार्षिक निवडणुक गुरुवार, ३० एप्रिल रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. सकाळी १० वाजता सुरू झालेल्या मतदान प्रक्रियेत एकूण १५७६ मतदारांपैकी सायंकाळी ५ वाजेपर्यंत १३४९ अधिवक्त्यांनी मतदानाचा हक्क बजावत





निवडणुकीला गती दिली. या निवडणुकीत २३ उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद झाले आहे.संपूर्ण निवडणूक प्रक्रिया निर्णय अधिकारी ॲड. रामपाल कलंत्री यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. त्यांना सहायक निवडणूक अधिकारी म्हणून ॲड. शोएब खान यांच्यासह ॲड. धर्मेश सागलानी, ॲड. चिराग नवलानी आणि अन्य सदस्यांनी सहकार्य केले. शुक्रवारी, १ मे रोजी मतमोजणी होणार आहे. मतदान प्रक्रिया सुरळीत आणि जलद पार पाडण्यासाठी १५ टेबलची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच दिव्यांग व ज्येष्ठ अधिवक्त्यांसाठी स्वतंत्र रांग ठेवण्यात आली होती, ज्यामुळे त्यांना प्राधान्याने मतदानाची संधी मिळाली. मतदान बॅलेट पेपरद्वारे घेण्यात आले असून विविध पदांसाठी स्वतंत्र बॅलेट पेपर तयार करण्यात आले होते.

**इतर पदांसाठी उमेदवार-** सचिव पदासाठी ॲड. गिरीष धर्माले, ॲड. सचिन पंडितकर; उपाध्यक्ष (ओबीसी) पदासाठी ॲड. आर. एस. भोयर, ॲड. नरेंद्र गजभिये, ॲड. मो. नुरानी, ॲड. धनंजय तोटे; उपाध्यक्ष (महिला आरक्षण) पदासाठी ॲड. भावना ठाकरे (खंडारे), ॲड. भूमिका वानखडे, ॲड. प्राजक्ता वरुडकर; कार्यकारिणी सदस्य (सर्वसाधारण) पदासाठी ॲड. श्रीधर अकोलकर, ॲड. प्रवीण आठवले, ॲड. रोहन बाकडे, ॲड. आदित्य गुप्ता, ॲड. अक्षय खराटे, ॲड. रमेश रंगारकर, ॲड. गौरव राऊत आदी उमेदवार रिंगणात आहेत. कार्यकारिणी सदस्य (महिला) पदासाठी ॲड. रश्मी दौसकर, ॲड. शीतल गहान, ॲड. सुरभी कुर्वे, ॲड. रुतुजा पाथरे या निवडणूक लढवत आहेत. ग्रंथालय सचिव पदासाठी ॲड. सुमित शर्मा यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने ते बिनविरोध निवडून आले आहेत. त्यांच्या निवडीची औपचारिक घोषणा १ मे रोजी मतमोजणीदरम्यान केली जाणार आहे.

### अध्यक्षपदासाठी तिरंगी लढत

अध्यक्षपदासाठी ॲड. प्रशांत देशमुख, ॲड. अनिल विश्वकर्मा आणि ॲड. धनराज साधवानी हे रिंगणात असून, वकील वर्तुळात देशमुख आणि विश्वकर्मा यांच्यात थेट लढत असल्याची चर्चा आहे.

# आनंदवाडी नजीक वनविभागाच्या गार्डनमध्ये भीषण आग

## अग्निशमन व नागरिकांच्या प्रयत्नांनी टळला मोठा अनर्थ





तिवसा/प्रतिनिधी:- आनंदवाडी परिसरातील वन विभागाच्या गार्डनमध्ये गुरुवार (दि.२९) सकाळी सुमारे ११ वाजताच्या सुमारास भीषण आग लागल्याची घटना घडली. सुरुवातीला लहान स्वरूपात असलेली आग वाऱ्याच्या वेगामुळे अल्पावधीतच भडकली आणि विक्राळ रूप धारण केले.

आगीचे लोट जवळील वस्तीकडे सरकल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. नागरिकांची मोठ्या प्रमाणात तारांबळ उडाली होती. घटनेची माहिती मिळताच तिवसा व चांदुर रेल्वे येथील अग्निशमन दल, वन विभागाचे पथक तसेच आपदा मित्र तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करण्यात आले. पाण्याचे बंब व इतर आवश्यक साधनांचा वापर करून अखेर आग आटोक्यात आणण्यात यश आले. स्थानिक नागरिकांनीही मोठ्या प्रमाणात मदत करत बचावकार्यात सहभाग घेतला.

या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही मात्र वनक्षेत्रातील झाडे व झुडपे मोठ्या प्रमाणात जळून खाक झाली आहेत. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून उष्णतेची लाट किंवा मानवी निष्काळजीपणा यामुळे आग लागल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

या वेळी अग्निशमन विभागाचे कर्मचारी सुरज शापामोहन, वैभव बोकडे, अंकित, चेतन यावले, राहुल आसोडे, वनपाल सोमेश्वर घोरमाडे, आपदा मित्र संदीप दाहाट तसेच स्थानिक नागरिकांनी आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले.आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नाही.

**नागरिकांची मागणी-** आनंदवाडी परिसर तीनही बाजूंनी वनक्षेत्राने वेढलेला असून मोठ्या प्रमाणात झाडे व झुडपे आहेत. वाढत्या उन्हामुळे येथे वारंवार आग लागण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे वन विभागाने ठोस प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी स्थानिक नागरिकांची मागणी आहे.

## आमदार प्रवीण तायडे यांच्या वाढदिवसानिमित्त

# विविध सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन



**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर मतदारसंघाचे आमदार प्रवीण तायडे यांच्या वाढदिवसानिमित्त आज १ मे रोजी मतदार संघात विविध सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन भारतीय जनता पक्षाच्या शहर व ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांच्या वतीने करण्यात आले आहे. तसेच सायंकाळी ६ वाजता अचलपूर नाका येथील महालक्ष्मी सेलिब्रेशन हॉलमध्ये आमदार प्रवीण तायडे यांचा वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन सुद्धा करण्यात आलेले आहे .यामध्ये प्रमुख उपस्थिती म्हणून माजी खासदार नवनीत राणा , भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रभुदास भीलावेकर ,नागराध्यक्ष रूपाली माथने ,भाजप पक्षाचे ज्येष्ठ नेते प्रमुख गजानन कोल्हे ,अशोक बनसोड, पुरुषोत्तम लकडे ,डॉ. कमल अग्रवाल ,डॉ.आशिष भन्साली ,माजी नगराध्यक्ष विलास काशीकर, रमेश मडघे, तालुकाध्यक्ष शंकर मालखेडे, शहराध्यक्ष कुंदन यादव ,ओम प्रकाश दीक्षित, जिल्हा उपाध्यक्ष मुरली माकोडे ,विशाल काकड, रुपेश ढेपे ,हर्षद धुळे आदी प्रामुख्याने उपस्थित राहणार आहे.

आज १ मे रोजी सकाळपासून अचलपूर मतदारसंघातील आमदार प्रवीण तायडे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून यात प्रामुख्याने बोरगाव पेठ येथे विद्यार्थ्यांना शाळा उपयोगी वस्तूचे वितरण केले जाणार आहे. त्यानंतर अचलपूर उपजिल्हा रुग्णालय येथे रुग्णांना जेवणाचे वितरण सुद्धा केले जाणार आहे. आणि विसावा वृद्धाश्रम मध्ये सुद्धा वृद्ध मंडळी सोबत आमदार प्रवीण तायडे यांचा वाढदिवस साजरा केला जाणार आहे तसेच रक्तदान शिबिर ,स्वच्छता अभियानाचा सुद्धा समावेश आहे.महालक्ष्मी सेलिब्रेशन हॉलमध्ये संपन्न होणारे अभिष्टचिंतन सोहळ्यामध्ये समर्थकांनी आमदार प्रवीण तायडे यांचा वाढदिवस निमित्त शाल , श्रीफळ, पुष्पगुच्छ न आणता शालेय साहित्य आणून सामान्य विद्यार्थ्यांच्या मदतीचा हात म्हणून एक स्तुत्य उपक्रमाचे सुद्धा आयोजन करण्यात आलेले आहे .या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थितीत राहण्याचे आव्हान भाजप पक्ष ग्रामीण , शहर तर्फे करण्यात आले आहे .

# एसपी विशाल आनंद यांची बदली निकेतन कदम नवे एसपी

## मेळघाट विकास व पोलिस सुविधांवर विशेष भर



**अमरावती/प्रतिनिधीः-** गृहविभागाकडून गुरुवारी सायंकाळी राज्य पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या. त्यानुसार अमरावतीचे पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांची धुळे जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षकपदी बदली करण्यात आली आहे. तसेच अमरावतीच्या पोलीस अधीक्षकपदाची जबाबदारी नागपूर येथील पोलीस उपायुक्त निकेतन कदम यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. दरम्यान, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांची परभणी येथे पोलीस अधीक्षक म्हणून बदली करण्यात आली असून, त्यांच्या जागी दत्ता लक्ष्मण तोटेवाड यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

डॅशिंग अधिकारी म्हणून ओळख असलेले निकेतन कदम यांच्या अमरावती ग्रामीण पोलीस अधीक्षकपदी नियुक्तीमुळे ग्रामीण व आदिवासी भागातील पोलिस यंत्रणेला नवी ऊर्जा मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे. नागपूर शहरात डिसीपी म्हणून कार्यरत असताना त्यांनी प्रभावी प्रशासन, शिस्तबद्ध कार्यपद्धती आणि जनसंपर्काच्या माध्यमातून वेगळी ओळख निर्माण केली होती.

मेळघाटातील धारणीसह आदिवासी भागात काम करण्याचा दांडगा अनुभव असलेल्या कदम यांनी ग्रामीण भागातील पोलिस ठाण्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देणार असल्याचे स्पष्ट केले. विशेषतः दुर्गम भागात कार्यरत पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांचा प्रश्न प्राधान्याने सोडवण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा केला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

'मेळघाटातील धारणीसारख्या दुर्गम भागात पोलिस अधिकारी व कर्मचारी अत्यंत कठीण परिस्थितीत सेवा बजावत आहेत. त्यांना मूलभूत सुविधा व सुरक्षित निवास उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. यासाठी शासन स्तरावर ठोस प्रयत्न केले जातील,' असे कदम यांनी नमूद केले.

# सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते महाराष्ट्र दिनी मुख्य शासकीय ध्वजारोहण




**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र राज्याचा ६७ वा स्थापना दिवस समारंभ १ मे रोजी साजरा करण्यात येत आहे. यानिमित्त ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय समारंभ शुक्रवार, १ मे रोजी सकाळी ८ वाजता पोलीस मुख्यालय अमरावती शहर परेड मैदान येथे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी केले आहे.

# आंतरराष्ट्रीय बिबट्या दिन ३ मे रोजी

## संवर्धनासाठी जनजागृती रॅलीचे आयोजन

**अमरावती/प्रतिनिधीः-** आंतरराष्ट्रीय बिबट्या दिन (३ मे) निमित्त The Bigcats Conservation Trust, India आणि Ecosystem Earth International Magazine यांच्या संयुक्त विद्यमाने बिबट्याच्या (Panthera pardus fusca) संवर्धनासाठी जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात येणार आहे. बिबट्या हा सर्वोच्च भक्षक असून तो शिकार प्रजातींचे नियंत्रण करून परिसंस्थेचा समतोल राखतो. त्यामुळे जैवविविधता, वनांचे आरोग्य आणि मानवी जीवनासाठी आवश्यक नैसर्गिक साधनसंपत्ती टिकून राहण्यास मदत होते. या रॅलीचा उद्देश वैज्ञानिक जनजागृती करणे, गैरसमज दूर करणे आणि मानव–बिबट्या सहअस्तित्वाला प्रोत्साहन देणे हा आहे. संस्था




वन्यजीव जनजागृती, अधिवास संवर्धन आणि समुदाय सहभागावर कार्यरत असून भविष्यात शाश्वत सहअस्तित्व निर्माण करण्याचे ध्येय ठेवते. नागरिकांनी या उपक्रमात सहभागी होऊन संवर्धनाला पाठिंबा द्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# माजी राज्यमंत्री बच्चु कडू रायगडावर छत्रपतींचे दर्शनाला जाणार

## अमरावतीवरुन निघणार चांदुरबाजार-अचलपूरसाठी जल्लोष रॅली

**अचलपूर/प्रतिनिधीः-** प्रहार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी शिवसेना पक्षात प्रवेश घेतला असुन विधान परिषदेसाठी उमेदवारी सुध्दा दाखल करण्यात आली आहे. त्यामुळे प्रहार कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण झाला असुन बच्चु कडु यांनी नामनिर्देशनपत्र दाखल केल्यानंतर आज ३० एप्रिल ते २ मे २०२६ दरम्यान रायगड, नागपूर व अमरावती जिल्ह्यातील विविध ठिकाणी जल्लोष रॅली काढुन स्वागत करण्यात येणार आहे.

आज ३० एप्रिल रोजी रात्री १२.३० वाजता रायगड किल्ल्याच्या पायथ्याशी पाचाड येथे मुक्काम, त्यानंतर १ मे सकाळी ११ वाजता रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांना वंदन व माँ जिजाऊ यांच्या समाधीचे दर्शन, त्यानंतर दुपारी १.३० वाजता मुंबईकडे प्रस्थान करून सायंकाळी ८ वाजता नागपूर विमानतळावर आगमन, तर रात्री ११.३० वाजता कुरळपूर्णा येथे दाखल होणार आहे. आणि २ मे रोजी



सकाळी ११ वाजता बेलोरा येथे ग्रामदैवत व आई-वडिलांच्या समाधीचे दर्शन, दुपारी ३ वाजता अमरावती येथे आगमन होणार असून ३.३० वाजता जल्लोष रॅलीला प्रारंभ होईल. ही रॅली अमरावती चांदूरबाजार-अचलपूर-परतवाडा मार्गे काढण्यात येणार आहे. रॅलीदरम्यान अंबादेवी मंदिरात महाआरती, जयस्तंभ येथे महात्मा गांधी पुतळ्याचे पूजन, ईर्वीन चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याचे पूजन, गाडगेनगर येथे संत गाडगेबाबा पुतळ्याचे पूजन तसेच चांदूरबाजार येथे संत गुलाबबाबा मंदिरात व छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याचे पूजन करण्यात येणार आहे .अचलपूर व परतवाडा शहरात विविध प्रमुख मार्गावरून रॅलीचे आयोजन करण्यात आले असून परतवाड्यात नृसिह मंदिर, टिळक चौक, सदरबाजार व जयस्तंभ येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन होणार आहे. दौऱ्याची सांगता परतवाडा येथील गुलाबबाग मध्ये होणार आहे.

# अंजनगाव सुर्जी नगरपरिषद निविदा प्रक्रियेत नगराध्यक्षांचा हस्तक्षेप

## -व्हायरल व्हिडीओमुळे नगराध्यक्षाच्या कार्यशैलीवर प्रश्नचिन्ह

## -भाजप आरोग्य सभापतीसह कंत्राटदाराचा आरोप, -निविदेची पावती फाडण्यास कर्मचा-यांचा नकार

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** नगरपरिषद अंजनगाव सुर्जीच्या आरोग्य विभागातील निविदा प्रक्रियेत नगराध्यक्षांनी हस्तक्षेप केल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. याबाबत संबंधित कत्राटदार नितीन दातीर, तसेच आरोग्य सभापती प्रवीण नेमाडे यांनी लेखी तक्रार सादर केली असून,यामुळे अंजनगाव सुर्जी नगरपरिषद प्रशासनात खळबळ उडाली आहे.

तक्रारीनुसार, दि.१६ ऑगस्ट २०२६ रोजी वृत्तपत्रात (२०२५-२६) आरोग्य विभागाशी संबंधित निविदा प्रक्रिया बाबत जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. निविदा दाखल करण्याची अंतिम तारीख ३०.०४.२०२६ अंतिम होती. मात्र, ही प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने न पार पडता त्यात वरिष्ठ स्तरावरून हस्तक्षेप करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. विशेषतः नगराध्यक्षांनी थेट हस्तक्षेप करून निविदा प्रक्रियेवर प्रभाव टाकल्याचे तक्रारीत नमूद आहे. तक्रारदारांच्या तक्रारीनुसार निविदा प्रक्रियेत नगराध्यक्षांनी मी सांगितल्याशीवाय कुणाचीही पावती फाडू नये असे आदेश नगराध्यक्षानी दिल्याचे संबधीत कर्मचा-याने कंत्राटदारास



सांगितले . तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार नगराध्यक्ष आपल्या मर्जीतीलच कंत्राटदाराला संबंधित कंत्राट देऊ इच्छितात यावरून निदर्शनास येते. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार वृत्तपत्राच्या जाहिरातीनुसार खुल्या निविदा मागितल्या असल्यावर सुद्धा नगराध्यक्षांनी निविदा प्रक्रियेत हस्तक्षेप केल्याने कंत्राटदारासह, आरोग्य सभापती प्रवीण नेमाडे यांनी सुद्धा नगराध्यक्षाच्या निवेदा प्रक्रियेतील हस्तक्षेपावर आक्षेप घेतला असून मुख्याधिकाऱ्यांना तशा स्वरूपाचे पत्र त्यांनी दिले आहे.तक्रारदाराने या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, तसेच निविदा प्रक्रिया पुन्हा पारदर्शक पद्धतीने राबवावी, अशी मागणी केली आहे.

दरम्यान, या आरोपांमुळे नगरपरिषद प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, याबाबत नगराध्यक्ष व संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका काय असणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

आपली पावती फाडल्या जात नाही हे कत्राटदाराच्या लक्षात आल्यावर त्यांनी याबाबतचा व्हिडीओ तयार केला असून यामध्ये संबाधित कर्मचारी थेट नगराध्यक्षाला फोन लावत असल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला असल्याने प्रकरण आणखीनच तापले आहे.

सदर कामे ही छोटी व महत्वाची आहेत, क्वालिटी काम झाले पाहिजे. अनियमितता आढळ्यास फेरविचार करण्यात येईल.

**- अविनाश गायगोले, नगराध्यक्ष**

मी सध्या समीतीसोबोत अमरावतीला आहे.सोमवारी आल्यानंतर त्यावर काय निर्णय घेता येईल ते पाहू असे मत मुख्याधिकारी विजय लोहकरे यांनी व्यक्त केले.

# पोक्सो गुन्ह्यात आरोपीची निर्दोष मुक्तता

**खल्लार/प्रतिनिधीः-** पो. स्टे. अंजनगाव सुर्जी यांनी दि.३ जून १८ रोजी, गुन्हा क्रं.१३२/२०१८ नुसार आरोपी नामे सै. सुजास सै. जमशीद उर्फ बब्बू रा. अंजनगाव सुर्जी याचे विरुद्ध भारतीय दंड संहिताचे कलम ३७६, ३७७, ५०६ तसेच पोक्सो कायद्याच्या सहकलम ४ आणि ६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.





खटल्या दरम्यान बचाव पक्षाने आरोपी सुजास विरुद्ध पुरावा न आल्यामुळे दर्यापूर येथील जिल्हा व सत्र न्यायाधिश कोर्ट क्रं. १ यांनी दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर आरोपी विरुद्ध दोष सिद्द करण्याकामी अपुरे पुरावे असल्यामुळे आरोपीची निर्दोष मुक्तता केली आहे.

आरोपीचे वतीने ॲड रियाज एच घाणीवाले व ॲड आर ए नावेद यांनी कामगिरी पाहिली.

# जनमाध्यम

अकोला | वाशिम | बुलडाणा

एक प्रतिष्ठित सवय

epaper : janmadhyam.com
mail : jmakola.thakur@gmail.com

■ शुक्रवार १ मे २०२६ ■ मुल्य ३.०० ■ पृष्ठे ४


## खरीप हंगामाचे यशस्वी नियोजन करून जल जीवन मिशन व आरोग्य योजनांची योग्य अंमलबजावणी करावी - पालकमंत्री

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासन, लोक प्रतिनिधी आणि शासन यांचा समन्वय अत्यंत महत्त्वाचा असून, जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी सर्व विभागांनी जबाबदारीने व वेळेत काम करावे, असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले.

त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत खरीप हंगाम, जल जीवन मिशन तसेच विविध आरोग्य योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना बियाणे, खते, सिंचन सुविधा व कृषी निविष्ठांची वेळेत उपलब्धता सुनिश्चित करावी, तसेच पीक नियोजनाबाबत प्रभावी मार्गदर्शन देण्यात यावे, अशा सूचना संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या. शेतकऱ्यांना कोणतीही अडचण भासू नये आणि खरीप हंगाम यशस्वी व्हावा, यासाठी प्रशासनाने पूर्ण तयारीत राहावे, असेही स्पष्ट करण्यात आले.जिल्ह्यातील पाणी टंचाई परिस्थितीचाही आढावा घेऊन नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा व्हावा यासाठी टँकर व्यवस्था, जलस्त्रोत पुनर्भरण, विहिरी व बोअरवेलची पातळी तसेच ग्रामीण व शहरी भागातील पाणी उपलब्धता यावर विशेष भर देत आवश्यक उपाय योजना तातडीने राबविण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी यावेळी दिल्या.जल जीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या कामांचा आढावा घेत प्रत्येक घरापर्यंत स्वच्छ व सुरक्षित पिण्याचे पाणी पोहोचविण्याचे उद्दिष्ट वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रलंबित कामांना गती देण्याचे निर्देश देण्यात आले. आरोग्य क्षेत्रातील आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना तसेच महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना यांच्या अंमलबजावणीचा आढावाही घेण्यात आला. पात्र लाभार्थ्यांना



योजनांचा लाभ वेळेत मिळावा, उपचार प्रक्रियेत अडथळे येऊ नयेत आणि अधिकाधिक नागरिकांनी या योजनांचा लाभ घ्यावा, यासाठी जनजागृती वाढविण्यावर भर देण्यात आला. बैठकीस खासदार संजय देशमुख, खा. अनुप धोत्रे, विधानसभा सदस्य आ. श्याम खोडे, आ. सईताई डाहाके, आ. अमित झनक, तसेच विधानपरिषद सदस्य आ. भावना गवळी, आ. वसंत खंडेलवाल, आ. किरणराव सरनाईक, आ. बाबुसिंग महाराज राठोड यांच्यासह जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, जिल्हा पोलिस अधीक्षक अनुज तारे, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान आणि उपवनसंरक्षक अभिजित वायकोस यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी यंत्रणा प्रमुखांची उपस्थिती होती. सादरीकरण जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरीफ शाहा, कार्यकारी अभियंता अजिंक्य वानखेडे व जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे व जिल्हा समन्वयक डॉ. पंकज बोरकर यांनी केले.उपस्थित खासदार व आमदार यांनी मांडलेल्या प्रश्नांवरील अनुपालन अहवाल संबंधित अधिकाऱ्यांनी यावेळी सादर केला. बैठकीदरम्यान विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी आपल्या योजनांचा प्रगती अहवाल सादर केला. यावर पालकमंत्र्यांनी आवश्यक त्या सूचना देत काही योजनांमध्ये सुधारणा करण्याचे निर्देश दिले. स्थानिक अडचणी त्वरित सोडवून विकासकामे सुरळीत पार पाडावीत, असेही त्यांनी नमूद केले. जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, सर्व विभागांचे वरिष्ठ अधिकारी व संबंधित यंत्रणांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.वाशिम जिल्ह्याच्या प्रगतीसाठी शासन कटिबद्ध असून, विकासकामांना अधिक गती देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. किरणराव सरनाईक, आ. बाबुसिंग महाराज राठोड यांच्यासह जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, जिल्हा पोलिस अधीक्षक अनुज तारे, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान आणि उपवनसंरक्षक अभिजित वायकोस यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी यंत्रणा प्रमुखांची उपस्थिती होती. सादरीकरण जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरीफ शाहा, कार्यकारी अभियंता अजिंक्य वानखेडे व जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे व जिल्हा समन्वयक डॉ. पंकज बोरकर यांनी केले.उपस्थित खासदार व आमदार यांनी मांडलेल्या प्रश्नांवरील अनुपालन अहवाल संबंधित अधिकाऱ्यांनी यावेळी सादर केला.बैठकीदरम्यान विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी आपल्या योजनांचा प्रगती अहवाल सादर केला. यावर पालकमंत्र्यांनी आवश्यक त्या सूचना देत काही योजनांमध्ये सुधारणा करण्याचे निर्देश दिले. स्थानिक अडचणी त्वरित सोडवून विकासकामे सुरळीत पार पाडावीत, असेही त्यांनी नमूद केले.जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, सर्व विभागांचे वरिष्ठ अधिकारी व संबंधित यंत्रणांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. वाशिम जिल्ह्याच्या प्रगतीसाठी शासन कटिबद्ध असून, विकासकामांना अधिक गती देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## स्पेलिंग बी स्पर्धेचा जिल्हास्तरीय सोहळा उत्साहात संपन्न

## २४ गुणवंत विद्यार्थ्यांसह ५० हून अधिक शिक्षकांचा गौरव

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्हा परिषद वाशिमच्या शिक्षण विभाग (प्राथमिक) आणि ओपन लिंक फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय स्पेलिंग बी स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा (दि. २८) उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट भाषिक कौशल्याचे प्रदर्शन करत २४ विद्यार्थ्यांनी विजेतेपद पटकावले.

स्थानिक सुशीलाताई जाधव महाविद्यालय येथे पार पडलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान होते. प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार अ‍ॅड. विजयराव जाधव



उपस्थित होते. यावेळी शिक्षणाधिकारी संजय ससाणे, प्राचार्य डॉ. भीमराव महाजन, उप शिक्षणाधिकारी गजानन डाबेराव, बिरादार, ओपन लिंक फाउंडेशनचे विभागीय व्यवस्थापक रघुनाथ वानखडे यांची उपस्थिती होती. या स्पर्धेत इयत्ता १ ली ते ८ वीच्या सुमारे २०५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी भाषेची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. अंतिम फेरीत निवड झालेल्या २४ विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. यावेळी अध्यक्षीय भाषणात सीईओ अर्पित चौहान म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या मनातील इंग्रजी भाषेची भीती दूर करण्यासाठी अशा स्पर्धा अत्यंत उपयुक्त ठरतात. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता, पुढील वर्षीही या स्पर्धेचे अधिक व्यापक स्वरूपात आयोजन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**शिक्षणाधिकारी यांनी विद्यार्थ्यांशी साधला संवादः**

कार्यक्रमादरम्यान शिक्षणाधिकारी संजय ससाणे यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या इंग्रजी शब्दसंपत्ती, उच्चार आणि आत्मविश्वासाची चाचपणी केली. विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करत त्यांनी सातत्यपूर्ण सरावाचे महत्त्व अधोरेखित केले. स्पेलिंग बी सारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये भाषिक कौशल्य विकसित होण्यास मोठी मदत होते, असे त्यांनी सांगितले. तसेच विद्यार्थ्यांनी भीती न बाळगता आत्मविश्वासाने इंग्रजी भाषा शिकावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

या सोहळ्यात विद्यार्थ्यांबरोबरच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या ५० हून अधिक शिक्षकांचा तसेच विविध शाळांचा विशेष सन्मान करण्यात आला. विनोबा ॲपच्या माध्यमातून व जिल्हा परिषदेच्या शेष निधीतून घेण्यात आलेल्या सराव परीक्षांमधील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शाळा, उपक्रमशील केंद्रप्रमुख, 'पोस्ट ऑफ द मंथ' विजेते, तसेच शालेय परिपाठ व 'लायब्ररी बॅग' उपक्रमांतर्गत पुरस्कारांचे वितरणही करण्यात आले. कार्यक्रमास विद्यार्थ्यांसह जिल्ह्यातील सर्व गट शिक्षणाधिकारी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बुद्ध पौर्णिमेनिमित्त आज डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात बुद्ध वंदना व धम्म ध्वजारोहण

■ प्रतिनिधी | वाशिम ■



जगाला शांती, करुणा आणि मैत्रीचा संदेश देणारे महाकारुणिक तथागत गौतम बुद्ध यांच्या २५७० व्या जयंतीनिमित्त वैशाख पौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर शुक्रवार, दिनांक १ मे रोजी सकाळी ८.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात बुद्ध वंदना व धम्म ध्वजारोहणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमास सर्व समाजबांधवांनी सकाळी ८.३० वाजता मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे. कार्यक्रमानंतर आनंदवाडी येथील बुद्ध विहार येथेही सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.उत्सव समितीचे अध्यक्ष तेजराव वानखेडे, सचिव शेषराव पिराजी धांडे, कार्याध्यक्ष दौलतराव हिवराळे, कोषाध्यक्ष अरविंदकुमार उचित, सहसचिव दिगंबर साबळे, रमेश भगत, संघटक शेषराव मेश्राम व सहसंघटक माधवराव जमदाडे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी नागरिकांना कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

## शेतातील तुषार सिंचन संच अज्ञाताने जाळलं कृषी साहित्य धोक्यात आल्याने शेतकरी चिंतेत

■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यातील कारखेडा येथील शेतकरी विवेक सुभाष परांडे यांच्या शेतातील तुषार सिंचन संच अज्ञात व्यक्तीने जाळल्याची घटना घडली आहे. यामुळे परांडे यांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागले असून शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण आहे.

शेतात मोठ्या प्रमाणात राखेचा ढीग पडला आहे. जळून खाक झालेल्या तुषार सिंचन संचाचे अवशेष आणि पाईपचे जळालेले तुकडे स्पष्टपणे दिसत आहेत. सभोवतालची जमीनही जळल्यामुळे काळी पडली आहे.विवेक परांडे यांनी शेतीसाठी मोठ्या कष्टाने



आणि कर्ज काढून तुषार सिंचन संच बसवला होता. पाणीटंचाईच्या काळात पिकांना पाणी देण्यासाठी हा संच अत्यंत महत्त्वाचा होता. मात्र अज्ञात व्यक्तीने रात्रीच्या सुमारास हा संच पेटवून दिल्याने तो पूर्णपणे जळून नष्ट झाला आहे.तुषार सिंचन संचामुळे कमी पाण्यात जास्त क्षेत्र ओलिताखाली आणणे शक्य होत होते. आता हा ३० पाईप १२ नोझलांचा संच जळाल्याने येणाऱ्या हंगामातील पिकांचेही नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. 'मेहनतीने उभा केलेला संच एका क्षणात जाळला. आता नवीन संच बसवण्यासाठी पुन्हा पैशांची जुळवा जुळव करावी लागेल,' असे विवेक परांडे यांनी सांगितले. पोलिस तपासाची मागणा या घटनेमुळे शेतकरी वर्गात संताप व्यक्त होत असून अज्ञात आरोपींवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. शेतातील कृषी साहित्याची सुरक्षितता धोक्यात आल्याने रात्री गस्त वाढवावी, अशीही मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात आली आहे.

## आ.सईताई डहाके यांच्या पाठपुराव्याला यश ;चणा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देणारा निर्णय लवकरच

■ प्रतिनिधी | कारंजा ■

महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येला वाशिमजिल्हा नियोजन समितीची बैठक संपन्न झाली यात वाशिम जिल्हाच्या विकासा संदर्भात महत्वाचे निर्णय झालेत.

या बैठकी दरम्यान आमदार सईताई डहाके यांनी चणा उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताचा मुद्दा पालक मंत्र्यासमोर उपस्थित केला व अत्यंत ठामपणे आणि प्रभावीपणे मांडला. चणा खरेदीवरील मर्यादा वाढविण्याची त्यांनी केलेली जोरदार मागणी प्रशासनाला गांभीर्याने घ्यावी



लागली. त्यांच्या या सक्रिय भूमिकेमुळे बैठकीतच सकारात्मक हालचाली सुरू झाल्या.या प्रश्नाचे महत्त्व ओळखून माननीय पालकमंत्र्यांनी तात्काळ संबंधित यंत्रणेशी चर्चा केली. त्यानंतर पनन मंत्र्यांशी थेट दूरध्वनीद्वारे संवाद साधण्यात आला. या चर्चेचा परिणाम म्हणून अवघ्या तीन दिवसांत चणा खरेदी मर्यादा वाढविण्याचा निर्णय घेतला जाणार असल्याचे आश्वासन देण्यात आले आहे.या निर्णयामुळे जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून त्यांच्या उत्पादनाला योग्य भाव आणि न्याय मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. सध्याच्या परिस्थितीत हा निर्णय शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी सातत्याने लढा देणाऱ्या सईताई डहाके यांचे हे प्रयत्न निश्चितच उल्लेखनीय असून त्यांच्या नेतृत्वातून विकासाला आणि शेतकरीहिताला नवे बळ मिळत आहे.

## आरोग्यवर्धनी उपकेंद्र चंडिकावेश येथे टि.बी मुक्त अभियानात संशयीत ७५ रुग्णाची तपासणी

■ प्रतिनिधी | वाशीम ■

नागरी प्रा.आ.केंद्र वाशिम अंतर्गत आरोग्यवर्धनी उपकेंद्र चंडिकावेश येथे.मा डॉ ठोंबरे , डॉ कावरखे, डॉ परभणकर, डॉ चव्हाण मॅडम, व डॉ ढोले सर व डॉ नाईक सर (चज)यांचे मार्गदर्शनाखाली टि बी मुक्त भारत अभियान २.० अंतर्गत दि ३० एप्रील २०२६ ला आयुष्यमान आरोग्य शिबिरघेण्यात आले.

यामध्ये एकूण ७५ संशयित



क्षयरुग्णाची हँड हेल्ड एस-रे मशीन द्वारे क्ष-किरण तपासणी करण्यात आली.

यावेळी क्ष-किरण तंत्रज्ञ ी सैबेवार ,वरिष्ठ क्षयरोग पर्यवेक्षक मंगेश पिंपरकर व रामेश्वर सोनुने सर,वैद्यकीय अधिकारी डॉ. नाईक सर, आरोग्य सेवक संदेश भगत, आरोग्य सेविका श्रीमती पूजा राऊत, कर्मचारी वर्ग अभिषेक तिखे, प्रशांत थोरात व स्थानिक सर्व आशा स्वयंसेविका तसेच मनीष जाधव इ. उपस्थित होते. सदर शिबिराचे नियोजन वरिष्ठ क्षयरोग पर्यवेक्षक मंगेश पिंपरकर सर व रामेश्वर सोनुने सर अमोल शिंदे ढइकत यांनी केले.


### जाहीर सुचना

दि. २९.४.२०२६

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते कि, आमचे पक्षकार, हे राजेश रमेशलाल फुलवानी यांचे मालकीचे व ताब्यातील मौजे शिवापूर, ता. जि अकोला येथील शेत सर्व्हे क्र १०४, गट क्र ३००, पैकी मंजूर लेआऊट मधील, खुला लेआऊट प्लॉट क्र ३६, क्षेत्रफळ १६२.७५ चौ मी. ज्यास चतुःसिमा पूर्वेसः लेआऊट प्लॉट क्र ३७, पश्चिमेसः- लेआऊट प्लॉट क्र ३५, उत्तरेसः लेआऊट प्लॉट क्र ३१, दक्षिणेसः ६ मीटर रुंद लेआऊट रोड. अशी मालमत्ता विकत घेत आहेत, व तसा करार झालेला आहे.तरी सदरच्या वर उल्लेखीत मालमत्ते बाबत कोणाचा कोणत्याहि प्रकारचा हक्क, संबंध, गहाण, अगर बोजा असल्यास, किंवा काही हीतसंबंध असल्यास, खालील पत्त्यावर कागद पत्रा सहित, आज पासुन सात (७) दिवसांचे आत भेटावे. अन्यथा कोणाचा कोणत्याहि प्रकारचा उजर चालणार नाहि याचि कृपया नोंद घ्यावि.


**शिशिर अरविंद देशपांडे**
**अधिवक्ता,**
**दिवाणी न्यायालयासमोर,**
**स्टेशन रोड, अकोला मोबाईल क्र ९८२३०९१३७७**

### Tender Notice

The Noel Multipurpose Education Society, Akola invites sealed tenders from Contractors for the construction of School Building (G+4), Proposed Built-Up Area- 2995.64 Sq. M. at Noel School Behind S.T. Workshop, Kaulkhed Road, Akola- 444004 Maharashtra. The tender should be submitted latest by 7th May 2026 at the school address mentioned above between 8 to 10 am. The Noel Multipurpose Education Society, Akola reserve the rights to accept or reject any tender without assigning any reasons or incurring any liability whatsoever.

Date : 01-05-2026

President
The Noel Multipurpose Education Society, Akola



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १५४ ■ शुक्रवार, १ मे २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## महाराष्ट्रात आधुनिक विषाणू निदान प्रयोगशाळांचे जाळे उभारण्याचा महत्वपूर्ण निर्णय- मुख्यमंत्री

**मुंबई जनमाध्यम :** राज्यात आरोग्य क्षेत्रातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून विषाणू निदान प्रयोगशाळांचे जाळे उभारण्याचा महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आला आहे.

या संदर्भात १३ जुलै २०१७ रोजी तत्कालीन केंद्रीय आरोग्यमंत्र्यांना पत्र लिहून केंद्र शासनाच्या आरोग्य संशोधन विभागामार्फत देशभर उभारण्यात येणाऱ्या १५० अत्याधुनिक विषाणू प्रयोगशाळांच्या उपक्रमाचे स्वागत करत महाराष्ट्राला योग्य वाटा देण्याची मागणी करण्यात आली होती. या पत्रात देशाच्या मध्यवर्ती ठिकाण असलेल्या नागपूर आणि राज्याची राजधानी मुंबई येथे राज्यस्तरीय प्रयोगशाळा तसेच राज्यातील विविध विभागांतील दहा वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रयोगशाळा मंजूर करण्याची विनंती करण्यात आली होती.

केंद्र शासनाने या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे राज्यस्तरीय विषाणू प्रयोगशाळा मंजूर केली. याशिवाय इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर तसेच अकोला, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, धुळे आणि मिरज येथील वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रयोगशाळा उभारण्यास मान्यता देण्यात आली.



या योजनेसाठी केंद्र शासनाकडून एकूण २९ कोटी २१ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला. या निधीतून अत्याधुनिक यंत्रसामग्री खरेदी करून प्रयोगशाळा कार्यान्वित करण्यात आल्या. कोविड-१९ महामारीच्या काळात या प्रयोगशाळांनी आरटी-पीसीआर चाचण्यांद्वारे मोठी भूमिका बजावली.

याशिवाय, या प्रयोगशाळांमुळे विविध विषाणूजन्य आजारांचे निदान करणे शक्य झाले आहे. आतापर्यंत कोविड-१९ (३७,२१,१५४), डेंग्यू (८८,३२७), चिकनगुनिया (३९,८१७), झीका (३,९२३), स्क्रब टायफस (७,०९१), इन्फ्लुएंझा (२७,५३६), एचबीव्ही (१,५३,१८०), रोटाव्हायरस (६५१) अशा एकूण ४०,४१,६८९ रुग्णांची तपासणी करण्यात आली आहे.

या उपक्रमामुळे महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्थेला बळकटी मिळाली असून भविष्यात उद्भवणाऱ्या संसर्गजन्य आजारांशी लढण्यासाठी राज्य अधिक सक्षम झाले आहे.

## वर्धा पोलिसांच्या कामगिरीचा राज्यस्तरावर गौरव; ६ जणांना 'DGP सन्मानचिन्ह' जाहीर

**वर्धा जनमाध्यम :** महाराष्ट्र पोलीस दलातील उत्कृष्ट सेवा व उल्लेखनीय कामगिरीबद्दल दिल्या जाणाऱ्या 'पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह' (DGP Insignia) पुरस्कारासाठी सन २०२५ या वर्षी वर्धा जिल्हा पोलीस दलातील २ अधिकारी आणि ४ अंमलदारांची निवड झाली आहे. या निवडीमुळे जिल्हा पोलीस दलाच्या कार्याची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली आहे.




पोलीस महासंचालक कार्यालयाने प्रसिद्ध केलेल्या आदेशानुसार, सपोनि मंगेश भोयर (तळेगाव पोलीस स्टेशन), उपनिरीक्षक अमोल लगड (वाहतूक शाखा, वर्धा), सफौ भारत पिसुडे (हायवे ट्रॅफिक), पोहवा दिनेश बोथकर (सायबर पोलीस स्टेशन), सफौ सतीश दरवरे (देवळी पोलीस स्टेशन) आणि मपोशि सुनैना डोंगरे (पोलीस मुख्यालय, वर्धा) यांना त्यांच्या उल्लेखनीय सेवेबद्दल हा सन्मान जाहीर करण्यात आला आहे.

गुन्हे तपास, कायदा व सुव्यवस्था राखणे, वाहतूक नियंत्रण तसेच सायबर क्षेत्रातील तपासकामात या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत राज्यस्तरावर हा सन्मान प्रदान करण्यात येत आहे.

या सर्वांचा सत्कार आज १ मे रोजी सकाळी ८ वाजता पालकमंत्री पंकज भोयर यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. जिल्हा पोलीस अधीक्षकांनी या सर्वांचे अभिनंदन केले असून त्यांच्या कामगिरीमुळे इतर कर्मचाऱ्यांनाही प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

## ट्रॅक्टर ट्रॉलीला आग; अग्निशमन दलाच्या तत्परतेने मोठा अनर्थ टळला

**सेलू जनमाध्यम :** येथील नगरपंचायत घनकचरा केंद्राकडे जाणाऱ्या मार्गावर गुरुवारी दुपारी ट्रॅक्टर ट्रॉलीला अचानक आग लागून नुकसान झाल्याची घटना घडली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.



मिळालेल्या माहितीनुसार, प्रीतम पाटील (शेंडे) यांच्या शेतातील ट्रॅक्टर ट्रॉली घनकचरा प्रकल्पाजवळ उभी असताना दुपारी सुमारे चारच्या सुमारास अचानक धूर निघू लागला. काही क्षणांतच आगीने तीव्र स्वरूप धारण करत ट्रॉलीला वेढा घातला. या आगीत ट्रॉलीचे दोन्ही टायर जळून खाक झाले तसेच काही लोखंडी साहित्याचे नुकसान झाले. परिसरात धुराचे लोट पसरल्याने काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

घटनेची माहिती मिळताच सेलू नगरपंचायतीचे अग्निशमन पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. फायरमन हर्षल गोरखे, शुभम डोंगरे, प्रमोद रहांगडाले व सहाय्यक इमाम शहा यांनी तातडीने आग विझवण्याचे काम हाती घेतले. त्यांच्या प्रयत्नांमुळे आग लवकरच आटोक्यात आली.

वेळीच नियंत्रण मिळवल्यामुळे ट्रॅक्टरचे इंजिन तसेच परिसरातील इतर भाग आगीपासून सुरक्षित राहिले. अन्यथा मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता होती. दरम्यान, आग लागण्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून याबाबत अधिक तपास सुरू आहे.

## उन्हात भाजा, पावसात भिजा... आणि पेट्रोल भरा

### -आरती चौक पंपावरील निष्काळजीपणाचा कळस

**उन्हाळा असो की पावसाळा-नागरिकांची कायमचीच 'अग्निपरीक्षा'**

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील आरती चौक (इंदिरा गांधी चौक) येथील पेट्रोल पंपावर सुरू असलेली बेफिकीरी आता संतापाचा ज्वालामुखी ठरत आहे. ४५ ते ४७ अंशांच्या प्रचंड उष्णतेतही या पंपावर ग्राहकांसाठी साधे शेडसुद्धा उपलब्ध नसल्याने वाहनधारकांना भर उन्हात उभे राहून पेट्रोल भरावे लागत आहे. पेट्रोल भरण्याचा हा अनुभव म्हणजे नागरिकांसाठी अक्षरशः अग्निपरीक्षा ठरत आहे.



**-शेड नसल्याने वाहनधारकांची अक्षरशः परवड -प्रशासन, कंपनी आणि पंपमालक तिघेही बेजबाबदार**

विशेष म्हणजे, वर्धा शहरातील बहुतांश पेट्रोल पंपांवर ग्राहकांसाठी शेडची सुविधा उपलब्ध आहे. मात्र, या पंपावरच सातत्याने होत असलेले दुर्लक्ष अनेक प्रश्न निर्माण करत आहे. शहरात सगळीकडे सुविधा, मग इथेच का नाही,असा प्रश्न वाहनधारकांकडून उपस्थित होत आहे. उन्हाळ्यापुरतीच ही समस्या मर्यादित नाही. पावसाळा आला की परिस्थिती आणखी बिकट होते. मुसळधार पावसात भिजत उभे राहून पेट्रोल भरावे लागते, त्यामुळे नागरिकांची प्रचंड गैरसोय होते. काही वेळा तर महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना या त्रासाचा अधिक फटका बसतो.

या पंपावरील कर्मचारीदेखील दिवसभर उन्हात उभे राहून काम करत असल्याने त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. ग्राहक आणि कर्मचारी दोघेही त्रस्त असताना संबंधित प्रशासन, कंपनी आणि पंपमालक मात्र पूर्णतः बेजबाबदार असल्याचे चित्र दिसून येत आहे.

नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे संतप्त नागरिकांनी आता थेट इशारा दिला आहे , तात्काळ शेडची उभारणी करून मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल. एकीकडे शासन नागरिकांच्या सोयीसाठी विविध योजना राबवत असल्याचे सांगते, तर दुसरीकडे अशा प्रकारच्या निष्काळजीपणामुळे सामान्य माणसाला मूलभूत सुविधांसाठीही संघर्ष करावा लागत आहे.

**सुट्टीची सूचना**

आज शुक्रवार दि. १ मे महाराष्ट्र दिन असल्याने जनमाध्यम कार्यालयास सुट्टी असणार आहे. यामुळे उद्या दि, २ मे चा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, एजंट, जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.

**-व्यवस्थापक**

## आज पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्याहस्ते ध्वजारोहण

**वर्धा जनमाध्यम :** राज्याचे गृह (ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार व खनीकर्म राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या हस्ते दि.१ मे रोजी सकाळी ८ वाजता पोलिस कवायत मैदान येथे महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त शासकीय मुख्य ध्वजारोहण होणार आहे. नागरिकांनी कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी केले आहे.

## शेजाऱ्यांच्या वादातून परस्पर गुन्हे दाखल

**वर्धा : धोत्रा (रेल्वे):** येथे जागेच्या वादातून शेजाऱ्यांमध्ये झालेल्या भांडणाचे रूपांतर मारहाणीत होत दोन्ही बाजूंनी परस्पर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सावंगी (मेघे) पोलिस ठाण्यात या प्रकरणी दोन स्वतंत्र तक्रारी नोंदवण्यात आल्या असून पोलिस तपास सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, राजेंद्र महादेवराव राऊत यांचा घरकुलाच्या जागेवरून आकाश शंकरराव घोडाम व सविता घोडाम यांच्याशी वाद झाला. या वादातून घोडाम यांनी राऊत यांना काठीने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच वाहनाची तोडफोड केल्याचाही आरोप करण्यात आला आहे. दरम्यान, दुसऱ्या बाजूने आकाश घोडाम यांनीही तक्रार नोंदवत राजेंद्र राऊत व प्रीती राऊत यांनी त्यांच्यावर व त्यांच्या आईवर काठीने हल्ला करून जखमी केल्याचे म्हटले आहे. या घटनेमुळे काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी दोन्ही बाजूंवर गुन्हे दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

## वारली चित्रातून कष्टसंस्कृतीचा जिवंत आविष्कार

**सेलू जनमाध्यम :** १ मे 'महाराष्ट्र दिन' आणि 'आंतरराष्ट्रीय कामगार दिना'च्या निमित्ताने साकारलेल्या एका आकर्षक वारली चित्राने श्रमसंस्कृती, निसर्गाशी असलेले घट्ट नाते आणि ग्रामीण जीवनाचे सजीव दर्शन घडवले आहे. या कलाकृतीतून कष्टकरी जीवनाचे सौंदर्य आणि परंपरेची समृद्ध छटा प्रभावीपणे उलगडली आहे.



दीपचंद चौधरी विद्यालय, सेलू येथील कलाशिक्षक सुभाष जीवा राठोड यांनी ही कलाकृती साकारली असून, त्यांच्या रेखांकनात वारली कलेची पारंपरिक शैली आणि आधुनिक अभिव्यक्ती यांचा सुरेख संगम दिसून येतो. चित्रात शेतकरी, श्रमिक, निसर्गातील हालचाली, सण-उत्सव यांचे प्रतीकात्मक चित्रण करण्यात आले आहे.

या चित्रातून श्रमाचा सन्मान, एकात्मतेचा संदेश आणि ग्रामीण संस्कृतीचे जतन यांचा प्रभावी प्रत्यय येतो. विद्यार्थ्यांमध्ये कला आणि संस्कृतीबद्दलची जाण निर्माण व्हावी, तसेच कामगारांच्या योगदानाची जाणीव व्हावी, या उद्देशाने ही कलाकृती साकारण्यात आल्याचे राठोड यांनी सांगितले.

या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत असून, वारली कलेच्या माध्यमातून सामाजिक संदेश पोहोचवण्याचा हा प्रयत्न लक्षवेधी ठरत आहे.

## आरटीई प्रवेशाला वेग; १०२० विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित

### -३७ अर्ज नाकारले; ३१७ अर्जांची पडताळणी सुरू

**वर्धा जनमाध्यम :** शिक्षणाचा हक्क कायदा (आरटीई) अंतर्गत जिल्ह्यातील गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळांत प्रवेश देण्याची प्रक्रिया वेगाने पुढे सरकत आहे. ३० एप्रिलपर्यंत तब्बल १०२० विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केल्याची नोंद शिक्षण विभागाने घेतली आहे.

प्रवेश प्रक्रियेच्या प्रारंभी जिल्ह्यातील पात्र शाळांची नोंदणी करण्यात आली. त्यानंतर पालकांकडून ऑनलाईन अर्ज स्वीकारण्यात आले. सोडत प्रक्रियेनंतर निवड यादी व प्रतीक्षा यादी जाहीर करण्यात आली. सध्या कागदपत्रांची पडताळणी करून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रवेश दिला जात आहे.

शिक्षण विभागाच्या माहितीनुसार, विविध कारणांमुळे ३७ अर्ज नामंजूर करण्यात आले आहेत, तर ३१७ अर्जांची पडताळणी प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत प्रवेशाचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे.





आरटीईमुळे ग्रामीण व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची संधी उपलब्ध होत असल्याने पालकांचा प्रतिसादही उत्स्फूर्त दिसून येत आहे.

**यंदा १३८० जागांवर प्रवेश**

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी जिल्ह्यातील ११३ इंग्रजी माध्यमाच्या शाळांनी आरटीई अंतर्गत नोंदणी केली आहे. या शाळांमध्ये एकूण १,३८० जागांवर विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात आहे. त्यापैकी १०२० जागा भरल्या असून उर्वरित जागांसाठी प्रक्रिया सुरू आहे.

**तालुकानिहाय प्रवेश निश्चिती**


आर्वी : ९०, आष्टी : ४८, देवळी : १०६, हिंगणघाट : १६२, कारंजा : ६८, समुद्रपूर : ५४, सेलू : ११७, वर्धा : ३७५

जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
शुक्रवार १ मे २०२६
एक प्रतिष्ठित सवय

# पुढील ४८ तास राज्यासाठी अत्यंत धोक्याचे
# अवकाळीचं मोठं संकट, घराबाहेर पडू नका

## आयएमडीकडून हाय अलर्ट



**मुंबई/प्रतिनिधी** :राज्यात सध्या उष्णतेची लाट पहायला मिळत आहे. विदर्भ चांगलाच तापला आहे. विदर्भातल्या काही जिल्ह्याचं तापमान हे ४५ अंश सेल्सिअसवर पोहोचलं आहे. देशातील टॉप टेन उष्ण शहरांमध्ये महाराष्ट्रातील चार शहरांचा समावेश झाला आहे. विदर्भातील वर्धा, गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यामध्ये सरासरी तापमानात मोठी वाढ झाली आहे. तर शुक्रवारी देखील विदर्भातील नागपूर, वर्धा आणि अमरावती जिल्ह्यात हवामान विभागाकडून उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. विदर्भासोबतच मराठवाडा देखील चांगलाच तापला आहे. दरम्यान तापमान वाढल्यामुळे सध्या दुपारच्या वेळेस रस्त्यावर सर्वत्र शुकशुकाट दिसून येत आहे. नागरिक घराबाहेर पडणं टाळत आहेत.

मात्र उष्णतेमुळे हैराण झालेल्यांसाठी आता दिलासादायक बातमी आहे, ती म्हणजे पुढील ४८ तासांमध्ये तापमानात काही प्रमाणात घट होण्याची शक्यता आहे. तरी देखील नागरिकांनी आवश्यक ती काळजी घ्यावी असं आवाहन हवामान विभागाकडून करण्यात आलं आहे. पुणे वेधशाळेनं वर्तवलेल्या अंदाजानुसार पुढील ४८ तासांमध्ये तापमानात घट होऊन विदर्भासह उर्वरीत राज्यात तापमान हे ४० अंश सेल्सिअस ते ३८ अंश सेल्सिअसच्या आसपास राहण्याची शक्यता आहे.

दरम्यान जरी तापमानात घट होणार असली तरी दुसरीकडे पावसाच्या रुपाने महाराष्ट्रावर आणखी एक मोठं संकट आता येण्याची शक्यता आहे. हवामान विभागाकडून राज्यात पावसाचा इशारा देण्यात आला आहे. विदर्भात पुढील २४ तास उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. मात्र त्यानंतर २ मे पासून अवकाळी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. २ तारखेनंतर विदर्भात वादळी पावसाची शक्यता आहे. वर्धा, यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली या चार जिल्ह्यांना पावसाचा येलो अर्लट देण्यात आला आहे. या काळात महाराष्ट्रात बहुतांश जिल्ह्याचे तापमान ४० अंश सेल्सिअसच्या आसपास राहील अशी माहिती हवामान विभागाचे शास्त्राज्ञ एस. डी सानप यांनी दिली आहे. नागरिकांनी यावर विश्वास ठेवू नये, हवामान विभागाकडून अधिकृत माहिती दिली जात आहे, त्यावर विश्वास ठेवा असं आवाहनही यावेळी त्यांनी केलं आहे.

# 'प्रहार स्वतंत्र सामाजिक संघटना म्हणून काम करेल'
## बच्चू कडूंच्या प्रवेशानंतर शिंदेंनी केले स्पष्ट

**मुंबई/प्रतिनिधी** : बच्चू कडू यांची ओळख ही आंदोलनातून उभी राहिलेली आहे. शेतकरी कर्जमाफीसाठी काढलेले मोर्चे, दिव्यांगांसाठी उभारलेले आंदोलन, तसेच गोरगरीब, शोषित आणि पीडित घटकांसाठी सातत्याने रस्त्यावर उतरून लढा देत त्यांनी स्वतःची वेगळी छाप निर्माण केली.

बच्चू कडू यांच्या आंदोलनांमुळे सरकारला कर्जमाफीसारखे महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागले, असे शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले.

आंदोलन करणाऱ्यांना सत्तेबाहेर ठेवण्याची परंपरा मोडीत काढत एकनाथ शिंदे यांनी बच्चू कडू यांना शिवसेनेत घेत थेट विधान परिषदेची उमेदवारी देत, रस्त्यावरचा आवाज थेट निर्णयप्रक्रियेत आणण्याचा नवा राजकीय प्रयोग केल्याचे म्हटले जात आहे. एकनाथ शिंदेंनी बच्चू कडूंच्या लढाऊ स्वभावाचे कौतुक करत अन्यायाविरुद्ध लढा हा बाळासाहेबांच्या विचारांचा गाभा असल्याचे सांगितले.

आपले आणि बच्चू कडू यांचे विचार एकच आहेत, ते म्हणजे सर्वसामान्यांना न्याय देणे, असे स्पष्ट करत, सामाजिक लढ्याला राजकीय ताकदीची जोड देण्याची गरज अधोरेखित केली. मी एकदा शब्द दिला की तो पाळतो, असे एकनाथ शिंदे यांनी नमूद केले.



प्रहार स्वतंत्र सामाजिक संघटना म्हणून काम करेल

प्रहार संघटना स्वतंत्र सामाजिक संघटना म्हणून कायम राहणार असली तरी ती शिवसेनेशी संलग्न राहील. त्यामुळे रस्त्यावरची ताकद आणि सत्तेची ताकद एकत्र येऊन सामाजिक प्रश्न अधिक प्रभावीपणे मांडले जातील, असे चित्र निर्माण झाले आहे. बच्चू कडूंनीही हा प्रवेश केवळ उमेदवारीसाठी नसून विचारांच्या एकतेसाठी असल्याचे स्पष्ट केले.

दरम्यान, मुंबईत झालेल्या कार्यक्रमात बच्चू कडू यांनी शिवसेनेत प्रवेश करत आपली भूमिका स्पष्ट केली. प्रहार संघटना पुढेही स्वतंत्र सामाजिक संघटना म्हणून कार्यरत राहणार असली तरी राजकीय लढा शिवसेनेच्या माध्यमातून उभारला जाईल. शेतकरी, दिव्यांग, कष्टकरी, दलित, शोषित आणि गोरगरीबांच्या प्रश्नांसाठी अधिक प्रभावीपणे काम करण्यासाठी हा निर्णय घेतला. पुढील वाटचाल पूर्णपणे एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालीच असेल, असे बच्चू कडू यांनी सांगितले.

# एकाच झटक्यात तब्बल ९० राजीनामे, राष्ट्रवादीला सर्वात मोठा धक्का

## राजकारणात खळबळ!


**बुलढाणार/प्रतिनिधी** : विधानपरिषदेच्या निवडणुकीमुळे राज्यात राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. या निवडणुकीत आपल्याला तिकीट मिळावे म्हणून बरेच नेते आपापल्या पक्षातील नेतृत्त्वाची मनधरणी करण्याचा प्रयत्न करत होते. परंतु अनेक बड्या नेत्यांना डावलून काही नशीबवान नेत्यांनाच या निवडणुकीचे तिकीट मिळाले. त्यामुळे आता नाराजीनाट्य सुरू झाले आहे. या नाराजीनाट्याचा पहिला धक्का राष्ट्रवादी पक्षाला बसला आहे. तब्बल ९० सामूहिक राजीनामे आल्याने या पक्षाला जबर धक्का बसला आहे.

नेमका कोणी राजीनामा दिला?

मिळालेल्या माहितीनुसार बुलढाणा जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्षातील प्रमुख ९० पदाधिकाऱ्यांनी आपल्या पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला. या सर्व पदाधिकाऱ्यांनी पालकमंत्री मकरंद पाटील यांच्याकडे आपले राजीनामे सोपवले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष एड नाझेर काझी यांना विधानपरिषद उमेदवारी न मिळाल्याने या पदाधिराऱ्यांनी आपल्या सदस्यात्वाचे राजीनामे दिले आहेत. काझी हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या अल्पसंख्याक विभागाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष आहेत.

### ९० पदाधिकाऱ्यांचे सामूहिक राजीनामे

गेल्या अनेक वर्षांपासून विधानपरिषदेवर जाण्याची त्यांची इच्छा आहे. परंतु यावेळीही त्यांना संधी देण्यात आली नाही.



म्हणूनच आपली नाराजी व्यक्त करत ९० पदाधिकाऱ्यांनी आपल्या पक्षाच्या सदस्यत्त्वाचा राजीनामा दिला आहे. आज बुलढाण्याती राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांची बैठक होणार होती. परंतु या सामूहिक राजीनाम्यांमुळे ही बैठक रद्द करण्याची नामुष्की पक्षावर ओढवली आहे. नाराजी असल्याने पदाधिकाऱ्यांनी पालकमंत्र्यासमोरच घोषणाबाजी केल्याचे पाहायला मिळाले.

### कोणत्या पक्षाने कोणाला तिकीट दिले?


दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेच्या वाट्याला विधानपरिषदेची एक जागा आली होती. या जागेसाठी राष्ट्रवादीन मुंबईतील नेते झिशान सिद्दीकी यांना तिकीट दिले.

उद्धव ठाकरे यांच्या पक्षाकडून माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, शिंदे यांच्या पक्षाकडून नीलम गोऱ्हे, बच्चू कडू यांना तिकीट देण्यात आले आहे. तर दुसरीकडे भाजपाने सुनील कर्जतकर, माधवी नाईक, संजय भेंडे, विवेक कोल्हे, प्रमोद जठार या पाच नेत्यांना विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी तिकीट दिले आहे. कोणत्याही पक्षाने अतिरिक्त उमेदवार न दिल्याने ही निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता आहे.

# वादळामुळे बर्गी धरणात क्रूझ उलटली
## ४० पैकी ५ जणांचे मृतदेह सापडले

**जबलपूर/प्रतिनिधी** : मध्य प्रदेशातील जबलपूर येथील प्रसिद्ध पर्यटन स्थळ असलेल्या बर्गी धरणात आज एक भीषण दुर्घटना घडली. सायंकाळच्या सुमारास आलेल्या वेगवान वादळामुळे पर्यटकांनी भरलेली एक क्रूझ धरणाच्या पाण्यात उलटली. या दुर्दैवी घटनेत आतापर्यंत ४ पर्यटकांचा मृत्यू झाला असून अनेक जण बेपत्ता असल्याचे सांगण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, क्रूझमध्ये क्षमतेपेक्षा जास्त पर्यटक सवार होते. अचानक हवामान बदलल्याने आणि सोसाट्याचा वारा सुटल्याने क्रूझचे संतुलन बिघडले आणि ती मध्यधारेत उलटली. दुर्घटनेच्या वेळी क्रूझमध्ये सुमारे १५ ते २० लोक असल्याचे प्राथमिक वृत्त आहे. स्थानिक नाविक आणि बचाव पथकाने तत्काळ धाव घेत काही जणांना वाचवण्यात यश मिळवले आहे.



घटनेची माहिती मिळताच जिल्हा प्रशासनाचे अधिकारी आणि एउँइ चे पथक घटनास्थळी दाखल झाले आहे. अंधारामुळे बचावकार्यात अडथळे येत असले तरी शोधमोहीम सुरू आहे. बुडालेल्या व्यक्तींची ओळख पटवण्याचे काम सुरू असून जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

पर्यटन क्षेत्रात शोककळा

बर्गी धरणातील 'क्रूझ सफारी' हे पर्यटकांचे मुख्य आकर्षण आहे. मात्र, सुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन झाले होते का? किंवा वादळाचा इशारा असतानाही क्रूझ पाण्यात का नेली? असे प्रश्न आता उपस्थित केले जात आहेत. मुख्यमंत्री कार्यालयाने या घटनेची दखल घेतली असून मृतांच्या नातेवाईकांना मदत जाहीर करण्याची शक्यता आहे.

# जळगाव जिल्ह्यात उष्माघाताचा पहिला बळी
## पाचोरा येथे फळ विक्रेता चक्कर येऊन कोसळला

**पाचोरा/वृत्तसंस्था**- राज्यासह देशात यंदाचा उन्हाळा अधिकच दाहक वाटत आहे. अनेक ठिकाणी तापमानाने विक्रम मोडले आहेत. जळगाव जिल्ह्यात उन्हाच्या काहीलीने पाचोरा येथे एका तरुणाचा उष्माघाताने मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. मृत पावलेला तरुण हा फळ विक्रेता असून त्याला अचानक भोवळ येऊन तो खाली कोसळला आणि पाचारो ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र,डॉक्टरांनी त्याला मृत घोषीत केले आहे.

पाचोरा येथे उष्माघाताने एक तरुण आनंदा नथ्थू भोई ( वय ३४, रा. जवाहर हाऊसिंग सोसायटी, बाहेरपुरा) या तरुणाला भोवळ आली आणि तो खाली कोसळला.आनंदा भोई हा तरुण छत्रपती शिवाजी महाराज चौकात फळविक्री करत असताना अचानक त्यांना भोवळ आली आणि तो खाली कोसळला. त्याला तत्काळ पाचोरा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले. प्राथमिक माहितीनुसार आनंद भोई यांच्यात उष्माघाताची लक्षणे आढळून आली असली तरी मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतर स्पष्ट होईल असे सांगण्यात येत आहे. आनंदा नथ्थू भोई असे ३४ वर्षीय उष्माघाताने मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव असून त्याचा उष्माघाताने मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे.दरम्यान



उष्माघातापासून बचाव साठी नागरिकांनी खबरदारी घ्यावी दुपारचे वेळी बाहेर पडू नये ,असे आव्हान जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी केले आहे. उष्माघाताची लक्षणे आढळल्यास तातडीने रुग्णालयात जाऊन तपासणी करावी अशा देखील सूचना जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी दिल्या आहेत

पिंपरी-चिंचवड येथील सरकारी रुग्णालयात केळवण जेवण

पिंपरी-चिंचवड येथील सरकारी रुग्णालयात 'केळवण जेवण' आयोजन केल्याचे उघड झाल्याने यावर चौकशी करण्याची मागणी होत आहे. या केळवण जेवणाला महानगरपालिकेने परवानगी दिली होती का? असा सवाल केला जात आहे. रुग्णालय प्रशासशी संपर्क साधला असता केळवण जेवण सरकारी जागेत करणे चुकीचे असून संबंधितावर कारवाईचा प्रस्ताव पाठवणार असल्याचे डॉ. अलवी नासिर यांनी म्हटले आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या जिजामाता हॉस्पिटलमध्ये नुकतेच 'केळवण जेवण' आयोजित करण्यात आल्याची घटनासमोर आली आहे. या कार्यक्रमात हॉस्पिटलमधील संपूर्ण कर्मचारी वर्ग सहभागी झाला होता. विशेष म्हणजे महिला तसेच पुरुष कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिजामाता हॉस्पिटल हे महानगरपालिकेचे सार्वजनिक आणि अत्यावश्यक सेवा देणारे सरकारी रुग्णालय आहे. अशा ठिकाणी वैयक्तिक किंवा सामाजिक स्वरूपाचे कार्यक्रम आयोजित करणे कितपत योग्य आहे. असा प्रश्न आता उपस्थित होत आहेत. या प्रकरणी महानगरपालिका प्रशासनाने चौकशी करून आवश्यक ती कारवाई करावी,अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# महाराष्ट्र राज्य स्थापना दिनाच्या पूर्वसंध्येला
## २१ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

मुंबई : महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या एक दिवस अगोदर महाराष्ट्र पोलीस दलातील अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. गृह विभागानं यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. गृह विभागाच्या शासन निर्णयानुसार जालना, अमरावती ग्रामीण, नाशिक ग्रामीण, अहिल्यानगर,परभणी, नंदूरबार, चंद्रपूर, ठाणे ग्रामीण, वाशिम या जिल्ह्यांच्या पोलीस अधीक्षकांची बदली करण्यात आली आहे. याशिवाय फोर्सवनचे पोलीस अधीक्षक गजानन राजमाने यांची बदली करण्यात आली आहे. राज्य गुप्तवार्ता, नगरी हक्क संरक्षण यास इतर अधिकाऱ्यांच्या देखील बदल्या करण्यात आल्या आहेत.

**महाराष्ट्राच्या गृहविभागाकडून करण्यात आलेल्या पोलिसांच्या बदल्या**

| अ.क्र. | पोलीस अधिकाऱ्याचे नाव | विद्यमान पदस्थापना | बदलीनंतरची पदस्थापना |
|---|---|---|---|
| १ | अजय के. बन्सल | पोलीस अधीक्षक, जालना | पोलीस अधीक्षक, सायबर सुरक्षा, म.रा. |
| २ | सिंगुरी विशाल आनंद | पोलीस अधीक्षक, अमरावती (ग्रामीण) | पोलीस अधीक्षक, धुळे |
| ३ | बाळासाहेब पाटील | पो अधीक्षक,नाशिक (ग्रामीण) | पोलीस उप आयुक्त, मुंबई शहर |
| ४ | सोमनाथ घार्गे | पो अधीक्षक, अहिल्यानगर | सहायक पोलीस महानिरीक्षक (नि.वस.), पोलीस महासंचालक कार्यालय |
| ५ | रविंद्रसिंह एस. परदेशी | पोलीस अधीक्षक, परभणी | उपआयुक्त, राज्य गुप्तावार्ता विभाग, मुंबई. |
| ६ | संदीप घुगे | उपाायुक्त, राज्य गुप्तावार्ता | पोलीस उप आयुक्त, मुंबई शहर |
| ७ | श्रवण दत्त | पोलीस अधीक्षक, नंदुरबार | अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती) |
| ८ | मुम्मका सुदर्शन | पोलीस अधीक्षक, चंद्रपुर | पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर |
| ९ | धोडोंपत एस. स्वामी | पो अधीक्षक, ठाणे (ग्रामीण) | पोलीस अधीक्षक, नाशिक (ग्रामीण) |
| १० | अनुज मिलिंद तारे | पोलीस अधीक्षक, वाशिम | पोलीस अधीक्षक, अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, पुणे |
| ११ | अनुराग जैन | पोलीस अधीक्षक, | पोलीस उप आयुक्त, मुंबई शहर |
| १२ | अश्विनी सानप | पोलीस अधीक्षक, लोहमार्ग | पोलीस अधीक्षक, नंदुरबार |
| १३ | तेगबीर सिंह संधु | अपर पो अधीक्षक,मालेंगाव | पोलीस अधीक्षक, जालना |
| १४ | राजकुमार शिंदे | पोलीस उप आयुक्त,पुणेशहर | पोलीस अधीक्षक, लोहमार्ग पुणे |
| १५ | निकेश खाटमोडे | पोलीस अधीक्षक, अमली | पोलीस अधीक्षक, वाशिम |
| १६ | आयुष नोपानी | अपर पो अधीक्षक, जालना | पोलीस अधीक्षक, चंद्रपुर |
| १७ | पंकज कुमावत | अपर पोलीस अधीक्षक, अमरावती (ग्रामीण) | पोलीस अधीक्षक, परभणी |
| १८ | निकेतन कदम | पोलीस उप आयुक्त, नागपुर | पोलीस अधीक्षक, अमरावती (ग्रामीण) |
| १९ | सुरज गुंजाल | अपर पोलीस अधीक्षक, परभणी, | अपर पोलीस अधीक्षक, मालेंगाव |
| २० | गजानन राजमाने | पोलीस अधीक्षक, वन | पोलीस उप आयुक्त, मुंबई शहर |
| २१ | दत्ता लक्ष्मण तोटेवाड | अपर पोलीस महासंचालक | अपर पोलीस अधीक्षक, अमरावती |

आयुष नोपानी चंद्रपूरचे नवे पोलीस अधीक्षक, असतील. सध्या ते जालना येथे अपर पोलीस अधीक्षक पदावर कार्यरत आहेत. विद्यमान पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांची अहिल्यानगर येथे पोलीस अधिक्षक पदावर बदली झाली आहे. आयुष नोपाणी यांनी याआधी चंद्रपूर जिल्ह्यात उपविभागीय पोलीस अधिकारी (वरोरा) म्हणून केलं काम आहे.

नाशिक ग्रामीणचे पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांची बदली झाली असून त्यांच्या जागी नाशिक ग्रामीण पोलीस अधीक्षक म्हणून डॉ. डी एस स्वामी यांची नियुक्ती झाली आहे. नाशिक ग्रामीण पोलीस दलाचे अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्यावर मुंबई पोलीस उपायुक्त पदाची जबाबदारी देण्यात आली आहे.

नितेश खाटमोडे वाशिमचे नवीन पोलीस अधीक्षक असतील. या पूर्वी १६ एप्रिल रोजी राजेंद्र शिंदे यांचे वाशिमचे नवीन पोलीस अधीक्षक म्हणून नाव जाहीर झालं होतं. मात्र आता नवीन नाव आल्याने जिल्ह्यात चर्चेला विषय मिळाला आहे.

धुळे जिल्हा पोलीस अधीक्षक पदी विशाल आनंद शिंगूर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अमरावती ग्रामीण पोलीस अधीक्षक असलेल्या विशाल आनंद यांची या ठिकाणी नियुक्ती झाली आहे. तब्बल दहा ते बारा दिवसानंतर धुळे जिल्ह्याला पोलीस अधीक्षक मिळाले आहेत.

परभणीचे पोलीस अधीक्षक रवींद्र सिंह परदेशी यांची बदली झाली असून ते आता उपायुक्त राज्य गुप्त वार्ता विभाग मुंबई म्हणून काम पाहतील.

# 'ऑपरेशन सिंदूर' भारताने स्वतःच्या अटींवर थांबवले
## भारताची दीर्घ युद्धाचीही तयारी होती - राजनाथ सिंह!

नवी दिल्ली : ऑपरेशन सिंदूर कोणत्याही दबावामुळे किंवा मर्यादेमुळे थांबवले गेले नाही, तर भारताने स्वतःच्या रणनीतीनुसार आणि अटींवर ते थांबवण्याचा निर्णय घेतला, असे वक्तव्य संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी केले. दिल्लीत एका कार्यक्रमात ते बोलत होते. भारताच्या लष्करी क्षमतेवर देखील त्यांनी ठाम विश्वास व्यक्त केला. राजनाथ सिंह म्हणाले की, जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर सुरू करण्यात आलेले ऑपरेशन सिंदूर ६ ते १० मे २०२५ दरम्यान पार पडले. या कारवाईत भारतीय सैन्याने अत्याधुनिक तंत्रज्ञान, अचूक नियोजन आणि




प्रभावी रणनीतीचा वापर करत आपली ताकद जगासमोर ठळकपणे मांडली. गरज भासली असती तर भारत दीर्घकालीन युद्धासाठी पूर्णपणे सज्ज होता. 'आमच्याकडे 'पूर्ण क्षमता' होती. अचानक गरज पडल्यास सैन्यशक्ती आणि संसाधने झपाट्याने वाढवण्याचीही क्षमता होती, तसेच आज भारतीय सैन्य पूर्वीपेक्षा अधिक सक्षम आणि तांत्रिकदृष्ट्या प्रगत झाले आहे, हेही त्यांनी आवर्जून सांगितले.

राजनाथ सिंह म्हणाले की, या ऑपरेशनदरम्यान आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग आणि प्रगत मिसाइल प्रणालींचा प्रभावी वापर करण्यात आला. त्यामुळे हल्ल्यांची अचूकता वाढली आणि निर्णयप्रक्रिया अधिक वेगवान व प्रभावी झाली. भविष्यातील युद्ध तंत्रज्ञानाधारित असेल, याची जाणीव ठेवून भारत सैन्याचे आधुनिकीकरण करत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी संरक्षणमंत्र्यांनी तिन्ही सैन्यदलांच्या प्रमुखांचे आणि जवानांचे कौतुक करत त्यांचा आत्मविश्वास आणि तयारी हीच देशाची खरी ताकद असल्याचे सांगितले.

### सुट्टीची सूचना

आज शुक्रवार दि. १ मे महाराष्ट्र दिन असल्याने जनमाध्यम कार्यालयास सुट्टी असणार आहे. यामुळे उद्या दि, २ मे चा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, एजंट, जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.

**-व्यवस्थापक**

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## तृणमूल की भाजप?

बंगालमध्ये मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेस पक्षाने 'माँ, माटी, मानुष' अशी घोषणा देत २०११ पासून तीन वेळा विधानसभा निवडणूक जिंकली आणि आता चौथ्यांदा बंगाली अस्मितेचा चोमोत्कार घडवण्यासाठी त्या रणांगणात उतरल्या आहेत. दुसरीकडे २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपनेही भरघोस यश मिळवले आणि २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत सुमारे ३८ टक्के मते मिळवून दोन आकडी खासदार लोकसभेत पाठवले. एकेकाळी प. बंगालवर सहा दशकांहून अधिक काळ सत्ता गाजवणारे काँग्रेस आणि डावे पक्ष बाजूला पडले असून भाजप विरुद्ध तृणमूल काँग्रेस असा दुरंगी सामनाच राज्यात कमालीचा इर्ष्येने आणि सर्व शक्तीनिशी झाला आहे.संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिलेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीचा दुसरा आणि अंतिम टप्पादेखील उच्चांकी मतदानाने पार पडला आहे. पहिल्या टप्प्यात २३ एप्रिल रोजी मतांची टक्केवारी ९३ टक्के इतकी होती, तर बुधवारी २९ एप्रिलला झालेल्या दुसऱ्या टप्प्यात मतदानाची टक्केवारी ९० टक्के इतकी आहे. मोठ्या प्रमाणात मतदानाचा थेट फायदा किंवा तोटा कोणत्या पक्षाला होईल, हे आताच सांगता येणार नाही. उच्च मतदान सहसा सत्ताविरोधी लाट तथा अँटिइन्कम्बन्सी दर्शवू शकते. त्यामुळे सत्ताधारी पक्षाला धोका वाढू शकतो; पण सत्ताधारी पक्षाने चांगले काम केले असेल, तर हेच जास्त मतदान त्यांच्या समर्थनातही जाऊ शकते; पण जास्त मतदान ही विरोधकांसाठी संधी असते. कारण, नाराज मतदारांना बदल हवा असतो.भाजपला काहीही करून पूर्व भारतातील हे महत्त्वाचे आणि संवेदनशील राज्य जिंकायचे आहे, तर ममतांना आपला बालेकिल्ला शाबूत ठेवायचा आहे.भाजपने हिंदुत्वाचा नारा दिला, तर ममतांनी बंगाली अस्मितेला साद घातली. दोन्ही बाजू अटीतटीने लढल्या. त्यामुळे ममता चौथ्यांदा बाजी मारणार की कमळ फुलणार, याकडे सर्वसामान्य जनतेचीही उत्सुक नजर लागली आहे. येथील २९४ विधानसभा मतदारसंघांपैकी ११२ मध्ये मुस्लीम मतदारांची संख्या लक्षणीय म्हणजे २५ टक्के एवढी आहे आणि ती निर्णायक ठरल्याचे दिसून आले आहे. २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत तृणमूलने २१२ जागा जिंकल्या होत्या आणि त्यापैकी १०६ जागा या ११२ मतदारसंघांतून मिळाल्या होत्या.तृणमूलमागे मुस्लीम मतदार उभा असल्याचे नेहमीच दिसून आले आहे. या पार्श्वभूमीवर भाजपने आक्रमक हिंदुत्व धोरणाचा पुरस्कार चालवल्याने ममता यांनीही सौम्य हिंदुत्वाचा स्वीकार केला. त्यामुळेच बाबरी मशिदीची प्रतिकृती उभारणाऱ्या हुमायून कबीर यांना त्यांनी पक्षातून काढून टाकले. मुर्शिदाबादसह चार जिल्ह्यांत ९८ मतदारसंघ आहेत. हे मतदारसंघ मुस्लीमबहुल आहेत. याच भागातून तृणमूल काँग्रेसचे ८६ उमेदवार विजयी झाले होते. हूमायून कबीर हे याच भागातील असून त्यांनी स्वतःच्या पक्षाचे उमेदवार दिले आहेत. याशिवाय खा. असदुदिन ओवैसी यांचा एआयएमआयएम पक्षही निवडणूक लढवत आहे. या दोघांचाही परिणाम तृणमूल काँग्रेसच्या यशावर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभांना चांगला प्रतिसाद मिळाला आहे. गेल्या दहा वर्षांत राज्यात भाजपने विस्तार करत पाय भक्कम रोवले. २०१६ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपचे कमळ प्रथम फुलले. भाजपला त्यावेळी तीन जागा आणि दहा टक्क्यांहून अधिक मते मिळाली होती. २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपच्या मतदानाची टक्केवारी ३८ टक्क्यांपर्यंत पोहोचली आणि ७७ उमेदवार विजयी झाले. ही भाजपची हनुमान उडीच होती. २०२४ मध्ये लोकसभा निवडणुकीत भाजपच्या मतदान टक्केवारीत दोन टक्क्यांची वाढ झाली आणि भाजपने १२ जागा जिंकल्या. गेल्या पाच वर्षांत भाजपने संघटनेचा जबरदस्त विस्तार केला आहे. प्रत्येक बूथवर पोहोचण्याची तयारी केली आहे. हे घटक भाजपला अनुकूल ठरणारे आहेत.तृणमूलने २०११ पासून सलग तीनवेळा विधानसभा निवडणूक जिंकताना जागांसह मताची टक्केवारीही वाढविली. २०११ मध्ये १८४ जागा जिंकून त्यांची मतांची टक्केवारी होती ३९ टक्के. २०१६ च्या विधानसभा निवडणुकीत तृणमूलचे संख्याबळ २११ वर पोहोचले आणि मतदानाच्या टक्केवारीत पाच टक्क्यांची वाढ झाली. २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत २१५ जागा जिंकून तृणमूलने ४८ टक्के मतांपर्यंत मजल मारली. तृणमूलच्या कामगिरीचा आलेख विधानसभा निवडणुकीत सातत्याने चढता राहिला आहे. तथापि, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत मात्र विधानसभा निवडणुकीत पडलेल्या मतांपेक्षा दोन टक्के कमी मते पक्षाला मिळाली.तृणमूलचे २९ खासदार निवडून आले. याआधी तृणमूल-भाजप या दोन्ही पक्षांतील मतांच्या टक्केवारीत १० ते ११ टक्क्यांचा फरक होता. लोकसभा निवडणुकीत तो सहा टक्क्यांवर आला. त्यामुळे भाजपचे आव्हान यावेळी तृणमूलला मागील निवडणुकीपेक्षा अधिक अवघड ठरू शकते. अर्थात, मुख्यमंत्री असूनही नेहमी रस्त्यावर उतरून लोकांना थेट आवाहन करणाऱ्या ममतांच्या नेतृत्वाची कसोटी पाहणारी ही निवडणूक आहे. बंगालमध्ये मतदार याद्या पुनर्निरीक्षणाचे (एसआयआर) प्रकरण चांगलेच गाजले.ममतांनी आपल्या फायरब्रँड प्रतिमेप्रमाणे याला कडवा विरोध केला.नव्वद लाखांवर मतदारांची नावे वगळल्याचा आरोप केला. निवडणूक आयोगाने दुबार, मयत मतदारांची नावे कमी केल्याचा खुलासा केला; पण ममतांनी ते मान्य केले नाही.या प्रकरणाचा त्यांना लाभ होतो की तोटा, हे निकालातूनच कळेल. लोकसभेत महिला आरक्षणासह मतदारसंघ पुनर्रचना विधेयक विरोधकांनी फेटाळले. तृणमूलनेही या विधेयकाविरोधात मतदान केले होते. भाजपने याचा मुद्दा केला. त्यावर निवडणुकीत सर्वाधिक महिला उभ्या केल्याचे चपखल प्रत्युत्तर ममतांनी दिले. चार मे रोजी निकाल जाहीर होईल. कौल कोणाला मिळेल, हे अद्याप तरी स्पष्ट झालेले नाही. ममता जिंकल्या,तर यापुढे प्रादेशिक पक्षांना उभारी येऊ शकेल.भाजपने विजय मिळवला, तर पूर्वेकडील महत्त्वाचे राज्य भाजपच्या पारड्यात पडेल आणि देशातील सर्वात मोठा पक्ष म्हणून भाजपचे स्वप्न बळकट होईल.या निकालाने राजकारणाला नवी दिशा मिळेल,यात शंका नाही.

# शिक्षणाची प्रमाण भाषा, युनेस्को आणि महाराष्ट्र सरकार

**महाराष्ट्रात ६० मुख्य बोलीभाषा आणि ३०० हून अधिक पोटबोली आहेत याकडे लक्ष वेधत 'युनेस्को'चा अहवाल मराठी ही या बोलभाषकांना परकीय भाषा कशी वाटते आणि त्यामुळे त्यांची विचारशक्तीच कशी कुंठीत होते याकडे लक्ष वेधतो आहे. एकीकडे शिक्षणाचे माध्यम हे प्रमाण भाषा नव्हे, तर बोली असणे आवश्यक आहे हे युनेस्को सांगत आहे, पण दुसरीकडे महाराष्ट्र सरकार मात्र मराठीच्या ऐवजी इंग्रजी, हिंदी, तिसरी भाषा मुलांवर अजूनही कशी लादायची याचेच राजकारण करण्यात व्यस्त आहे.**



युनेस्कोने पुन्हा एकदा भाषा, मातृभाषा, शिक्षणाची माध्यम भाषा, प्रथम भाषा, बहुभाषा शिक्षण यासंदर्भातील संदिग्धता दूर सारली आहे. जगात केवळ इंग्रजी हीच एकमेव ज्ञानभाषा, विकास भाषा असल्याच्या राज्यकर्त्यांच्या इंग्रजी प्रेमाचा व तिच्या जागतिक नफ्याच्या व्यवसायाचा बुरखा फाडला आहे.

मुलांना त्यांच्या प्रथम भाषेतून, मातृभाषेतून, बोलीतूनच शिकवले गेले तरच त्यांच्या ज्ञानबोधात्मक पातळीत वाढ संभवते. तरच त्यांची आकलन क्षमता वाढू शकते आणि तरच शैक्षणिक समानतादेखील प्रस्थापित करता येऊ शकते असे युनेस्कोने 'भाषा मॅटर्स : स्टेट ऑफ द एज्युकेशन रिपोर्ट फॉर इंडिया २०२५' या अहवालात म्हटले आहे.

नरेंद्र जाधव समिती नेमून तिच्या संभाव्य अहवालाची अजूनही पहिलीपासून मुलांवर हिंदी, तिसरी भाषा सक्ती लादण्याची टांगती तलवार कायमच ठेवण्याचे राजकारण करणा-या महाराष्ट्र सरकारच्या अविवेकी,अशैक्षणिक कृतीच्या पार्श्वभूमीवर सरकारच्या तथाकथित तज्ञांनी व सरकारनेही विशेषत्वाने हे लक्षात घेण्याची गरज आहे. 'मातृभाषाधारित बहुभाषिक शिक्षण' ही युनेस्कोची घोषणा आहे, केवळ अविवेकी बहुभाषा शिक्षण नव्हे.

भारतासारख्या १३६९ भाषांतील विद्यार्थ्यांची अध्ययन निष्पत्ती (Learning Outcomes) म्हणजे शिकण्याच्या प्रक्रियेनंतर विद्यार्थ्यांनी साध्य केलेली भाषिक कौशल्ये आणि समज, ज्यात वाचन, लेखन, श्रवण, भाषण, आकलन आणि साहित्य रसास्वाद या संवाद क्षमतांचा समावेश होतो, ज्यांच्या मदतीने विद्यार्थी प्रभावी संवाद व विचार व्यक्त करण्यास सक्षम होतात. हे केवळ मातृभाषा, बोलीभाषा माध्यमातून शिक्षण झाले तरच शक्य आहे असे युनेस्कोचा हा अहवाल म्हणतो. त्याचप्रमाणे असे झाले तरच मुलांचे शाळेतील गळतीचे प्रमाणही कमी करता येणे व सर्वसमावेशकता वाढवता येणे शक्य आहे असा युनेस्कोच्या या अहवालातील पाहणीचा निष्कर्ष आहे.

२०२०च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासोबतच भारतात पेंद्रासह विविध राज्य सरकारांनी मातृभाषाधारित बहुभाषा शिक्षण कार्यक्रम राबवला पाहिजे, जेणेकरून मुलांना त्यांना समजेल त्याच भाषेतून शिक्षण मिळेल असे युनेस्कोने या अहवालात सुचवले आहे. असे केल्याने तेलंगणा, आसाम, तामीळनाडू येथे काय लाभ झाले त्याचे दाखलेदेखील या अहवालात देण्यात आले आहेत.

प्रत्येक राज्याने आपापले भाषिक धोरण आखणे, शिक्षकांचा दर्जा वाढवणे, डिजिटल शैक्षणिक साधने वाढविणे तसेच अन्य भाषांच्या शिक्षणासाठी भरघोस तरतूद करणे, अशा वेगवेगळ्या दहा उपाययोजना या अहवालात सुचविण्यात आल्या आहेत.

विविध संशोधनांचे दाखले देत, वाढती शैक्षणिक विषमता, शाळांमधील मुलांच्या गळतीचे प्रमाण, पायाभूत साक्षरता आणि संख्या ज्ञान नसणे यासाठी खरा अडथळा हा भाषिक कसा आहे हे हा अहवाल दाखवून देतो. अहवालाचा भर हा मातृभाषा हीच ज्ञानभाषा असण्यावर आहे. या अहवालात अनेक महत्त्वपूर्ण बाबींवर अभ्यासपूर्ण चर्चा करत केंद्र व राज्य सरकारांसाठी महत्त्वाच्या सूचना, शिफारसी करण्यात आल्या आहेत. बहुभाषिक शिक्षणाच्या नावाखाली पहिल्या वर्गापासूनच मुलांवर दुसरी, तिसरी भाषा, चौथी भाषा लादली जावी असे हा अहवालदेखील सांगत नाही.सीबीएसईनेदेखील तिसरी भाषा सहावीपासूनच सुरू करायचे अगोदरच जाहीर केले आहे.असे सर्व असताना महाराष्ट्र सरकार हिंदी सक्ती, तिसरी भाषा सक्ती हा मुद्दा पूर्णपणे सोडायला तयार नाही ही वस्तुस्थिती आहे.

युनेस्कोच्या या अहवालात मराठीकडे महाराष्ट्रात सरकारने चालवलेले जे अक्षम्य दुर्लक्ष आहे, त्याकडे विशेषत्वाने लक्ष वेधण्यात आले आहे.तुलनेने तामीळनाडू, आंध्र प्रदेश, कर्नाटक, ओडिशा ही राज्ये आपापल्या राज्यात आपल्या भाषांचे जतन शिक्षणात ज्या पद्धतीने करत आहेत त्याचा युनेस्कोने गौरव केला आहे, हे महाराष्ट्रातील राज्यकर्ते, शासन, प्रशासन यांनी लक्षात घेतले पाहिजे.

आमच्या सारखे मराठीचे काही कार्यकर्ते,चळवळी,समूह महाराष्ट्र सरकारचे याकडे गेली दोन दशके सातत्याने लक्ष वेधत आहेत आणि सरकार त्याकडे सातत्याने दुर्लक्ष करत चालले आहे.

ओडिशाने राज्यातील २१ आदिवासी बोलीभाषांमधून पाठ्यपुस्तके तयार केली आहेत. तिथे मुलांना प्राथमिक शिक्षण केवळ राज्याच्या प्रमाण भाषेतच नव्हे, तर चक्क बोलींमधून दिले जात आहे याकडे हा अहवाल लक्ष वेधतो. महाराष्ट्र सरकारला हे का करता येऊ नये? महाराष्ट्रात ६० मुख्य बोलीभाषा आणि ३०० हून अधिक पोटबोली आहेत याकडे लक्ष वेधत 'युनेस्को'चा अहवाल मराठी ही या बोलभाषकांना परकीय भाषा कशी वाटते आणि त्यामुळे त्यांची विचारशक्तीच कशी कुंठीत होते याकडे लक्ष वेधतो आहे. एकीकडे शिक्षणाचे माध्यम हे प्रमाण भाषा नव्हे, तर बोली असणे आवश्यक आहे हे युनेस्को सांगत आहे, पण दुसरीकडे महाराष्ट्र सरकार मात्र मराठीच्या ऐवजी इंग्रजी, हिंदी, तिसरी भाषा मुलांवर अजूनही कशी लादायची याचेच राजकारण करण्यात व्यस्त आहे. ही विसंगती वेगाने दूर सारण्यासाठी पालकांना आणि लोकांनाच पुढाकार घ्यावा लागणार आहे. शिक्षणाचे उद्दिष्ट केवळ प्रमाण वा अन्य कोणत्याही भाषेची अनिवार्यता एवढेच मर्यादित नाही आहे असे सांगत हा अहवाल ते उद्दिष्ट मुलांची विचार प्रक्रिया विकसित करण्याचे असल्याचे सांगतो. हे तेव्हाच शक्य आहे जेव्हा त्यांच्या बोलीभाषेतून शैक्षणिक संवाद साधला जाईल.

युनेस्कोने भाषिक अधिकार हे मानवाधिकार मानलेले आहेत. या अहवालात सरकारांना देण्यात आलेल्या सूचना अतिशय महत्त्वाच्या आहेत. त्यानुसार मातृभाषा, बोली हाच पाया असलेले बहुभाषा शिक्षण देणे, शिक्षकांना विद्यार्थ्यांची बोली, मातृभाषा यात तज्ञता असणे, शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम त्यानुसार पुनर्रचित करणे, राज्य, शासन, प्रशासन यांनी, ज्येष्ठ व्यक्ती,लेखक, कथाकथनकार, कारागीर,कलावंत, सांस्कृतिक कार्य करणारे अशांना अभ्यासक्रम तयार करण्यात सामावून घेणे, राष्ट्रीय,राज्य शैक्षणिक संशोधन परिषदा, आदिवासी संशोधन संस्था, भारतीय भाषा संस्थान, भारतीय भाषा समिती,व सहयोगी यांनी मिळून द्वैभाषिक, बहुभाषिक अध्ययन सामग्री तयार करणे, लिंग समानतेला पूरक अशी संरचना निर्मिणे, केरळ, ओडिशाप्रमाणे दीक्षा पाठशाळा, भारतवाणी व अन्य उपक्रम, आदिवासी भाषांचा समावेश असलेली सामग्री विकसित करणे, 'भाषिनी'सारख्या साधनांचा वापर करत भाषिक तंत्रज्ञानाची व्याप्ती वाढवणे, शिक्षणात राज्याचा आर्थिक सहभाग व जबाबदारी वाढवणे अशा महत्त्वपूर्ण सूचना युनेस्कोने या अहवालात केल्या आहेत. राज्यकर्त्यांनी राज्याची जी भाषिक वाताहत चालवली आहे ती आता तरी थांबवायला हवी.(साभार-सामना)

**डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी**

# कामगार ज्या दिवशी कामाचे मोल ठरवेल तोच सुदिन




कामगार हे उत्पादन तयार करणारे एकमेव स्त्रोत ह्या पृथ्वी तलावरआहे. पण ह्या कामगारांची अवस्था मात्र फार वाईट आहे. शेतकरी, शेतमजूर राबराब शेतात राबतात अन्नधान्य पिकवितात परंतु त्यांनाच ते अन्नधान्य खायला मिळत नाही. अनेक कामगार मोठं-मोठ्या बिल्डिंग बांधतात परंतु त्यांनाच राहायला घर नाही. कामगार कापूस पिकवितात परंतु त्यांनाच परिधान करायला कपडे नाहीत. कारखान्यात सायकली,मोटार सायकली, मोटारी, रेल्वेचे डब्बे, बस, ट्रक, ट्रॅक्टर आधीचे उत्पादन करतात. परंतू ही वाहने त्यांना उपभोगायला मिळतच नाहीत.

कारखानदार, भांडवलदार यांचा मुख्य उद्देश हा केवळ नफा कमविणे असतो. नफा कमविण्यासाठी ते कामगारांची कपात करतात. मालकाची नफा कमविण्याची पद्धत ही सकारात्मक नसते ती नेहमीच नकारात्मक असते. मालक हा नफा कमविण्यासाठी उत्पादन वाढवत नाही तर तो कर्मचारी / कामगार कपात करतो. नफा वाढविण्याच्या नादात कर्मचाऱ्यांना कमी वेतन दिल्या जाते. ह्या अल्पशा वेतनामुळे कामगारांचे शोषण होते. त्याला ह्या वेतनात निकृष्ट जीवन जगावे लागते. त्याच्या स्वास्थावर विपरीत परिणाम होतो.सध्या कायम स्वरूपी रोजगार जवळपास बंदच झाला आहे. कंत्राटीच्या भुताने सर्व कारखानदार, भांडवलदार, मालक आणि सरकार फारच प्रभावित झालेले आहे. कायमस्वरूपी रोजगार म्हणून सरकार जबाबदारी घ्यायला तयार नाही. कारण की सरकारला, मालकाला ते परवडत नाही. कायमस्वरूपी कामगार नेमला तर त्याला पी. एफ., ग्रॅज्युएटी व पेन्शन आदी द्यावे लागतात. हे तर कामगाराचा कामगार कायद्याप्रमाणे त्याचा हक्कच आहे. परंतु कामगारांच्या बाजूने सर्व कायदे अस्तित्वात असून सुद्धा त्याला न्याय दिला जात नाही.तसे बघितले तर कामगारवर्ग हा समाजाचा आणि अर्थव्यवस्थेचा कणा आहे. परंतु त्याच्या नशिबी गरिबी, संघर्ष आणि वेदनाच येतात. कामगारांची व्यथा ही केवळ मजुरीची नाही तर त्यांच्या हक्कांची, सुरक्षेतीची आणि मानवी प्रतिष्ठेचीही कथा आहे.

अनेक कामगारांना, विशेषतः असंघटित क्षेत्रातील कामगारांना विशेष करून बांधकाम मजूर, विडी कामगार यांना किमान वेतन मिळत नाही. पण वास्तविकतः प्रत्येक राज्यात किमान वेतनाचा कायदा आहे. पगार वेळेवर न दिल्याने ही सुद्धा मोठी समस्या आहे. ज्यामुळे त्यांचे संपूर्ण कुटुंब संकटात सापडते.नालेसफाई करणारे कामगार, वीटभट्टी कामगार किंवा कारख्यान्यातील कामगारांना जीवितास धोका असलेल्या परिस्थितीत काम करावे लागते. नालेसफाई करताना विषारी वायूने अनेकदा कामगारांचा मृत्यू सुद्धा होतो.पगार कमी असल्याने अनेक कामगारांना आपली मुले शाळेत न पाठवता कामावर पाठवावी लागतात. वास्तविक आपल्या भारतीय संविधानात बालकामगारास काम करणे हे निषिद्ध मानले आहे. तरी पण बालकामगारांची संख्या वाढते आहे हे देशाचे दुर्दैव आहे.

कामगारांची स्थिती सुधारण्यासाठी काही प्रमुख सुधारणा आणि उपाय योजना करणे गरजेचे आहे. सरकार दावा करते की भारतातील कामगारांची स्थिती सुधारण्यासाठी नवीन कामगार कायदे केले आहेत, ह्यात वेतन संहिते मध्ये सर्व कामगारांना वेळेवर पगार आणि किमान वेतनाची हमी दिली आहे. ज्यामुळे विषमता कमी होईल असा दावा केला जातो आहे. परंतु एकीकडे कंत्राटी पद्धतीचा पुरस्कार करायचा आणि दुसरीकडे विषमता कमी होईल असे म्हणायचे आणि एकीकडे कामगारच कंत्राटी पद्धतीने संपवायचा तर हे कायदे करून ह्याचा कोणाला फायदा द्यायचा आहे हे न समजण्यासारखे गणित आहे.

समाजीक सुरक्षा संहिता ही असंघटीत क्षेत्रातील कामगार गिग आणि प्लॅटफॉर्म कामगारांना, स्वीगी, झोमॅटो कर्मचारी, विमा, पेन्शन आणि भविष्यातील निधी सारखे लाभ मिळतील असा दावा केला जातो तर दुसरीकडे संघटित कामगारांना मात्र एन. पी. एस. योजना मागू करायची हा विरोधाभास आहे. बँकांमधील सुरक्षा कर्मचारी नेमणूक जवळपास बंदच झाली आहे. कारण काय तर सुरक्षेवर ज्यादा खर्च होतो. जर बँकेत दरोडा पडला आणि जीवित हानी आणि बँकेची वित्त हानी झाली तर ह्याची भरपाई कोण करेल ह्याचे उत्तर कोणाकडेच नाही आहे.

औद्योगिक संबंध संहिता कामगार संघटनांना बळकट करणे आणि नौकरीत स्थिरता वाढविणे असा दावा केला जातो पण वास्तविकता ही वेगळी आहे. आता संघटना स्थापण्यासाठी बरेच निकष लावले आहेत. संप करण्याचा जो अधिकार आहे त्यावर गदा आणण्यात आली आहे. असे निकष आणले आहेत की कामगार संपच करू शकणार नाही.जास्तीच्या वेळात काम केल्यास दुप्पट वेतन मिळविण्याचा अधिकार येण्याचा दावा केला जात आहे. वास्तविकतः ओव्हर टाईमचा कायदा अगोदरचाच आहे. संघटित कामगारांना सुद्धा ओव्हरटाईम चा कायदा असून सुद्धा ओव्हरटाईम देण्याची चालढकल केल्या जाते. ही वास्तविकता आहे.महिला कामगारांना रात्रीपाळीची काम न देण्याची गरज आहे. तसेच अनिवार्य आरोग्य तपासणी आणि कामाच्या ठिकाणी सुरक्षितता असणे गरजेचे आहे.मालकाची, भांडवदारांची आणि सरकारची कामगारांकडे बघण्याची अनास्था हा मोठा गंभीरतेच विषय आहे. जो पर्यंत ह्यात सुधारणा होणार नाही तो पर्यंत कामगारांचे जीवनमान सुधारू शकत नाही.

संगणीकरण आपण स्वीकारले एक मोठे आव्हान आपण स्वीकारले. ह्यात आपण रोजगार गमावलेला आहे. ह्यात मानवाच्या जे विविध कौशल्य होते ते संपुष्टात आले आहेत. आता ए. आय. मानव जसा विचार करतो तसा विचार करणार आहे. एकवेळ आपल्या कौशल्यावर बाधा आणली ते आपण समजू शकतो पण आपल्या विचारावर बाधा आणणे म्हणजे कामगारांसाठी मोठे आव्हान आहे. कामगाराच्या अस्तित्वावरच प्रश्न चिन्ह निर्माण होणार आहे.कामगाराच्या सुदिनासाठी एकमेव मूलमंत्र आहे. तो म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा. तरच भविष्यात कामगारांचे सुगीचे दिवस येतील नाही तर सध्या जसे शोषण चालू आहे तसेच राहील. कामगार संपत्ती निर्माण करतो त्याने त्याचे रोजगाराचे दाम ठरविणे ही काळजी गरज आहे. ज्या दिवशी कामगार त्याच्या कामाचे मोल ठरवेल तो कामगारांसाठी सुदिन असेल. कामगार दिनाच्या हार्दिक शुभेच्छा.

**अरविंद सं .मोरे**
मो. ९४२३१२५२५१

## वैशाख पौर्णिमा ..

गौतमाचा जन्मदिन
पौर्णिमा वैशाखातली
लाभे सिध्दार्थसावली
गोडी कळे उन्हातली

सात वर्षाची तपश्चर्या
बोधी वृक्षा तळातली
उदेला सूर्य महाज्ञानी
आशा फुले मनातली

सम्यकसंबोधी गौतमा
ज्योत उजळे आतली
महाज्ञान प्राप्त झाले
शाल सम्बुध्द घातली

दिवस वैशाखपौर्णिमा
संधी योगा योगातली
गयेमधल्या बोधीवृक्षा
रे पालवी वैशाखातली

चारआर्यसत्य तीनअंगे
तत्वे मध्यम मार्गातली
अष्टांगिक मार्ग आचरी
वेदना जाणे जगातली

रे वैशाख पौर्णिमेलाचं
अंतीम समाधी घेतली
महा महत्व या दिनाचे
निर्वाण ज्योती चेतली

**- हेमंत मुसरीफ**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयाच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे लोकार्पण

## पालकमंत्री ना. संजय राठोड यांच्याहस्ते लोकार्पण

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ : जिल्ह्यातील लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयाच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे आज पालकमंत्री ना. संजय राठोड यांच्या हस्ते आणि आदिवासी विकास मंत्री ना. प्रा.डॉ. अशोक उईके यांच्या प्रमुख उपस्थितीत लोकार्पण करण्यात आले.

या कार्यक्रमाला आ. किसन वानखेडे, नगराध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी उईके, पोलीस अधिक्षक कुमार चिंता, मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, अतिरिक्त जिल्हाधिकारी अनिल खंडागळे, अधिक्षक अभियंता सुषमा बोंद्रे, लाप्रविचे पोलीस अधीक्षक बापू बांगर, अपर पोलिस अधीक्षक सचिंद्र शिंदे, पोलीस उपअधीक्षक अभय आष्टेकर यांच्यासह अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री ना. संजय राठोड आणि आदिवासी विकास मंत्री ना. प्रा.डॉ. अशोक उईके यांनी या सुसज्ज इमारतीचे कौतूक केले. शासनाच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता आणि लोकांचा विश्वास टिकवून ठेवण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले.

तसेच नागरिकांमध्ये शासन व विभागाची चांगली प्रतिमा निर्माण होण्यासाठी लोकसहभाग, लोकचळवळ आणि आपुलकी निर्माण झाली पाहिजे. यासह लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचा धाक कायम राहिला पाहिजे. जनजागृती झाली पाहिजे.

शासकीय विभागाच्या इमारतींसाठी सकारात्मक भूमिका घेतली जाईल, असे त्यांनी यावेळी सांगितले. तत्पूर्वी पालकमंत्री ना. संजय राठोड, आदिवासी विकासमंत्री ना. डॉ. अशोक उईके यांनी नवीन इमारतीची पाहणी करुन वृक्षारोपण केले.

# खुनाच्या गुन्ह्यात कारागृहातून फरार आरोपीला घाटंजी पोलिसांनी घेतले ताब्यात



**जनमाध्यम प्रतिनिधी**

घाटंजी - मागील काही वर्षांपूर्वी घडलेल्या खुनाच्या प्रकरणात न्यायालयाने तीन युवकांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली होती. त्याच प्रकरणातील आरोपी चेतन वासुदेव टेकाम हा दि. १९ एप्रिल रोजी मोर्शी कारागृहातून फरार झाला होता. अखेर घाटंजी पोलिसांनी त्याला ताब्यात घेत कारागृहाच्या स्वाधीन केले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, खुनाच्या गुन्ह्यात शिक्षा भोगत असताना टेकाम हा मोर्शी येथील कारागृहातून निसटला होता. या घटनेनंतर पोलिस यंत्रणा सतर्क झाली होती. दरम्यान, दोन दिवसांपूर्वी आरोपी घाटंजी शहरात असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिस निरीक्षक केशव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन राठोड यांनी एक पोलिस पथक नेमले. पोलीस पथकाने सापळा रचत शोधमोहीम राबवली. त्यांच्या नियोजनबद्ध व चपळ कारवाईमुळे कमी वेळातच फरार आरोपीला शिताफीने ताब्यात घेण्यात यश आले. या कारवाईत दिनेश जाधव, मुकुंद केंद्रे, संदीप गोहणे, रत्नाकर सलामे, राजू रनमले, होमगार्ड रामदास माटे, यांच्यासह पोलिस पथकातील कर्मचाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. आरोपीला पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी पुन्हा मोर्शी येथील कारागृहात रवाना करण्यात आले. या धाडसी कारवाईमुळे घाटंजी पोलिसांच्या कार्यक्षमतेची प्रचिती पुन्हा एकदा समोर आली असून, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिस सज्ज असल्याचा विश्वास नागरिकांमध्ये निर्माण झाला आहे.

# महसूल अधिका-याचे मुख्यालय ग्रामीण ऐवजी शहरातच ग्रामीण भागातील शेतकरी व नागरिकांची गैरसोय!

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - तालुक्यात महसूल कर्मचाऱ्यांच्या कामकाजाबाबत गंभीर अनियमितता समोर येत असून अनेक महसूल अधिकाऱ्यांनी शासनाच्या व तहसीलदार यांच्या कडक व स्पष्ट आदेशाकडे दुर्लक्ष करत मुख्यालय ऐवजी पुसद शहरातच कार्यालय थाटल्याचे चित्र दिसत आहे. परिणामी खेड्यापाड्यातील शेतकरी सर्वसामान्य नागरिक आणि विद्यार्थींना अत्यंत गैरसोयीचा सामना करावा लागत असून त्यांचा वेळ व पैसा आणि श्रम वाया जात आहे.

राज्य शासनाच्या नियमानुसार प्रत्येक महसूल अधिकाऱ्याने आपल्या नेमून दिलेल्या सज्जा किंवा मुख्यालयाच्या ठिकाणी उपस्थित राहून नागरिकांना सेवा देणे बंधनकारक आहे मात्र प्रत्यक्षात अनेक ठिकाणी हे नियम पायदळी तुडवले जात असल्याचे दिसून येत आहे महसूल अधिकाऱ्याने सोयीच्या दृष्टीने पुसद शहरात आपले कार्यालय सुरू ठेवल्याने ग्रामीण भागातील नागरिकांना १५ ते ३० किलोमीटर अंतरावरून शहरात यावे लागत आहे, सध्या उन्हाळ्याची तीव्रता ४२ ते ४५ डिग्री सेल्सिअस पर्यंत वाढलेली असतांना नागरिकांना कडक उन्हात प्रवास करावा लागत आहे. काही गावांमध्ये तर एस.टी महामंडळ वाहतुकीच्या वाहनाची सुविधा सुद्धा उपलब्ध नसल्याने पायी किंवा खाजगी वाहनाचा खर्च करून शहरात यावे लागत आहे यामुळे आर्थिक भार पण मोठ्या प्रमाणात वाढत आहे, शेतकऱ्यांना सध्या पीक कर्ज मिळण्यासाठी शेतकरी विविध कागदपत्रांची जुळवाजुळव करत आहे सातबारा उतारा,उत्पन्न दाखला रहिवासी दाखला, यासारखे आवश्यक कागदपत्रासाठी त्यांना महसूल अधिकाऱ्याकडे जावे लागते मात्र संबंधित महसूल अधिकारी मुख्यालयाच्या ठिकाणी राहत नसल्याने शेतकऱ्यांना वारंवार शहरात फेऱ्या माराव्या लागत आहे. त्यामुळे शेतीची कामे बाजूला ठेवून त्यांना वेळ व पैसा खर्च करावा लागत असून मानसिक ताण सुद्धा वाढत आहे. सद्या शाळा व महाविद्यालयांचा निकाल लागत असल्याने दुसरीकडे शाळा व महाविद्यालय प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनाही जात प्रमाणपत्र, उत्पन्न दाखला,रहिवासी दाखला यासारख्या अनेक दाखल्याची गरज भासत आहे परंतु महसूल अधिकारी मुख्यालयी नसल्याने विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना देखील मोठा त्रास सहन करावा लागत आहे अनेक वेळा एकाच कामासाठी अनेक वेळा शहरात यावे लागत असल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात येत आहे, गेल्या अनेक वर्षापासून हीच परिस्थिती कायम असल्याचे स्थानिकाचे म्हणणे आहे याबाबत पण सामाजिक कार्यकर्त्यांनी व राजकीय पक्षांनी वारंवार तक्रारी करूनही ठोस कारवाई होत नसल्याने तहसील प्रशासनाच्या कार्यप्रणालीवर गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहे. शहरात महसूल अधिकाऱ्याचे कार्यालय थाटण्यात आल्यामुळे कामकाजावर परिणाम होत असल्याचे चित्र दिसत आहे.

या पार्श्वभूमीवर शेतकरी विद्यार्थी व नागरिकाकडून आता संपप्त नाराजी व्यक्त केली जात असून संबंधित महसूल अधिकाऱ्याचे कार्यालय तात्काळ त्यांच्या नेमलेल्या साजा किंवा मुख्यालयाच्या ठिकाणी स्थलांतरित करावीत अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## • वेचक



### "शिवाजी कोण होता" पुस्तकाचे सामूहिक वाचन

यवतमाळ - येथे वंचित बहुजन आघाडीच्या वतीने २९ एप्रिल (बुधवार) रोजी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, शिवतीर्थ येथे विशेष वाचन उपक्रम उत्साहात संपन्न झाला. वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांच्या सूचनेनुसार आयोजित या कार्यक्रमात कॉम्रेड गोविंद पानसरे लिखित "शिवाजी कोण होता" या पुस्तकाचे सामूहिक वाचन करण्यात आले. अलीकडेच या पुस्तकाच्या प्रकाशकाला धमकी दिल्याच्या आरोपामुळे राज्यभरात निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर,अभिव्यक्ती स्वातंत्र्य, वाचन संस्कृती आणि प्रबोधनात्मक विचारांचा प्रचार-प्रसार व्हावा, या उद्देशाने हा उपक्रम घेण्यात आला होता. या कार्यक्रमाचे नेतृत्व वंचित बहुजन आघाडीचे यवतमाळ जिल्हाध्यक्ष, तथा यवतमाळ नगरपालिकेचे गटनेते व नगरसेवक डॉ.नीरज वाघमारे यांनी केले. या उपक्रमात प्रमोद पाटील,विशाल पोले,शैलेश भानवे,अशोक कयापाक,अरविंद दिवे,सचिन मोहोड,केशव भागवत,देवानंद लोणारे,राहुल खंतडे,ॲड. संजीव इंगळे,रामदास वीर,गजानन कोकाटे,स्वप्निल कोल्हे,सुशील भगत,वामन राऊत,रवी बच्छराज,अनिल उमरे,जयंत मडावी आदींसह कार्यकर्ते,विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या उपक्रमातून वाचन संस्कृतीला चालना देण्यासोबतच सामाजिक प्रबोधनाचा ठाम संदेश देण्यात आला.


### स्वाधार' योजनेतील त्रूटी पूर्ण करण्यासाठी ५ मेपर्यंत मुदतवाढ

यवतमाळ - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सन 2025-26 या शैक्षणिक वर्षासाठी अर्ज केलेल्या, परंतु कागदपत्रांतील त्रुटींमुळे कार्यालयस्तरावर प्रलंबित असलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी दि. 5 मेपर्यंत त्रूटी पूर्ण कराव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच जे विद्यार्थी कागदपत्राची पुर्तता करणार नाही अशा विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षात सदर विद्यार्थ्यास अर्ज करता येणार नाही व तो स्वाधार योजनेपासुन वंचित राहील. असे आयुक्तालय समाज कल्याण पुणे यांनी कळविले आहे. तेव्हा स्वाधार योजने करीता विद्यार्थ्यांनी अर्ज ऑनलाईन सर्व कागदपत्रासह अपलोड करुन 5 मे पर्यंत प्रस्तुत कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी फॉर्म भरलेला आहे परंतु हार्डकॉपी अद्याप कार्यालयात सादर केलेले नाही, अशा सर्व विद्यार्थ्यांनी विहीत कालावधीत अर्ज सादर न केल्यास व सदर योजनेपासुन विद्यार्थी वंचित राहिल्यास सदर बाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांची राहील.

# पुसद दुय्यम निबंधक यांचेवर कारवाई कधी होणार

## उपविभागीय अधिकारी पुसद यांच्या पत्राला केराची टोपली!

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - येथील सह दुय्यम निबंधक श्रेणी-१ कार्यालयामध्ये श्रीमती विद्या तळेगावकर यांनी उपविभागीय अधिकारी यांच्या परवानगीविना खरेदी-विक्री परस्पर केल्याबाबत पुसद येथील काही सामाजिक कार्यकर्ते यांनी तक्रार केली. त्यानुसार उपविभागीय अधिकारी पुसद यांनी दिनांक 02/02/2026 रोजी तक्रारदार यांना बोलावून सुनावणी घेण्यात आली होती तसेच सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी यवतमाळ यांनी सुद्धा दिनांक 24/02/2026 रोजी तक्रारकर्ते यांना पत्र देऊन सुनावणी घेण्यात आली.

त्या अनुषंगाने तक्रारकर्ते यांनी दोन्ही खरेदीच्या प्रती पुरावे म्हणून दस्त सहजिल्हा निबंधक यवतमाळ यांना लेखी म्हणणे अर्जा सोबत सादर केले परंतु अद्याप पर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही असा आरोप तक्रारकर्ते यांच्या कडून करण्यात येत आहे. त्यामुळे तक्रारदार यांनी उपविभागीय अधिकारी पुसद यांना भेटून तक्रारी संदर्भात विचारणा केली असता त्यांनी दिनांक 24/03/2026 रोजी सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी यवतमाळ यांना पत्र पाठवून कारवाई करण्यासंदर्भात लेखी कळविले आहे आणि केलेल्या कारवाईचा अहवाल उपविभागीय अधिकारी पुसद कार्यालयात पाठविण्यात यावे व परस्पर तक्रारकर्ते यांना कळविण्यात यावे. असे लेखी पत्राद्वारे कळविले आहे. परंतू अद्याप पर्यंत जिल्हा सहनिबंधक यवतमाळ यांनी कोणतीही कारवाई न करता उपविभागीय अधिकारी यांच्या पत्राला केराची टोपली दाखवून दुय्यम निबंध पुसद यांना खरेदी व विक्रीचे गैरप्रकार करण्यासाठी मोकळे सोडले आहे का? असा संतप्त प्रश्न तक्रारकर्ते यांनी उपस्थित केला आहे. सदर कारवाई उपविभागीय अधिकारी यांच्या अधिकारात असल्याचे दिसून येते परंतु सह दुय्यम निबंधक पुसद येथील श्रीमती विद्या तळेगावकर यांना वाचवण्याचा प्रयत्न होतआहेका? असा आरोप सुद्धा करण्यात येत आहे. त्यामुळे हा जाणून बुजून दिशाभूल करण्याचा व कारवाई न करण्याचा प्रकार सुरू आहे असे तक्रारकर्ते याच्याकडून बोलल्या जात आहे. त्यामुळे तक्रारकर्ते हे जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ येथे पुढील आठवड्यात उपोषणास बसण्याच्या तयारीत आहे, त्यामुळे सदर प्रकरणात उपविभागीय अधिकारी यांनी सह जिल्हा निबंधक यवतमाळ यांना दिलेल्या पत्रावर कोणत्या प्रकारे कारवाई करतात किंवा नाही याकडे पुसद तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# भीम चषक पर्व 2..! थरारक लढतीत व्ही.एस. कंपनीचे अजिंक्यपदावर मोहोर

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - परिसरातील क्रिकेटप्रेमींना रोमांचित करणारी भीम चषक पर्व 2 क्रिकेट स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरित्या पार पडली. अंतिम सामन्यात व्ही.एस. कंपनी संघाने दमदार कामगिरी करत पँथर 11 संघावर दणदणीत विजय मिळवून अजिंक्यपद पटकावले, तर पँथर 11 ला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

अंतिम सामन्यात नाणेफेक जिंकून व्ही.एस. कंपनीने प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. पँथर 11 संघाने प्रथम फलंदाजी करत 76 धावांचे आव्हान उभे केले. मात्र, हे लक्ष्य व्ही.एस. कंपनी संघाने केवळ 7 षटकांत 1 गडी गमावून सहज गाठत 9 गड्यांनी विजय साकारला. सामन्याचा हिरो ठरलेल्या कुणाल ठोंबरे यांनी 29 चेंडूत 54 धावांची झंझावाती खेळी करत विजयात सिंहाचा वाटा उचलला. स्पर्धेतील विजेत्या व्ही.एस. कंपनी संघाला भीम चषक आयोजन समितीकडून 2 लाख रुपये रोख पारितोषिकासह आकर्षक ई-बाईक प्रदान करण्यात आली. ही बक्षिसे संघमालक सिद्धार्थ गायकवाड व विकी अवतरे यांच्या हस्ते देण्यात आली. उपविजेत्या पँथर 11 संघाला विविध मान्यवरांच्या हस्ते 1 लाख रुपये रोख पारितोषिक देण्यात आले, तर तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या भवानी चौधरी 11 संघाला 50 हजार रुपयांचे बक्षीस मिळाले. वैयक्तिक पुरस्कारांमध्ये उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून प्रवीण उईके, उत्कृष्ट गोलंदाज गौरव उईके, उत्कृष्ट फलंदाज कुणाल ठोंबरे आणि मालिकावीर म्हणून गणेश मडावी यांना गौरविण्यात आले. याशिवाय काही खेळाडूंना आकर्षक सायकली देऊन विशेष सन्मान करण्यात आला. समारोप सोहळ्याला ध्वनिका मांगुळकर यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. तसेच आयोजक, सहकार्य करणारे मान्यवर आणि डब्ल्यू. डी. झेड. लाईव्ह युट्युब ब्रॉडकास्टिंग टीमच्या सदस्यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजन समितीचे सर्वत्र कौतुक होत असून, भीम चषक पर्व 2 ने क्रिकेटप्रेमींना थरारक सामने आणि अविस्मरणीय क्षणांची मेजवानी दिली.

# एमपीजेचे पाणी हक्क अधिकार अभियान ; राज्यव्यापी अभियानाला सुरवात

**जनमाध्यम प्रतिनिधी**



उमरखेड - मुव्हमेन्ट फॉर पीस अँन्ड जस्टीस फॉर वेलफेअर (एमपीजे ) या नागरिकांच्या अधिकारा प्रति कार्य करणाऱ्या सामाजिक संघटने तर्फे राज्यभर "पाणी हक्क अधिकार अभियान "राबविण्यात येत आहे.

महाराष्ट्रातील पाण्याची परिस्थिती एक विरोधाभास बनली आहे – काही ठिकाणी नद्या वाहत आहेत, तर इतर ठिकाणी नळ कोरडे आहेत. महाराष्ट्र राज्य जल धोरण (२०१९) सारख्या सर्वसमावेशक आराखड्यांनंतरही, एक मोठा लोकसमुदाय अजूनही पाणी असुरक्षिततेचा सामना करत आहे.ग्रामीण आणि शहरी गरीब भागांमध्ये टँकरवरील अवलंबित्व वाढत आहे. पाणी हे केवळ एक संसाधन नाही, तर जीवन, आरोग्य आणि प्रतिष्ठेशी निगडित एक मूलभूत हक्क आहे. जमिनीवरील वास्तव -महाराष्ट्राच्या अनेक भागांमध्ये पाण्याची टंचाई हा रोजचा संघर्ष बनला आहे .मराठवाड्यातील महिला पाणी आणण्यासाठी दररोज २-५ किलोमीटर चालतात. राज्यात अनेक गावांना ३-४ महिने टँकरमधून पाणी मिळते .मुंबई - पुण्यातील झोपडपट्ट्यांमधील लोकांना दररोज कमी पाणी मिळते.ही परिस्थिती केवळ पाण्याची टंचाईच नव्हे, तर असमान वितरण आणि व्यवस्थापनाची समस्या देखील दर्शवते. संविधानाच्या अनुच्छेद २१ (जीवनाचा हक्क) अंतर्गत पाणी हा एक मूलभूत हक्क आहे, याबद्दल जागरूकता निर्माण करणे, लोकांना राज्य जल धोरणातील तरतुदींबद्दल माहिती देणे, पाण्याच्या गरजांचे सर्वेक्षण करणे, सरकारसोबत संवाद आणि उत्तरदायित्व सुनिश्चित करणे, समुदाय आणि प्रशासन यांच्यातील संवाद मजबूत करणे असून जनजागृती मोहीम, सभा ,जल हक्क आणि धोरणाचे सोप्या भाषेत स्पष्टीकरण, नागरिकांच्या चिंता समोर आणणे,स्थानिक प्रशासन आणि प्रसारमाध्यमांचा सहभाग, तक्रारींचे दस्तऐवजीकरण, प्रसारमाध्यमे आणि डिजिटल मोहीम, प्रसिद्धीपत्रके आणि लेख ,प्रशासनाशी संवाद जिल्हाधिकारी आणि नगरपालिकांना निवेदन आदी उपक्रम अभियाना अंतर्गत करण्यात येणार आहे.

# नगरपालिकेच्या अस्थायी सफाई कामगारांना प्रथमच १ मे रोजी पगारी सुट्टी

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - कामगार दिनाच्या पार्श्वभूमीवर यवतमाळ नगरपालिकेतील अस्थायी सफाई कामगारांसाठी यंदाचा १ मे विशेष ठरणार आहे. वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष तथा नगर परिषद गटनेते, नगरसेवक डॉ.नीरज वाघमारे यांच्या ठोस पाठपुराव्यामुळे यंदा प्रथमच या कामगारांना पगारी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

डॉ. वाघमारे यांनी दिनांक ३० एप्रिल २०२६ रोजी यासंदर्भात अधिकृत निवेदन सादर केले होते. या निवेदनाची दखल घेत सरकारी कामगार अधिकारी,यवतमाळ यांनी मुख्याधिकारी,नगर परिषद यवतमाळ यांना पत्र पाठवून महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (रोजगार व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम,२०१७ च्या कलम १८ (७) अन्वये आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. विशेष म्हणजे, यवतमाळ नगरपालिकेच्या इतिहासात आतापर्यंत १ मे रोजी सफाई कामगारांना कधीही सुट्टी देण्यात आलेली नव्हती. मात्र, यंदा प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेत कामगारांच्या हक्काचा सन्मान राखत पगारी सुट्टी जाहीर केली आहे. या निर्णयामुळे सफाई कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून,डॉ.नीरज वाघमारे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळेच हा निर्णय शक्य झाल्याची भावना कामगारांमध्ये व्यक्त होत आहे. कामगार दिनी कामगारांना सुट्टी मिळावी यासाठी नीरज वाघमारे यांनी उचललेले हे पाऊल निश्चितच प्रशंसनीय ठरत आहे.

## राष्ट्रध्वजाचा सन्मान राखा; जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

यवतमाळ - स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक व महाराष्ट्र दिन राज्यभर साजरा करण्यात येतात. यावेळी राष्ट्रध्वजाचा उचित सन्मान व्हावा हे प्रत्येक सुजाण नागरिकांचे कर्तव्य आहे. त्यामुळे 1 मे महाराष्ट्र दिनी प्लॅस्टीक ध्वजाचा वापर करु नये. राष्ट्रध्वज म्हणजे राष्ट्राची अस्मिता होय. त्यामुळे राष्ट्रध्वजाचा अवमान होता कामा नये. राष्ट्रध्वजाचा योग्य मान राखण्यासाठी जनजागृती करणे आवश्यक असल्याने स्वयंसेवी संस्था, विद्यार्थी, सुजाण व जागरुक नागरिक, ग्रामपंचायत, महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, आरोग्य संस्था, सर्व खाजगी संस्था यांनी स्थानिक पोलीस यंत्रणेच्या मदतीने अशा प्रकारे प्लॅस्टीकच्या राष्ट्रध्वजाचा वापर होणार नाही याबाबत काळजी घ्यावी तसेच विक्रेत्यांनी प्लॅस्टीकच्या राष्ट्रध्वजाची विक्री करु नये.

# आंतरराष्ट्रीय मानवाधिकार जनजागृतीचा ध्यास

## राष्ट्रीय कार्यकारिणीचा महाराष्ट्र दौरा यशस्वी, यवतमाळात दमदार स्वागत

**जनमाध्यम प्रतिनिधी**




यवतमाळ - प्रखर उन्हाच्या तडाख्यातही मानवाधिकार जनजागृतीचा ध्यास घेत आंतरराष्ट्रीय मानवाधिकार असोसिएशन, नवी दिल्लीच्या सन्माननीय राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्यांनी महाराष्ट्र दौरा यशस्वीपणे पूर्ण करत आज यवतमाळात आगमन केले. त्यांच्या या जिद्दी व समर्पित कार्याचे शहरात उत्साहात स्वागत करण्यात आले.

यावेळी यवतमाळ जिल्हाध्यक्ष विवेक वानखडे यांच्या सह सर्व पदाधिकारी यांनी राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांचे फुलगुच्छ देऊन स्वागत करत त्यांच्या अथक परिश्रमांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये प्रत्यक्ष जाऊन मानवाधिकारांविषयी जागृती निर्माण करण्यासाठी त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय ठरले आहे. या पार्श्वभूमीवर यवतमाळ येथील स्थानिक विश्रामगृहात आयोजित छोटेखानी पण प्रभावी कार्यक्रमात राष्ट्रीय अध्यक्ष विलासजी कांबळे यांनी उपस्थित सभासदांना मार्गदर्शन केले. "मानवाधिकार चळवळ केवळ कागदोपत्री न राहता ती प्रत्येक गाव-गल्लीपर्यंत पोहोचली पाहिजे," असे स्पष्ट मत त्यांनी मांडले. तसेच जिल्ह्यात संघटनेचा विस्तार मोठ्या प्रमाणात करण्याची जबाबदारी सर्व सभासदांवर सोपवण्यात आली. कार्यक्रमाला राष्ट्रीय व राज्य कार्यकारिणीचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. यामध्ये राष्ट्रीय अध्यक्ष विलासजी कांबळे, राष्ट्रीय महासचिव शैलेश पाटील, कोषाध्यक्ष भालेराव बडगेवार, सहसचिव सुधीर रामटके, ज्येष्ठ सदस्य अनुप कुमार भार्गव, कार्यालयीन सचिव सुनील कुरैवार यांच्यासह मकसूद अली, नितीन भुसरेडी, विजय बुंदेला, रविष वाघ, विजय मालखेडे, शेख शाकीर, सय्यद मतीन, दिनेश पाटील, विशाल बावनथडे,दिनेश वाघमारे, बेताब शायर,भीमराव गणवीर, रोशन सावंत आदींची उपस्थिती होती. मोठ्या संख्येने आंतरराष्ट्रीय मानवाधिकार असोसिएशनचे सभासद या कार्यक्रमाला उपस्थित राहिले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विवेक वानखेडे यांनी प्रभावीपणे केले, तर आभार प्रदर्शन शेख शाकीर यांनी व्यक्त केले.

# माथार्जुनमध्ये थेट जनतेतून सरपंचपदी निर्मला जलपत कुमरे विजयी ; चुरशीच्या लढतीत ३१ मतांनी बाजी

**जनमाध्यम प्रतिनिधी**



झरीजामणी - तालुक्यातील माथार्जुन गावात थेट सरपंच पदासाठी झालेली पोटनिवडणूक दि. २८ रोजी शांततेत पार पडली. या निवडणुकीत एकूण २०६५ मतदारांपैकी १५२७ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. प्रभाग क्रमांक १ मध्ये ४७२, प्रभाग क्रमांक २ मध्ये ५४९ तर प्रभाग क्रमांक ३ मध्ये ५०६ असे मतदान झाले.

दि. २९ रोजी पार पडलेल्या मतमोजणीत निकाल जाहीर करण्यात आला. प्रभागनिहाय मतमोजणीमध्ये प्रभाग क्रमांक १ मध्ये उज्वला संतोष तुमराम यांना ९८, निर्मला जलपत कुमरे यांना १८८ तर प्रमिला पुंडलिक मसराम यांना १७८ मते मिळाली. प्रभाग क्रमांक २ मध्ये उज्वला संतोष तुमराम यांना ५०, निर्मला जलपत कुमरे यांना २०८ तर प्रमिला पुंडलिक मसराम यांना २७५ मते मिळाली. प्रभाग क्रमांक ३ मध्ये उज्वला संतोष तुमराम यांना १११, निर्मला जलपत कुमरे यांना २३७ तर प्रमिला पुंडलिक मसराम यांना १४९ मते मिळाली. एकूण मतांची बेरीज करता उज्वला संतोष तुमराम यांना २५९, निर्मला जलपत कुमरे यांना ६३३ तर प्रमिला पुंडलिक मसराम यांना ६०२ मते मिळाली. याशिवाय ३३ मतदारांनी 'नोटा'चा पर्याय निवडला. अत्यंत चुरशीच्या या लढतीत निर्मला जलपत कुमरे यांनी प्रमिला पुंडलिक मसराम यांचा ३१ मतांनी पराभव करत सरपंचपदावर विजय मिळवला. त्यांच्या विजयामुळे गावात जल्लोषाचे वातावरण असून समर्थकांकडून आनंद व्यक्त करण्यात येत आहे.

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# जनतेचे नेते- आ.प्रवीण तायडे



सामान्य कुटुंबात जन्म होऊन समाजसेवेचा वसा अविरतपणे सुरू ठेवत सामान्यांच्या हक्कासाठी, मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहणारे अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे. त्यांनी गेल्या दीड वर्षापूर्वी संपन्न झालेल्या विधानसभा निवडणुकीत ऐतिहासिक विजय मिळवून आतापर्यंत आमदार म्हणून केलेल्या दमदार कामगिरीमुळे संपर्ण राज्यात नव्हे तर देशात वेगळी ओळख निर्माण केली आहे.अचलपूर मतदार संघाचा विधानसभा सदस्य म्हणून प्रतिनिधित्व करीत असताना आ.प्रवीण तायडे यांनी कधी मील कामगारांच्या थकीत वेतनसाठी केलेला ठिय्या आंदोलन असो परतवाडा शहरातील व्हायरल अश्लील व्हिडिओ व फोटो प्रकरणात सर्व प्रथम अचलपूर पोलिस उपविभागीय अधिकारी यांच्या दालनात केलेला ठिय्या आंदोलन सर्वांच्या स्मरणात आहे. आ.प्रवीण तायडे यांच्या आक्रमक पवित्रामुळे त्या आरोपीविरुद्ध पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल झाला होता.आणि जनसेवा दरबार,आरोग्य शिबीर आणि रोजगार मेळाव्याचा माध्यमातून शेतकरी, मजूर, कामगार,महिला मंडळी,तरुण वर्ग, ज्येष्ठ नागरिकांचा समस्या, तक्रारी मार्गी लावून आजपर्यंत सामान्य जनतेचा आवाज म्हणून सर्वीकडे अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे परिचित आहे.

आ.तायडे यांच्या पाठपुराव्यामुळे शासनाने अचलपुरात अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयाला सुद्धा मंजुरी दिली आहे.गेल्या दीड वर्षात अचलपूर मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी मतदारसंघातील विविध प्रलंबित प्रश्न संदर्भात सुद्धा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, अमरावती चे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे विविध निवेदन सुद्धा सादर केले. आ. तायडे यांच्या पाठपुराव्यामुळे अनेक प्रलंबित प्रकल्प मार्गी सुद्धा लागले आहे. ते.दर गुरुवारी अचलपूरमध्ये तर शुक्रवारी चांदुर बाजार येथील जनसंपर्क कार्यालयात हजर राहतात व जनतेच्या आलेल्या समस्या,तक्रारीचे तात्काळ निराकरण करतात.

गेल्या वर्षी झालेल्या स्थानिक स्वराज्य निवडणुकीत अचलपूर नगर परिषद नगराध्यक्षपदी भाजपा पक्षाचे रुपाली माथने यांचा विजय झाला होता.आणि या निवडणुकीत उमेदवारांना विजयी करण्यासाठी आ.प्रवीण तायडे यांनी प्रचाराची धुरा यशस्वीरित्या सांभाळली. कोल्हा येथील रहिवाशी असणारे आ.प्रवीण तायडे यांचा कुटुंबाची कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना सामान्य कार्यकर्ता म्हणून त्यांनी समाजकारण व राजकारणात सुरुवात केली. भारतीय जनता पक्षामध्ये त्यांनी प्रवेश केला.जिल्हा परिषद निवडणुकीत दरम्यान भारतीय जनता पक्षाने शेवटच्या टप्प्यात त्यांना बी फार्म देऊन उमेदवारी निश्चित केली होती.त्यावेळी सुद्धा आमदार प्रवीण तायडे यांनी जिल्हा परिषद निवडणुकीत अनेक दिग्गज नेत्यांना पराभूत करून विजय खेचून आणला होता. आणि त्याचा विश्वासावर त्यांना विधानसभा निवडणुकीत उमेदवारी देण्यात आली. यावेळी सुद्धा त्यांनी दिग्गज नेते मंडळींना पराभूत करून विधानसभा सदस्य पदावर विजय मिळवला आहे.

अचलपूर तालुक्यातील कुस्तीपटूंना देशपातळीवर संधी उपलब्ध व्हावी यासाठी श्री जगदंबा देवी व्यायाम शाळेत मॅटची सुविधा ही उपलब्ध करून दिली.जिल्हा स्त्री व बाल रुग्णालय आणि जिल्हा ग्रामीण रुग्णालय निर्मितीचा आढावा घेत रुग्णांना सर्व सुविधा उपलब्ध करण्याचा सूचना सुद्धा अनेक वेळी आ.प्रवीण तायडे यांनी संबंधित आरोग्य अधिकारी यांना दिल्या आहे.यामुळे आज दोन्ही रुग्णालयात अनेक तपासणीची सुविधा उपलब्ध झालेली आहे. रेडिओलॉजिस्ट अभावी शोभेची वस्तू बनलेल्या अचलपूर येथील सोनोग्राफी केंद्र मध्ये रेडिओलॉजिस्ट पदी कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. जुळ्या शहराच्या सर्वांगीण विकासासह मतदारसंघातील विकास कामासाठी कोट्यावधी रुपयाचा शासनाकडून मंजूर केलेल्या निधीतून अनेक विकासकामे प्रगतीपथावर आहे .सोबतच चार रुग्णवाहिका उपलब्ध करून दिलेल्या आहे. आ.प्रवीण तायडे यांच्या प्रयत्नातून अचलपूर तहसील कार्यालयात दुय्यम सहनिबंधक कार्यालयाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

दीड वर्षाच्या कार्यकाळातच आ.प्रवीण तायडे यांनी अचलपूर नगरपरिषद प्रशासन,उपविभागीय कार्यालय,तहसील कार्यालय पंचायत समिती विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, आरोग्य विभाग यांची वेळोवेळी बैठक घेऊन विविध समस्या,तक्रारी सामान्य माणसाच्या मार्गी लावल्या आहे.अचलपूर व चांदूर बाजार तालुक्यातील वादळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात शासनाकडून अनुदान जमा करण्या साठी आ.प्रवीण तायडे यांनी शासन स्तरावर महत्वूर्ण भूमिका बजावली आहे.यामुळे हजारो शेतकऱ्यांच्या खात्यात २०२४-२५ मध्ये पिकांचे झालेल्या नुकसानीचे अनुदान खात्यात जमा झाले आहे.बहिरम यात्रेत गेल्या दोन वर्षापासून तीन दिवसीय आमदार हिंद केसरी जंगी शंकर पटाचे आयोजन केले जाते.परतवाडा शहरातील गुजरी बाजार असो करजगाव येथे पोलिस चौकीला मान्यता मिळाली असून याचे पूर्ण श्रेय आ.प्रवीण तायडे यांना जाते. तरुण वर्गाला रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हावी यासाठी कल्याण मंडपममध्ये संपन्न झालेल्या महारोजगार मेळाव्यातून जवळपास १५०० तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली होती. आज आ.प्रवीण तायडे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.आ.तायडे यांनापुढील यशस्वी वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा....

**-प्रफुल बर्वे**
भाजपा पदाधिकारी,
अचलपूर

कर्तव्याचा सन्मान

# प्रशांत देशमुख यांना विद्यापीठाचा उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार



अमरावतीच्या इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालयातील अधिक्षक, सर्वश्रुत व्यक्तिमत्वाचे धनी, परम मित्र प्रशांत देशमुख यांना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा उत्कृष्ट सेवागौरव पुरस्कार घोषित झाला ही माझ्यासाठी अत्यंत अभिमानाची बाब होय. प्रशांतभाऊ, कर्तव्याची परिसिमा गाठतांनाच आज आपणास संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा अत्यंत मानाचा सेवागौरव पुरस्कार प्राप्त झाला. आपल्या आयुष्यातील हा परमोच्च क्षण होय. जिद्द आणि कर्तव्याच्या बळावर आपण आपल्या जीवनाची बाग समृद्ध करत बहरवित नेली. आज या बागेत कौतुकाची फुले उमलली. जाई जुईची शोभा सदाफुलीला येत नाही अन्, सूर्याची आभा लपत नाही, असेच आपले व्यक्तिमत्व, गुणवत्ता ही कधी लपून राहिली नाही.

बोरी ता.चांदूररेल्वे या लोकविरळ गावात आपला जन्म झाला. शिक्षणानंतर स्व. डी. के. उपाख्य राजाभाऊ देशमुख यांचे आशीर्वाद आपणास लाभले व अमरावतीच्या विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीच्या चांदुररेल्वे येथीलच महिला महाविद्यालयात आपण मुख्य लिपिक पदावर कार्यरत झालात आपले कार्यालयीन कामकाज निष्ठेने पार पाडत समंजसवृत्तीने आपण सगळ्यांची मने जिंकली. त्यामुळे महाविद्यालयाचे नियमीत प्रशासकीय कामकाज सुरळित सुरू झाले. आपल्या चिकित्सक व सूक्ष्म निरिक्षण दृष्टीने महाविद्यालयाला यथोचित लाभ मिळाले.विद्यापीठ असो, सहसंचालक कार्यालय असो येथे आपल्या कार्याची निपुणता व नियमीतता जाणल्या गेली. आपले सदैव सहकार्य या प्राधिकरणाला मिळत गेले. आजही आपली कामावरील निष्ठा सर्वश्रुत आहे. सलग २५ वर्षे महिला महाविद्यालय चांदूर येथे सेवा देऊन आपण अमरावतीच्या इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय येथे २०१८ साली रूजू झालात. आपला दांडगा अनुभव येथेही कामी आला. माझे कार्यालय संगणीकिकृत व अत्याधुनिक असावे ही आपली दृष्टी येथेही लक्षात आली. निटनेटकेपणा व आस्थापनांची मांडणी, प्रत्येक कामाची पारदर्शकता यामुळे इतर कर्मचाऱ्यांच्याही कामाचा उत्साह व कामाची गती वाढली. आपण महाविद्यालयीन नॅक समितीचे सदस्य आहात त्यामुळे नॅकची आव्हाने आपण जाणून आहात याचा फायदा महाविद्यालयाला झाला. येणारे नवनवीन परिपत्रके व जि.आर.यांचे बारकाईने अवलोकन करून व वरिष्ठांशी चर्चा करून कामकाज पुढे नेण्याची आपली हातोटी महत्वाची आहे.

महाविद्यालया व्यतिरिक्त बाह्यक्षेत्रातही आपले कार्य उल्लेखनीय आहे. मोठा जनसंपर्क व मित्रपरिवार आहे. एक उत्तम सल्लागार व मित्र म्हणून आपली ख्याती आहे. अडचणीच्या वेळी अर्ध्यारात्री कुणाच्याही कामी पडणे हा आपला स्वभाव आहे. आजवर कितीतरी लोकांच्या कार्यालयीन कामकाजातील अडचणी आपण सोडविल्या आहेत. महराष्ट्र राज्य महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचारी महासंघाचे उपाध्यक्ष, अमरावती जिल्ह्याचे अध्यक्ष आपण राहिलात. संघटनेच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांचे अनेक प्रश्न आपण निकाली काढलेत.

'ठेविले अनंते तैसेची राहावे, चित्ती असू द्यावे समाधान' या न्यायाने आपण इतरांचे कल्याण करीत राहिलात. समाधानाची सरिता आपल्या आयुष्यात वाहत राहिली ती परोपकारामुळेच...आज आपल्याला पुरस्कार मिळाला पण यासाठी प्रस्ताव टाकण्यास मित्रांनीच पुढाकार घेतला हे विशेष! कारण आपण यापूर्वी सातत्याने मित्रांचे प्रस्ताव स्वत: पुढाकार घेऊन पुढे पाठविलेले आहेत.चांगल्या कामासाठी त्यांना प्रोत्साहित केले आहे.

जीवनात अनेकदा निकराचे प्रसंग येतात पण संघर्षाच्या काळातही आपण आपल्या मनाचा तोल ढळू न देता निष्ठेने कार्य करीत राहिलात. 'एखादया विस्तीर्ण वटवृक्षाने आपल्या परिघात दयावा कित्येकांना सहारा अन् लागू देऊ नये तळ कुणालाही सोसत असलेल्या प्रयत्नांचा' याप्रमाणे आपले कार्य आहे. विद्वता, कर्तृत्व आणि समानतेचे अद्भूत तत्व आपल्यामध्ये सामावलेले आहे. सुख संपन्नता, ऐश्वर्यानी भरलेल्या या तुडूंब सरोवराचे झरे आपल्या समर्पणाच्या सरोवरातून निघालेले आहेत. आपल्या अंतरीचा स्नेहभाव, धैर्यशीलता अन् निस्पृह कर्तव्य दक्षता कायम आपल्यावर यशश्रीच्या अक्षता टाकत राहिली. म्हणूनच महाविद्यालयाचे,आपल्या परिवाराचे हे गोकूळ आता संपन्नतेच्या प्रांगणात मुक्तपणे आनंदात विहार करते आहे. आपल्या सुविद्य पत्नी शिक्षिका पेशा उत्तमरित्या सांभाळत असून आपले सुपूत्र एम.एस. झाले आहेत व यू. एस. मध्ये सॉफ्टवेअर इंजिनियर म्हणून कार्यरत आहेत तर कन्या एम.बी.ए. पर्यंत उच्च शिक्षित आहेत..हेच आपले खरे वैभव आहे. मी आपल्या निरामय आयुष्याची कामना करत असतांनाच आपणास सुखी समृद्ध अन् शांततामय जीवनाच्या

अनेकोत्तम शुभेच्छा आपणास देतो व आपला आज जो सन्मान होणार आहे त्यासाठी आपले अभिनंदनही करतो!!

आपले आयुष्य असेच समाजकल्याणार्थ कामी येवो. आपले सुदृढ आरोग्य असेच निरामय राहो, ऐश्वर्य, सुख, समृद्धी कायम आपल्या दारी विराजमान होवो, हीच प्रभुचरणी प्रार्थना!

पुनश्च शुभेच्छा!!!

**जयंत वसंतराव निखारे**
आर.डी.आय.के.व
के.डी.महाविद्यालय, बडनेरा
मो.९४२२५४९२९३

# चांदुर रेल्वेचा विकास ठप्प



**चांदुर रेल्वे/वार्ताहर**

शहराच्या विकासाला ब्रेक लागल्याची धक्कादायक चर्चा सध्या नागरिकांमध्ये जोर धरत आहे. नव्याने निवडून आलेल्या नगरपरिषदेकडून मोठ्या अपेक्षा ठेवणाऱ्या जनतेसमोर आता निराशेचे चित्र उभे आहे.

एकीकडे सुमारे १ कोटी रुपयांचे 'नमो उद्यान' मंजूर होऊनही त्यावर अचानक स्टे आल्याने विकास प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. हा स्टे नेमका कसा आला? कोणाच्या दबावाखाली निर्णय घेतले जात आहेत? याबाबत नागरिकांमध्ये संभ्रमाचं वातावरण आहे.स्थानिक पातळीवर अशी चर्चा रंगत आहे की, शहरातील राजकीय घडामोडींमध्ये एक 'मास्टर माईंड' सक्रिय आहे. हा गूढ व्यक्ती स्वतः पुढे न येता, नगरपरिषदेमध्ये अंतर्गत वाद निर्माण करून विकासकामांना अडथळे आणत असल्याचा आरोप केला जातो. नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांमध्ये मतभेद वाढत असल्याने त्याचा थेट परिणाम शहराच्या प्रगतीवर होताना दिसतो.नागरिकांनी विश्वासाने निवडून दिलेल्या नेतृत्वाकडून अपेक्षित असलेला विकास मात्र अजूनही दूरच दिसतो आहे. रस्ते, सुविधा, प्रकल्प याबाबत ठोस कामगिरी न झाल्याने लोकांमध्ये नाराजी वाढते आहे. सामान्य जनता सर्व काही जाणून असूनही उघडपणे बोलण्यास कचरते, अशीही भावना व्यक्त होत आहे.

# मराठी भाषा विद्यापीठाच्या यशस्वी वाटचालीचा बिगुल विधानसभेपर्यंत

## तीन आमदारांसह महाराष्ट्र विधानमंडळ अवर सचिव यांचा विद्यापीठात पाहणी दौरा

**अमरावती/का.प्र.**

मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर येथे महाराष्ट्र विधानसभेचे आमदार अर्जुन खोतकर(जालना),आमदार बालाजी कल्याणकर( नांदेड), आमदार कैलास पाटील(उस्मानाबाद) तसेच महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे अवर सचिव दामोदर गायकर आदी पदाधिकाऱ्यांनी रिद्धपूर येथील मराठी भाषा विद्यापीठाची पाहणी केली.



रिद्धपूर येथे विद्यापीठात आगमनानंतर लगेच मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर परिसरात उपस्थित सर्व आमदार यांच्या हस्ते विद्यार्थ्यांच्या सहकार्याने वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर आमदार महोदय यांनी विद्यापीठ परिसरातील कामकाजाची पाहणी करत आढावा बैठक घेतली. मराठी भाषा विद्यापीठातील अमराठी भाषिकांसाठी चालणारे प्रमाणपत्र अभ्यासक्रम महाराष्ट्रातील सर्व प्रशासकीय अमराठी कर्मचाऱ्यांसाठी अनिवार्य करण्यात येईल असे आश्वासन आमदार महोदयांनी मराठी भाषा विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. कोमल ठाकरे यांना बैठकी प्रसंगी दिले. मराठी भाषा विद्यापीठाचे कला व साहित्य प्रशालाचे अधिष्ठाता डॉ. कोमल ठाकरे यांनी सन्माननीय आमदार महोदय अर्जुन खोतकर(जालना), मा. आमदार बालाजी कल्याणकर( नांदेड), आमदार कैलास पाटील( उस्मानाबाद) तसेच अखिल भारतीय महानुभाव परिषदेचे अध्यक्ष, महंत कारंजेकर बाबा यांचा शाल व पुस्तक भेट देऊन विद्यापीठाच्या वतीने सन्मान केला. याप्रसंगी स्थानिक प्रशासकीय यंत्रणा, मराठी भाषा विद्यापीठाचे प्राध्यापकवृंद, सर्व कर्मचारी, व विद्यापीठातील विद्यार्थी उपस्थित होते.

# १२ ग्रामपंचायतींमध्ये ५ सरपंच, ८ सदस्य विजयी

## निकालानंतर गावांत जल्लोष

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यात १२ ग्रामपंचायतींमध्ये मतमोजणी पार पडली. निकालानंतर गावांत उत्साहाचे वातावरण पाहावयास मिळाले.

जिल्ह्यात नऊ तालुक्यांतील १२ गावांमध्ये १३ जागांसाठी मंगळवारी प्रत्यक्षात निवडणूक घेण्यात आली. बुधवारी सकाळी १० वाजतापासून

तालुकास्तरावर मतमोजणीला सुरूवात करण्यात आली. दुपारी अडीच वाजेपर्यंत मतमोजणी आटोपली होती. यामध्ये ५ सरपंच व ८ सदस्यांच्या विजयानंतर गावांत जल्लोष पाहावयास मिळाला.

यापुर्वी एकही नामांकन प्राप्त न झाल्याने दोन सरपंच व ३२ सदस्य अविरोध झाले आहेत. त्यामुळे आता रिक्त पदांवर सरपंच, सदस्यांच्या ४७ जागा भरल्या आहेत. मात्र या पोटनिवडणुकीत

सरपंच पदाकरिता दोन व सदस्यांच्या ५५ अशा ५७जागांवर एकही अर्ज प्राप्त न झाल्याने त्या रिक्तच राहल्या आहेत. त्यामुळे या जागांसाठी आता पुन्हा पोटनिवडणूक लावावी लागणार आहे.

**विजयी उमेदवार**

**सदस्य** - गिरिश अंबादास तुरखडे, जवळा ब्रु. (अंजनगाव सुर्जी), नानकराम मंगल पाटेकर, भोंडीलावा (धारणी), राजेंद्र शिवराम रामटेके, सावनेर (नांदगाव खंडेश्वर), मनीषा त्र्यंबक भटकर, शिवणी ब्रू (भातकुली), रवींद्र विनायक बोरकर, खोलापूर (भातकुली), सैय्यद आरिफ सैय्यद सादीक, खोलापूर (भातकुली), देवेश दिलीप मोहोड, मनिमपूर (मोर्शी), सुधीर श्रीवंत कावरे, डोंगरगाव, (दर्यापूर)

**सरपंच** - नारायन चन्नी सावलकर, खापरखेडा (धारणी), अक्षय रामेश्वर रादाशिंबे, हरीसाल (धारणी), अश्विनी धीरज इंगाले, वणी ममदापूर (तिवसा), अनूराधा बाबाराव बेलसरे, गौरखेड बाजार (चिखलदरा), रिता गोपाळ वडतकर चांदूरवाडी (चांदूर रेल्वे)



**७४८४ मतदारांनी केले मतदान**

१२ ग्रामपंचायतींमध्ये १३ जागांसाठी मंगळवारी मतदान पार पडले. सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० दरम्यान १३ हजार ५७६ मतदारांपैकी एकूण ७,४८४ मतदारांनी मतदानाचा हक्क बजाविला. यामध्ये ३५२२ महिला तर ३९६२ पुरूष मतदारांचा समावेश होता. याची टक्केवारी ५५.१३ टक्के आहे.

# ७ ते २६ मे दरम्यान 'शून्य सावली'

**अमरावती :** निसर्गाच्या चमत्कारांची मालिका अखंड सुरू असते, मात्र त्यातील काही घटना मानवी कुतूहलास साद घालणाऱ्या ठरतात. असाच एक २६ रोमांचकारी अनुभव आगामी ७ मे ते २६ मे दरम्यान ठिकठिकाणी घेता येणार आहे. या दिवसात भरदुपारी ठीक १२ वाजता तुमची सावली गायब होणार असून, या अनोख्या खगोलीय घटनेला 'शून्य सावली दिवस' म्हणून ओळखले जाते. मे या कालावधीत संपूर्ण महाराष्ट्रात

कर्कवृत्त आणि मकरवृत्त या दोन काल्पनिक रेषांच्या दरम्यान असलेल्या प्रदेशातच वर्षातून दोन वेळा असा अनुभव घेता येतो. सूर्याची किरणे या पट्ट्यात लंबवत पडत असल्याने सरळ उभ्या असलेल्या कोणत्याही वस्तूची सावली यावेळी दिसत नाही. शून्य सावलीचा अनुभव घेण्यासाठी कोणत्याही सपाट पृष्ठभागावर एखादा दंडगोल, पेन्सिल किंवा बाटली अगदी सरळ उभी ठेवावी. दुपारी १२ च्या सुमारास तिची सावली हळूहळू कमी होत जाईल आणि ठीक १२ वाजता ती सावली पूर्णपणे नाहीशी झालेली दिसेल, या खगोलीय घटनेचा अनुभव घेण्याचे आवाहन मराठी विज्ञान परिषदेचे प्रवीण गुल्हाने व हौसी अभ्यासक विजय गिरोळकर यांनी केले आहे.

**कोणत्या दिवशी कोणत्या जिल्ह्यात...**

७ मे रोजी कोल्हापूर, सांगली, मिरज, त्यानंतर १० ला रोजी सातारा, ११ ला रोजी वाई, महाबळेश्वर, १३ ला रोजी लातूर आणि १४ मे रोजी पुणे, दौंड, अलिबाग, तर मुंबईत १५ मे रोजी शून्य सावलीचा अनुभव घेता येईल. १६ मे रोजी नगर, कल्याण, नांदेड व ठाणे यासह २६ मेपर्यंत हा अनुभव घेता येईल.

संक्षिप्त

## वडूरा जि.प. शाळेत पूर्व तयारी मेळावा



**खल्लार-** नजिकच्या वडूरा येथिल जि. प. उच्च माध्यमिक मराठी शाळेत ३० एप्रिलला शाळा पूर्व तयारी मेळावा एकचे करण्यात आले होते. कार्यक्रमाला अंगणवाडी केंद्राच्या अंगणवाडी सेविका मीना उंबरकर,चैताली काळे उपस्थित होत्या.तसेच दाखल पात्र विद्यार्थ्यांचे पालक व विद्यार्थी सुद्धा उपस्थित होते.यावेळी विद्यार्थ्यांना पुष्प देऊन त्यांचा आजच्या दिवशी यथोचित सन्मान करून त्यांचा प्रवेश निश्चित करण्यात आला.शालेय पोषण आहारच्या सुलभा नांदणे,शालेय पोषण आहार मदतनीस प्रतिक्षा हरणे उपस्थित होते.शाळेच्या मुख्याध्यापिका वनमाला शेवतकर व शाळेचे शिक्षक विजय मकेश्वर यांनी शाळा पूर्वतयारी मेळावा यशस्वी ते करिता विशेष प्रयत्न केले.

## विभागीय आयुक्तालयात राष्ट्रसंतांना अभिवादन



**अमरावती-** 'ग्रामगीता'चे रचयिता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज विभागीय आयुक्त कार्यालयात अपर आयुक्त सुरज वाघमारे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण विनम्र अभिवादन केले.यावेळी अपर आयुक्त संजय जाधव, अजय लहाने, उपायुक्त संतोष कवडे, सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे यांच्यासह अन्य अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनीही राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.

## पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात 'प्लेसमेंट डे'

**अमावती-** पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयात ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागातर्फे 'प्लेसमेंट डे' उत्साहात साजरा करण्यात आला. यावर्षी महाविद्यालयातील तब्बल ४१५ पेक्षा अधिक विद्यार्थ्यांची विविध बहुराष्ट्रीय तसेच राष्ट्रीय सॉफ्टवेअर व कोअर कंपन्यांमध्ये निवड झाली असून, या उल्लेखनीय यशाचा आनंद साजरा करण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.महाविद्यालयाकडून दिले जाणारे गुणवत्तापूर्ण शिक्षण, योग्य मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण परिश्रम यामुळेच हे यश मिळाल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. भविष्यातही अधिकाधिक विद्यार्थ्यांनी अशा यशाची नोंद करावी, अशी अपेक्षा व्यवस्थापनाने व्यक्त केली.

# कष्टकरी जीवन : प्रेरणा काव्य

स्वातंत्र्यप्राप्ती नंतर अनेक वर्ग उपेक्षित राहिला, त्यात कष्टकरी, श्रमिक, असंघटित कामगार वर्ग असा वर्ग कायम शासन आणि कारखानदार यांच्या कात्रीत सापडला. त्यांना त्यांच्या हक्कांसाठी मोठा लढा द्यावा लागला. आजचे कामगार कायदे हे किती कामगार हिताचे आहेत हे आपण जाणत आहोत. असा कामगार वर्गाला चेतना देण्याचे काम अनेक नेत्यांनी केले असले तरी कवीवर्य नारायण सुर्वे व कवीवर्य नामदेव ढसाळ यांनी ते जीवन जगले. त्यांनी महाराष्ट्रात कामगार जीवनाची चितरकथा त्यावेळच्या व्यवस्थेसमोर समोर उभी केली. मुंबई सारख्या ठिकाणी मराठी चाकरमानी माणूस टिकला. महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिनी त्यांचे स्मरण होणे अवश्य आहे.

कवी नारायण सुर्वे हे स्वतः मुंबईतील गिरणी कामगारांचे जीवन जगले आहेत. स्वतः अनाथ असताना ते कष्टमय जीवन जगले, भोगले आणि पाहिले त्यामुळे त्यांच्या ठायी कामगारांन विषयी असलेली तळमळ मोठी होती. ती त्यांनी काव्यातून मांडली 'कामगार आहे मी, तळपती तलवार आहे ' या कवितेत कामगार जीवनाचे वास्तव मांडले आहे. रोजी रोटीसाठी कामगार किती हताश होतो हे नजरे समोर उभे केले ते म्हणतात..

**रोजीचा रोटीचा सवाल रोजचाच आहे**
**कधी फाटका बाहेर कधी फाटका आत आहे**
**कामगार आहे मी, तळपती तलवार आहे**
**सारस्वतांनो ! थोडासा गुन्हा करणार आहे,**

कामगारा बरोबर सामान्य लोकांचे जीवन त्यांनी वास्तववादी मांडले. दाहकता त्यांच्या कवितेतून दिसून येते दोन दिवस या कवितेतून कष्टकरी संपूर्ण आयुष्य उभे केले आहे. ते म्हणतात...

**शेकडो वेळा चंद्र आला, तारे फुलले, रात्र धुंद झाली**
**भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बर्बाद झाली ।।**

आकाशातील सौंदर्यापेक्षा पोटाची भूक भागवणारी भाकरी किती महत्त्वाची आहे. 'भाकरीचा चंद्र' ही प्रतिमा भुकेल्या माणसांसाठी वापरली

**झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले**
**दोन दिवस वाट पाहण्यात गेले दोन दुःखात गेले।**

जिंदगी किती कष्टमय जाते सार आयुष्य पोटाचा प्रश्न सोडवण्यात जाते.कष्टकरी जीवनाची दाहकता मांडली. त्यांच्या या भावमय वास्तववादी कवितांनी कामगार साहित्यात मोठी भर पडली आणि कामगार वर्गात मोठा आदर निर्माण झाला व तो कायम टिकला त्यांचा या कार्याचा गौरव म्हणून सुर्वे यांना १९९८ साली पद्मश्री पुरस्कार देऊन गौरव केला. असेच एक



कामगार, शोषितांचे, वंचितांचे जीवन विद्रोही पणे मांडणारे कवी राजकारणी, विचारवंत नामदेव ढसाळ होय. मुंबईतील गोलपीठा भागातील झोपडपट्ट्यांमध्ये त्यांचे बालपण गेले. नामदेव ढसाळांनी मुंबईमध्ये अनेक वर्षे टॅक्सी चालवून आपला जीवन चरितार्थ चालवला या उपेक्षितांचे जीवन भोगले ते त्यांनी तसेच दाहक व विद्रोहीपणे मांडले, त्यांच्या जीवनावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मोठा प्रभाव होता. गोलपिठा व मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले या कविता संग्रहात त्यांनी कष्टमय जीवनाचे काव्य मांडले आहे. हे जग कष्टकऱ्यांच्या, कामगारांच्या श्रमावर चालते हे त्यांनी ठामपणे मांडले. कामगार बंधो!या कवितेतून त्यांनी श्रमाची प्रतिष्ठा न राखणाऱ्याना कोसले आहे तर श्रमिकाला त्याच्या अस्तित्वाची, कर्तृत्वाची जाणीव करून दिली आहे ते म्हणतात.

**हे जग तुझ्या श्रमावर चालले आहे**
**किती रे करतोस रक्ताचे पाणी**
**मी तुलाच सर्जनाचा निर्माता मानतो**
**बाकीच्यांचा हिशोब कशाला?**

ढसाळ येवढयावर थांबत नाही तर ते अधिक जोमाने शोषित वर्ग जागा करतात. मुंबई शहरात होत असलेली कोंडी, महिला अत्याचार, भुकबळी, बेरोजगारी हताश झालेली मुर्दाड मने यांना चेतवण्याचे काम 'रक्तात पेटलेल्या अगणित सुर्यांनो' या कवितेतून मांडतात ते अखेर च्या कडव्यात मुलभूत हक्का साठी उद्धेशून म्हणतात अशी शहरे पेटवीत जा त्यातून क्रांति जन्म घेण्यास सूतोवाच करतात ते म्हणतात

**घोर नाकेबंदी**
**मरेपर्यंत राहयचं का असंच युद्धकैदी ?**
**ती पाहा रे ती पाहा मातीची अस्मिता आभाळभर झालीय**
**माझ्या यातनेनं आता झिंदाबादची गर्जना केलीय**
**रक्तात पेटलेल्या अगणित सुर्यांनो,**
**आता या शहराशहराला आग लावत चला !**

ढसाळ यांच्या कामगार साहित्यावर व कामगार विश्वावर मोठा पगडा निर्माण झाला होता त्यांच्या कवितांतून अनेक दलित साहित्यिकांनी प्रेरणा घेतली त्यांच्या जीवन कार्याचा गौरव म्हणून १९९९ साली शासनाने पद्मश्री पुरस्कार देऊन सन्मानित केले. या दोन्ही महान कवींच्या कवितेतून कामगार चळवळ जीवनात राहिली. आज अनेक राजकीय पक्षांच्या घुसखोरीमुळे कामगार चळवळ दडपली जात आहे. सध्या देश भांडवलदारांच्या हातात असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. असे असताना कवी सुर्वे व ढसाळ यांच्या सारखी प्रेरणा देणारी माणसे निर्माण होणे काळाची गरज आहे. कामगार आणि कामगार जीवन अनेकांनी मांडले पण स्वातंत्र्यानंतरही कष्टकरी वर्गाला उपेक्षेचे जीवन नशीब येणे हे कोणालाच मान्य नव्हते. ते आज दिसून येते.

**विठ्ठल वळसेपाटील**
पुणे-मो.८४८४०६६०४२

# देशात अभिजात आणि महाराष्ट्रात दप्तरात

महाराष्ट्रामध्ये एक मे पासून म्हणजेच महाराष्ट्र दिनापासून टॅक्सी, रिक्षा, ओला,उबेर यांच्या चालकांसाठी मराठी भाषा लिहिता, बोलता येणे अनिवार्य करण्यात येणार आहे. यासाठी महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. त्यामुळे भविष्यात चालकांना वाहन परवाना देताना किंवा नूतनीकरण करताना चालकाच्या मराठी भाषेचे ज्ञानही पडताळले जाणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या या निर्णयामुळे राज्यात संमिश्र पडसाद उमटत आहे. काहींनी या निर्णयाचे स्वागत केले तर, काहींनी नापसंती दाखवली.२४ एप्रिल या दिवशी या निर्णयावरून मनसे कार्यकर्ते आणि हिंदी भाषिक यांच्यात वादावादी ही झाली. मनसेने तर काही भागात रिक्षांवर मी मराठी बोलतो, मला मराठी भाषा येते, माझ्या रिक्षात बसा असे स्पीकर लावण्यास सुरुवात देखील केली आहे. थोडक्यात मराठी भाषा अनिवार्य करण्याचा विषय वादाकडे वळत आहे. मातृभाषेवरून वाद होणे हे ना महाराष्ट्रासाठी चांगले आहे ना देशाच्या एकतेसाठी चांगले आहे.




महाराष्ट्रात रिक्षा, टॅक्सी, ओला, उबेर यांच्या चालकांमध्ये अन्य भाषिकांची संख्या मोठी आहे.यातील बहुतांश चालक अनेक वर्षापासून महाराष्ट्रात मुंबईत राहतात.त्यांची ओळख ही मुंबईकर अशी झाली आहे परंतु अनेक चालक मराठीतून बोलणे टाळतात.अनेकदा प्रवासी मराठीत बोलत असूनही अन्य भाषिक चालक मराठी बोलण्याचे सौजन्यही दाखवत नाही त्यामुळे याची परिणीती वादात होते. अशा प्रकारच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्यामुळे चालकांसाठी मराठी भाषा अनिवार्य करण्यात आल्याचे परिवाहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी म्हटले. अनेक वर्षा पासून महाराष्ट्रात राहून ही तेथील मातृभाषा शिकून न घेणे हे चुकीचे आहे.जेथे आपल्या उदरभरण याची व्यवस्था होते त्या ठिकाणची मातृभाषा शिकणे हे रोजीरोटीसाठी आवश्यक ठरते परंतु त्याहीपेक्षा तेथील अस्मितेचा आदर करणे हे खरे राष्ट्रीयत्वाचे लक्षण आहे.प्रत्येकाने अन्य राज्यांच्या भाषेचा आदर करणे हे यातूनच घडू शकते परंतु प्रत्यक्षात मात्र तसे होत नाही हे दुर्दैव आहे.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे.हा दर्जा मिळणे आणि तिची अस्मिता टिकवणे हे दोन्ही विषय भिन्न आहेत. मराठीला अभिजात भाषेच्या दर्जा प्राप्त झाल्यामुळे महाराष्ट्रात तिची अस्मिता जपली गेली, असे झालेले नाही. अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यावर केंद्र शासनाकडून मराठी भाषेच्या प्रचार प्रसारासाठी निधी उपलब्ध होईल, अन्य राज्यातील विद्यापीठांमध्ये मराठी भाषेतून अभ्यासक्रम शिकवले जातील आणि महाराष्ट्र आणि महाराष्ट्राच्या बाहेर मराठी भाषेचे विविध कार्यक्रम सादर होतील, उपक्रम राबवले जातील. परंतु मुळात महाराष्ट्रात राहणारा मराठी माणूस जोपर्यंत स्वतः मराठी भाषेविषयी अस्मिता बाळगणार नाही तोपर्यंत देशात अभिजात आणि महाराष्ट्रात दप्तरात अशी मराठीची स्थिती आहे.

जेव्हा मराठी माणूस स्वतःच्या मातृभाषेचा आदर करील,तेव्हाच अन्यही करतील हे कटू सत्य असले तरी वस्तुस्थिती नाकारून चालणार नाही. जे महाराष्ट्रात राहतात त्यांनी महाराष्ट्राप्रती आदर म्हणून मराठी बोलायला हवे यामध्ये दुमत असण्याचे कारण नाही परंतु केवळ धाकदपटशाने हा प्रश्न सुटणार नाही.महाराष्ट्राच्या विधिमंडळामध्ये मराठी भाषेच्या अस्मितेचा कायदा पारित झाला, त्या विधिमंडळाच्या सभागृहात नियमित प्रवेश करताना आमदारांना स्वतःची स्वाक्षरी करून जावे लागते. काही वर्षापूर्वी शिवसेनेचे आमदार दिवाकर रावते यांनी मराठी अस्मितेच्या प्रश्नावर बोलताना महाराष्ट्रातील निम्म्याहून अधिक आमदार सभागृहात प्रवेश करताना इंग्रजीत स्वाक्षरी करत असल्याचे निदर्शनात आणून दिले, म्हणजे सभागृहात मराठी अस्मितेचा कायदा पारित करायचा मात्र स्वतः इंग्रजीत स्वाक्षरी करून भाषेविषयी अस्मिता दाखवायची नाही. मराठीची दुः स्थिती याचमुळे झाली आहे. मराठीजन अन्य भाषिकांना मराठीत बोलण्याचा आग्रह करतात तेव्हा त्यांनी प्रथम मराठीची अस्मिता स्वतःच्या बोलण्यातून आणि लिहिण्यातून अंगीकारायला हवी. मराठी भाषिकांनी मराठीची अस्मिता बाजूला सारल्यामुळेच आज कायदा करण्याची वेळ आली आहे ही वस्तुस्थिती नाकारून चालणार नाही. महाराष्ट्राची अस्मिता म्हणून मराठी शिकायला हवी, ही आदराची भावना एक वेळ बाजूला ठेवू परंतु रोजीरोटी साठी तरी मराठीविना पर्याय नाही, ही आवश्यकता अन्य भाषिकांमध्ये मराठी माणूस निर्माण करू शकला नाही हे मराठी माणसांचे अपयश आहे.

मराठी भाषा अनिवार्य करण्याला राजकीय वा अराजकतेचे वळण न देता प्रत्येक राजकीय पक्षांतील हिंदी भाषिक नेत्यांनी कार्यकर्त्यांना मराठी भाषा शिकून घेण्याचे आवाहन करणे आवश्यक आहे. मराठी आणि हिंदी या दोन्हीही भारतीय भाषा आहेत. त्यामुळे राजकीय पक्षांनी राजकारणा पलीकडे जाऊन भूमिका घेणे, हिंदी भाषिकांनी मराठीविषयी आदर बाळगणे आणि मराठी माणसाने मातृभाषेविषयी अस्मिता जपली, तर भाषावादाचा हा प्रश्न सुलभ होईल.शेवटी स्वकीय भाषेवरून एकमेकांच्या उरावर बसून राष्ट्रीय हानी करणारी आंदोलन करून काय साध्य होणार आहे?राष्ट्रीयत्वाची भावना जोपासली, तर अन्यांच्या मातृभाषेचा करा आदर करा हे सांगण्याची वेळच येणार नाही. कारण जो स्वतःच्या मातृभाषेचा आदर बाळगतो तो दुसऱ्याच्या मातृभाषेचा आदर करू शकतो.कायदा नव्हे स्वभाषेचा अंगीकार हाच भाषावादावरील उपाय होय.

**लीना गाडगीळ**

# महाराष्ट्र दिन-मराठी अस्मितेचा आणि संघर्षाचा गौरव




**'बहू असोत सुंदर संपन्न की महान**
**प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा'**

१ मे हा दिवस प्रत्येक मराठी माणासासाठी केवळ दिनदर्शिकेतील एक तारीख नसून तो स्वाभिमानाचा, बलिदानाचा आणि गौरवाचा सण आहे. १९६० साली याच दिवशी नकाशावर 'महाराष्ट्र' हे स्वतंत्र राज्य अवतारले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भाषेच्या आधारावर राज्यांची पुनर्रचना करण्याची मागणी जोर धरू लागली होती. परंतु, तत्कालीन केंद्र सरकार मुंबईसह महाराष्ट्र राज्य देण्यास अनुकूल नव्हते. या अन्यायाविरुद्ध 'संयुक्त महाराष्ट्र समिती'च्या नेतृत्वाखाली अभूतपूर्व लोकचळवळ उभी राहिली.मुंबई महाराष्ट्राला मिळावी यासाठी झालेल्या आंदोलनात १०६ आंदोलकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली.त्यांच्या या बलिदानामुळेच केंद्र सरकारला नमते घ्यावे लागले. अखेर १ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली. यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री बनले.महाराष्ट्र हे केवळ एक राज्य नसून ती एक विचारधारा आहे. 'महाराष्ट्र देशा,कणखर देशा,दगडांच्या देशा' असे वर्णन साक्षात निसर्गातूनच महाराष्ट्राला लाभले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य आणि त्यांनी दिलेली शौर्याची शिकवण हा महाराष्ट्राचा पाया आहे.छत्रपती शिवाजी महाराजांच्या या महाराष्ट्राची कीर्ती पोवाडा, गणेशोत्सव, वारी यामुळे जगातभरात पोहोचली आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी म्हणून ओळखली जाते.संत ज्ञानेश्वरांनी सर्व विश्वची माझे घर यासाठी पसायदान लिहिले तेही या महाराष्ट्राच्या मातीतच. संत तुकाराम महाराज, संत जनाबाई,संत नामदेव महाराज यांच्या अभंगांनी महाराष्ट्राला आध्यात्मिक वारसा दिला नाही तर हसतखेळत जीवन जगण्याची कला जगाला शिकवली.आज महाराष्ट्र हे भारतातील अग्रगण्य औद्योगिक आणि आर्थिक केंद्र आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असून पुणे, नागपूर,नाशिक यांसारखी शहरे तंत्रज्ञान आणि कृषी क्षेत्रात मोठी भरारी घेत आहेत.१ मे हा दिवस साजरा करताना आपण केवळ आनंद व्यक्त न करता, महाराष्ट्राची परंपरा जपण्याचा आणि राज्यात असलेल्या लव्ह जिहाद सारख्या गंभीर समस्या समूळ नष्ट करून राज्याला खऱ्या अर्थाने अधिक प्रगत आणि सुरक्षित करण्याचा संकल्प केला पाहिजे.'जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा!'

**वर्षा आवदे**

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ : प्रगती, नवोपक्रम आणि मूल्यांचा गौरवशाली प्रवास



शिक्षण हीच ती शक्ती आहे, जी समाजात परिवर्तन घडवून आणू शकते, या उदात्त विचारावर वाटचाल करणारे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ १ मे २०२६ रोजी आपला ४३ वा वर्धापन दिन साजरा करत असताना, विद्यापीठाने गेल्या काही वर्षांत शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन, नवोपक्रम, पायाभूत सुविधा आणि सामाजिक बांधिलकीच्या क्षेत्रात जी गरुडझेप घेतली आहे, ती निश्चितच अभिमानास्पद आहे. हा प्रवास राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या (एन.ई.पी.२०२०) यशस्वी अंमलबजावणीतून आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने जागतिक स्तरावर आपली मोहोर उमटवत आहे.

### राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि आधुनिक शिक्षणाची कास

आजचा काळ हा केवळ पुस्तकी ज्ञानाचा राहिलेला नाही, तर तो कौशल्य, नवकल्पना (इन्नोव्हेशन) आणि नैतिक मूल्यांचा आहे. हीच काळाची पावले ओळखून विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना बहुविध संधी, प्रत्यक्ष अनुभव आणि रोजगाराभिमुख शिक्षण देण्याचा ध्यास घेतला आहे. यासाठी इंटर्नशिप पोर्टलची सुरुवात करण्यात आली असून, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेता यावा, यासाठी ठोस पावले उचलली गेली आहेत. उद्योगक्षेत्राच्या गरजा ओळखून ए.ई.डी.पी. अंतर्गत बी.एस्सी. (डेटा सायन्स अँड ॲनॅलिटिक्स) आणि बी.कॉम. (रिटेल मॅनेजमेंट) यांसारखे नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम सुरू करण्यात आले असून, त्यासाठी उद्योगांशी सामंजस्य करारही करण्यात आले आहेत.

### आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) आणि जागतिक तंत्रज्ञानाकडे वाटचाल

येणारा काळ हा 'ए.आय.' चा आहे, हे ओळखून विद्यापीठाने 'सेंटर ऑफ एक्सलन्स इन आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि मशीन लर्निंग' स्थापन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडे २५ कोटी रुपयांचा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रस्ताव पाठविला आहे. यामुळे विद्यापीठाचे संशोधन जागतिक दर्जाचे होणार आहे. विशेष म्हणजे, विद्या परिषदेने चारही विद्याशाखेतील पदवी (युजी) प्रोग्रामच्या पाचव्या सेमिस्टरला 'इंट्रोडक्शन टू ए.आय.' हा विषय अनिवार्य करून एका नव्या क्रांतीची सुरुवात केली आहे.

विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील तंत्रज्ञान मिळावे यासाठी विद्यापीठाचे इंटरनेट नेटवर्क १ जी.बी.पी.एस. वरून तब्बल १० जी.बी.पी.एस. पर्यंत अद्ययावत केले जात आहे. या प्रकल्पासाठी ३.१५ कोटी रुपये खर्चून अत्याधुनिक फायरवॉल, कोअर स्विचेस आणि ओ.एफ.सी. प्रणाली उभारली जात आहे. पीएम-उषा अंतर्गत मिळालेल्या अनुदानातून विद्यापीठ परिसरात ७५ नवीन वायफाय ॲक्सेस पॉईंट्स बसवले असून, लवकरच आणखी ५० पॉईंट्स जोडून कनेक्टिव्हिटी अधिक भक्कम केली जाणार आहे. यामुळे हे विद्यापीठ खऱ्या अर्थाने 'नेक्स्ट जनरेशन' शैक्षणिक केंद्र बनत आहे.

### संशोधन, पेटंट आणि आंतरराष्ट्रीय यश

संशोधकांना पेटंट नोंदविण्यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर नवीन आय.पी.आर. (पेटंट) पॉलिसी अपलोड करण्यात आली आहे. व्यवस्थापन शास्त्र (एम.बी.ए.) विभागाचे प्रमुख डॉ. दिपक चाचरकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी 'बाऊंडेड रॅशनॅलिटी कॅलक्युलेटर' साठी मिळविलेला कॉपीराईट हा विद्यापीठाच्या बौद्धिक क्षमतेचा मोठा पुरावा आहे.बायोटेक्नॉलॉजी विभागाने डॉ. अनिता पाटील यांना मिळालेला 'बेस्ट सीनियर सायंटिस्ट' पुरस्कार त्यांच्या संशोधनाची पावती देतो. हर्बल उत्पादने विकास आणि प्रमाणीकरण केंद्र या अठरा लाख रुपयांचा भरीव निधी मिळालेल्या प्रकल्पाला सुरुवात होत आहे. संगणकशास्त्र विभागातील डॉ. रत्नशील खोब्रागडे यांना मिळालेले पेटंट ही विद्यापीठासाठी गौरवाची बाब आहे. तसेच पूजा मांडविय, डॉ. प्रशांत ठाकरे आणि डॉ. निरज धनवटे यांच्या संशोधन निबंधाला आंतरराष्ट्रीय परिषदेत दुसरे पारितोषिक आणि 'साऊथ आफ्रिकेचे पेटंट' मिळाले आहे. दुसऱ्या आंतरराष्ट्रीय पर्यावरण शाश्वतता परिषदेत पीएचडी स्कॉलर अनघा उंदरीवाडे आणि डॉ.अनिता पाटील यांना प्रथम पारितोषिक मिळाले. अचल जाधव आणि दिव्या अंबाडकर या विद्यार्थिनींची जर्मनीतील नामांकित विद्यापीठात ए.आय. च्या उच्च शिक्षणासाठी झालेली निवड.

### स्टार्टअप्स, नवउद्योजकता आणि जागतिक ओळख

आपले विद्यापीठ आता केवळ शिक्षणाचे केंद्र न राहता 'इन्नोव्हेशन आणि उद्योजकतेचे' मोठे केंद्र बनत आहे. इन्क्युबेशन सेंटरच्या माध्यमातून स्टार्टअप्सना 'सीड फंड' दिला जात आहे. केंद्र शासनाच्या स्टार्टअप इंडिया सीड फंड योजनेंतर्गत अमरावती विद्यापीठातील ७ स्टार्टअपची निवड झाली. या स्टार्टअप्सला ५२ लक्ष रुपयाचा सीड फंड देण्यात आला, हे मोठे यश मानल्या जाते.

विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती व उद्योजकता निर्माण होण्यासाठी बूट कॅम्प, आयडियाथॉन, बिझिनेस प्लॅन कॉम्पिटिशन अशाप्रकारचे उपक्रम विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयात राबविले, त्यामुळे स्टार्टअप एक्स्पो २०२६ मध्ये मोठा सहभाग राहिला. जागतिक स्तरावर ओळख निर्माण करण्यासाठी आफ्रिकन आणि इतर देशांतील विद्यापीठांशी संपर्क साधून १२ परदेशी विद्यापीठांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे.

**वर्धापन दिनानिमित्य**

### पायाभूत सुविधांचा विकास आणि नवीन उपक्रम

पीएम-उषा योजनेंतर्गत तब्बल ४० कोटी रुपये खर्चून विद्यापीठात बहुउद्देशीय सभागृह, मुलींचे वसतिगृह, क्लासरुम कॉम्प्लेक्स, बुलढाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेजचे बांधकाम, तसेच फिजिकल एज्युकेशन आणि बायोटेक सारख्या विभागांचे नूतनीकरण वेगाने सुरू आहे.अकोला येथे उपकेंद्र स्थापन करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविला असून, चिखलदरा येथे 'ट्रायबल स्कील डेव्हलपमेंट सेंटर' चा प्रस्तावही शासनाधीन आहे. सेंटर फॉर मॉलिक्युलर डायग्नोसिस ॲण्ड रिसर्चची स्थापना झाली असून 'पीजी डिप्लोमा इन मॉलिक्युलर डायग्नोसिस ऑफ इन्फेक्शिअस डिसीजेस' हा अभ्यासक्रम जून २०२६ पासून सुरू होत आहे.

### सुवर्णभरारी

गेल्या वर्षभरात सांस्कृतिक क्षेत्रात विद्यापीठाने 'न भूतो न भविष्यती' अशी कामगिरी केली आहे.एम.जी.एम. विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित ३९ व्या मध्य विभाग आंतरविद्यापीठ युवा महोत्सवात विद्यापीठाने २३ विद्यापीठांना मागे टाकत, इतिहासात पहिल्यांदाच २४ पारितोषिकांसह ऐतिहासिक 'चॅम्पियनशिप' पटकावून सुवर्ण इतिहास रचला! तसेच जळगाव येथील'इंद्रधनुष्य' युवा महोत्सवात आठ पारितोषिके मिळवली. अमरावती येथील श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालयात आयोजित युवा महोत्सवात तीनहजार पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सवात अमरावती विद्यापीटाने आठ पारितोषिकांसह तिसरे स्थान मिळविले.राज्यस्तरीय उत्कर्ष स्पर्धेत विद्यापीठाच्या रासेयो चमूची उत्कृष्ट कामगिरी राहिली.

क्रीडा क्षेत्रातही आपले विद्यार्थी मागे नाहीत. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल पुरुष व महिला स्पर्धा विद्यापीठाच्या यजमानपदाखाली श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथे संपन्न झाली. या स्पर्धेत प्रथमत:च पुरुष व महिला चमूने प्रथम क्रमांक प्राप्त करुन विद्यापीठाचा नावलौकीक राष्ट्रीय स्तरावर पोहचविला. डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठात संपन्न झालेल्या राज्यस्तरीय आव्हान स्पर्धेत अमरावती विद्यापीठाने उत्कृष्ट विद्यापीठ पुरस्काराचा सर्वोच्च बहुमानाचा फिरता चषक पटकावून राज्याच्या शैक्षणिक नकाशावर आपले नाव कोरले.यशदीप भोगे या विद्यार्थ्याने एशियन आर्चरी चॅम्पियन स्पर्धेत सुवर्णपदक मिळवून विद्यापीठाचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर नेले.

### संत गाडगे बाबांची दशसूत्री

संत गाडगे बाबांच्या नावाने ओळखले जाणारे हे विद्यापीठ बाबांच्या दशसूत्रीचे काटेकोरपणे पालन करत आहे. कुलगुरूंनी स्वत: सप्त्नीक अनाथ, निराधार मुलींचे कन्यादान केले, तसेच संत गाडगे बाबा अध्यासन केंद्राच्यावतीने गरजूंना वस्त्रदान करण्यात आले. ज्या ठिकाणी गाडगे बाबांनी अखेरचा श्वास घेतला, त्या वलगाव येथील आश्रमात वृद्धांना कुलगुरूंच्या हस्ते शालींचे वाटप करण्यात आले.राष्ट्रीय सेवा योजनेच्या २७,६०० स्वयंसेवकांची फौज आज समाजसेवेचे व्रत घेऊन कार्यरत आहे. प्रजासत्ताक दिनाच्या परेडपासून ते कुल्लू मनाली येथील नॅशनल ॲडव्हेंचर कॅम्पपर्यंत विद्यार्थ्यांनी आपला ठसा उमटवला आहे. पर्यावरण रक्षणाचा वसा घेत विद्यापीठात १,१११ रोपटयांचे वृक्षारोपण करण्यात आले. अमरावती महानगरपालिकेला केंद्र शासनाचा 'स्वच्छ हवेसाठी' देशातून जो प्रथम पुरस्कार मिळाला, त्यात विद्यापीठाच्या निसर्गरम्य आणि हिरव्यागार परिसराचे मोठे योगदान आहे.विद्यापीठाने माजी विद्यार्थ्यांचा 'ऋणानुबंध' भव्य माजी विद्यार्थी मेळाव्याचे नेत्रदिपक आयोजन केले. या मेळाव्यात देश-विदेशातील विद्यार्थी सहभागी झाले होते.

वर्धापन दिनानिमित्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या कुशल नेतृत्वाखाली विद्यापीठ विकासाचा रथ घौडदौड करीत असून या विद्यापीठाला मनुष्यबळ कमी जरी असले तरी असलेले मनुष्यबळ विद्यापीठाच्या विकासात त्यांना समर्थपणे साथ देत आहे. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाची विकासात्मक वाटचाल सुरू असून या विद्यापीठाच्या वाटचालीत अनेकांचे परिश्रम फळाला लागले आहेत. विद्यापीठाच्या ४३ व्या वर्धापन दिनानिमित्त मन:पूर्वक शुभेच्छा !

**डॉ. विलास नांदुरकर**
जनसंपर्क अधिकारी,
संत गाडगे बाबा,अमरावती

## संक्षिप्त

### धुऱ्याच्या वादातून दगडाने मारहाण

**अल्लीपूर-** शेतातील धुऱ्याच्या किरकोळ वादातून मारहाणीची गंभीर घटना घडली. गजानन काळे (५३) हे त्यांच्या शेतात असताना शेजारी पद्माकर काळे याच्यासोबत धुऱ्याच्या सीमारेषेवरून वाद निर्माण झाला. वाद चिघळत गेल्याने पद्माकरने संतापाच्या भरात गजानन काळे यांच्यावर दगडाने हल्ला केला. या हल्ल्यात ते जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी हलविण्यात आले. घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. ग्रामस्थांनी मध्यस्थी करून परिस्थिती नियंत्रणात आणली. या प्रकरणी जखमींच्या तक्रारीवरून अल्लीपूर पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे. शेतजमिनीच्या वादातून अशा घटना घडत असल्याने प्रशासनाने यावर तोडगा काढण्याची गरज व्यक्त होत आहे.

### गणेशनगरात घरफोडी

**वर्धा-** शहरातील गणेशनगर परिसरात घरफोडीची घटना उघडकीस आली. श्रीराम पाणबुडे (६८) हे कुटुंबासह बाहेरगावी गेले असताना अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घरावर डल्ला मारला. चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला व कपाटातील रोख रक्कम तसेच सोन्याचे दागिने असा सुमारे ३८ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. शेजाऱ्यांना संशय आल्याने ही बाब उघडकीस आली. घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. नागरिकांनी पोलिसांकडे गस्त वाढविण्याची मागणी केली आहे. या प्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून तपास सुरू आहे.

### उष्माघाताने इसमाचा मृत्यू

**वर्धा-** वाढत्या तापमानाचा फटका नागरिकांना बसत असून उष्माघातामुळे एका इसमाचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली. मारोती देऊळकर (४३) रा. वरूड (रेल्वे) यांचा मृतदेह साटोडा येथील स्मशानभूमी परिसरात आढळला. प्राथमिक माहितीनुसार, कडक उन्हामुळे त्यांना उष्माघाताचा त्रास झाला असावा, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. या प्रकरणी सावंगी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. दरम्यान, वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी दुपारच्या वेळेत बाहेर जाणे टाळावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

### युवतीची आत्महत्या

**समुद्रपूर-** तालुक्यातील खंडाळा येथील एका युवतीने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली. अश्विनी तुमडाम (२५) असे मृत युवतीचे नाव आहे. घरातील सदस्य बाहेर असताना तिने हा टोकाचा निर्णय घेतल्याची माहिती मिळाली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला आहे. आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिस पुढील तपास करीत आहेत. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

### गळफास घेऊन इसमाची आत्महत्या

**गिरड -** तालुक्यातील ताडगाव येथील एका इसमाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. दीपक बारेकर (४०) असे मृताचे नाव आहे. घरात कोणी नसताना त्यांनी हा टोकाचा निर्णय घेतल्याचे सांगितले जाते. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली व पंचनामा केला. मृतदेह पुढील तपासासाठी पाठविण्यात आला आहे. या प्रकरणी गिरड पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून आत्महत्येचे कारण शोधण्याचे काम सुरू आहे. या घटनेमुळे गावात शोककळा पसरली आहे.

## ढोंगी बाबांना मोकळे रान, ‘खरात’ प्रवृत्ती समाजानेच चिरडली पाहिजे

# प्रशासन आणि समाज दोघेही जबाबदार-खा.अमर काळे

**वर्धा/जनमाध्यम**

नाशिकमध्ये उघडकीस आलेल्या कथित लैंगिक अत्याचार आणि बुवाबाजी प्रकरणाने समाज हादरला असताना, अशा ‘खरात’ प्रवृत्तीला मुळातून संपवण्यासाठी समाजानेच उभे राहिले पाहिजे, असा कडक इशारा खा. अमर काळे यांनी दिला. अंधश्रद्धेच्या नावाखाली सुरू असलेल्या फसवणुकीवर त्यांनी थेट हल्ला चढवत, आता सहनशीलतेची सीमा ओलांडली आहे, असे ठणकावले.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष प्रा. श्याम मानव यांच्या ‘बुवा तेथे बाया’ या ज्वलंत विषयावरील व्याख्यानाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. वर्ध्यात आयोजित या कार्यक्रमाने अंधश्रद्धेविरोधातील लढ्याला नवी धार मिळाल्याचे चित्र पाहायला मिळाले.आपल्या भाषणात अमर काळे यांनी समाजातील दांभिक रूढी-परंपरांवर जोरदार प्रहार केला. एकेकाळी सतीप्रथेच्या नावाखाली महिलांना जिवंत जाळलं जात




होतं. विरोध करणाऱ्यांना समाजाने बहिष्कृत केलं. हा काळोखा इतिहास विसरून चालणार नाही, असे सांगत त्यांनी सामाजिक अन्यायाची जाणीव करून दिली.स्त्री शिक्षणाच्या लढ्यातील महान कार्याचा उल्लेख करत त्यांनी सावित्रीबाई फुले यांचा संघर्ष अधोरेखित केला. त्यांच्यावर शेण-चिखल फेकला गेला, अपमान झाला; तरीही त्या डगमगल्या नाहीत.

आज महिलांची झेप ही त्याच त्यागाची देण आहे, असे ते म्हणाले.भोंदू बाबांच्या खोट्या दाव्यांवर प्रहार करताना त्यांनी संताप व्यक्त केला. बेलाची पानं वाहिली की परीक्षा पास होतो, अशा थोतांडाला लोक बळी पडतात, हे दुर्दैव आहे. अंधश्रद्धेच्या आहारी गेलेला समाज स्वतःचं नुकसान करून घेतो, असा टोला त्यांनी लगावला.

काही स्वयंघोषित बाबांवर बंदी घालण्याची मागणीही त्यांनी यावेळी केली.कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रा. कोटेवार यांच्या हस्ते अमर काळे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धपकी येथून शेळ्यांची चोरी

**सेलू-** तालुक्यातील धपकी शिवारात अज्ञात चोरट्यांनी गोठ्यावर डल्ला मारत ८ शेळ्या चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. आकाश शेळके (२९) व राजेंद्र धनवीज हे शेळीपालन व्यवसाय करतात. त्यांनी शेतातील गोठ्यात शेळ्या बांधून ठेवल्या होत्या. दरम्यान, रात्रीच्या सुमारास चोरट्यांनी गोठ्याजवळ येत संधी साधली व शेळ्या लंपास केल्या. सकाळी ही बाब लक्षात येताच परिसरात खळबळ उडाली. चोरी गेलेल्या शेळ्यांची किंमत सुमारे ४० हजार



रुपये असल्याचे सांगण्यात आले. शेतकऱ्यांच्या उपजीविकेवरच या घटनेचा परिणाम झाला असून ग्रामस्थांनी पोलिसांकडे कठोर कारवाईची मागणी केली आहे. या प्रकरणी दहेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## बीएलओ बदलांमुळे मतदारांची गैरसोय; स्थिर नियुक्तीची मागणी

**देवळी/जनमाध्यम**

विधानसभा मतदार यादीच्या पुनर्निरीक्षण प्रक्रियेदरम्यान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांच्या वारंवार बदलांमुळे मतदारांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत असल्याचे चित्र देवळी मतदारसंघात दिसून येत आहे. यामुळे मतदार यादी अद्ययावत करण्याच्या कामावरही परिणाम होत असल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे.

मतदार नोंदणी अधिनियम १९६० मधील नियम १४ तसेच लोकप्रतिनिधी अधिनियम



१९५० च्या कलम २९ नुसार मतदार यादीभागनिहाय BLO नियुक्त करण्यात येतात. या अधिकाऱ्यांवर मतदारांची माहिती अद्ययावत ठेवणे, मृत व स्थलांतरित मतदारांची नावे वगळणे आणि नव्या मतदारांची नोंदणी करणे अशा महत्त्वाच्या जबाबदाऱ्या असतात.मात्र, देवळी मतदारसंघातील काही यादीभागांमध्ये BLO अधिकाऱ्यांची सतत बदली होत असल्याने नागरिकांना प्रत्येक वेळी नवीन अधिकाऱ्यांकडे पुन्हा कागदपत्रे सादर करावी लागत आहेत. परिणामी, प्रक्रिया विलंबित होत असून मतदारांना वारंवार कार्यालयीन फेऱ्या माराव्या लागत आहेत. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर हा त्रास अधिकच वाढला आहे.या परिस्थितीमुळे मतदार यादीच्या अचूकतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याची चिंता व्यक्त होत आहे. दरम्यान, स्थानिक नागरिकांनी संबंधित प्रशासनाकडे निवेदन सादर करत स्थिर BLO नियुक्ती करण्याची मागणी केली आहे. यामुळे पुनर्निरीक्षण प्रक्रिया अधिक प्रभावीपणे राबवता येईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# महाराष्ट्र दिनी वर्ध्यात शक्तीचा गजर

## मुनगंटीवारांचा दौरा की राजकीय इशारा

**वर्धा/जनमाध्यम**

महाराष्ट्र दिनाच्या पवित्र पर्वावर वर्धा शहर आज राजकीय हालचालींनी अक्षरशः धडधडू लागले आहे. राज्याचे माजी वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या दौऱ्यामुळे शहरात केवळ कार्यक्रमांची रेलचेल नसून, सत्तेच्या शक्तीप्रदर्शनाची चाहूल लागल्याची जोरदार चर्चा रंगू लागली आहे. हा साधा दौरा नाही, तर आगामी राजकीय समीकरणांचा नवा अध्याय आहे, असे बोलले जात आहे.

महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने १ मे रोजी सायंकाळी ५ वाजता इंद्रप्रस्थ न्यू आर्टस्, कॉमर्स अ‍ॅन्ड सायन्स कॉलेज येथे माता सरस्वतीच्या प्रतिमेच्या अनावरण सोहळ्याला सुधीर मुनगंटीवार प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्याला पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, तसेच डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांसारख्या दिग्गजांची उपस्थिती लाभणार असून, शैक्षणिक मंचावरूनही राजकीय संदेश दिला जाणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

सायंकाळी ६ वाजता नालवाडी परिसरातील लहरी नगर येथे ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्राचे लोकार्पण सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाला अमर काळे, अभिजीत वंजारी यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती राहणार असून, स्थानिक राजकारणात नवे समीकरण तयार होण्याची कुजबुज सुरू झाली आहे.यानंतर सायंकाळी ६.३० वाजता स्टेशन फैल परिसरातील शिवाजी पेठ येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजदरबाराच्या भव्य म्युरलचे लोकार्पण होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर राहणार असून, नागरिकांच्या भावना आणि इतिहासाचा अभिमान यांना स्पर्श करणारा हा सोहळा ठरणार आहे.दरम्यान, भाजप जिल्हाध्यक्ष संजय गाते आणि भाई अंत्योदय प्रतिष्ठानचे विरू पांडे यांनी नागरिकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

एकीकडे महाराष्ट्र दिनाचा उत्सवष्ठ आणि दुसरीकडे राजकीय हालचालींचा धडाका, वर्ध्यातील हा दौरा केवळ कार्यक्रमांची मालिका नसून, आगामी राजकीय वादळाची चाहूल देणारा ठरतोय, हे मात्र निश्चित.

## कामगार दिनानिमित्त चर्चासत्र व सत्कार

**वर्धा/जनमाध्यम**

आंतरराष्ट्रीय कामगार दिनानिमित्त आज (१ मे) वर्धा शहरात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून कामगार संघटना संयुक्त कृती समितीच्या वतीने सायंकाळी ५.३० वाजता यशवंत महाविद्यालय येथे चर्चासत्र व सत्कार सोहळा होणार आहे. ‘वर्तमान शैक्षणिक स्थिती : आव्हाने आणि उपाय’ या विषयावर या वेळी चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. शिक्षण क्षेत्रातील बदलते स्वरूप, गुणवत्ता, तसेच कामगारांच्या मुलांसमोरील शैक्षणिक अडचणी यावर या चर्चासत्रात ऊहापोह होणार आहे. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणवंतांचा सत्कारही या कार्यक्रमात करण्यात येणार आहे.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शेतकरी नेते विजय जावंधिया राहणार असून उद्घाटन प्रा. वसंतराव पुरके यांच्या हस्ते होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. पंकजभाऊ भोयर, खासदार अमरभाऊ काळे, नगराध्यक्ष सुधीरभाऊ पांगुळ आणि डॉ. अभ्युदय मेघे उपस्थित राहणार आहेत.

याशिवाय वर्धा, पुलगाव व देवळी येथील नवनिर्वाचित अध्यक्षांचाही यावेळी सत्कार करण्यात येणार आहे. कामगार संदेश या मुखपत्राचे विमोचनही कार्यक्रमात होणार आहे.कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समितीचे सरचिटणीस डॉ. नंदकुमार वानखेडे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## ९३ टक्के प्रकरणांचा निपटारा; ९० टक्के तक्रारदारांना समाधान

### जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्याय मंचाची प्रभावी कामगिरी

**वर्धा/जनमाध्यम**

वाढत्या ग्राहक व्यवहारांमध्ये फसवणुकीच्या घटनांमध्येही वाढ होत असताना, ग्राहकांना न्याय मिळवून देण्यासाठी कार्यरत असलेल्या जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्याय मंच यांनी प्रभावी कामगिरी बजावली आहे. मार्च २०२६ अखेरपर्यंत मंचाकडे दाखल झालेल्या एकूण ४ हजार ७६० तक्रारींपैकी ४ हजार ४२७ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला असून, तब्बल ९३ टक्के प्रकरणे निकाली निघाली आहेत. यापैकी सुमारे ९० टक्के प्रकरणांमध्ये तक्रारदारांच्या बाजूने निकाल लागल्याने ग्राहकांना दिलासा मिळाला आहे.

ग्राहक संरक्षणाच्या दृष्टीने जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्याय मंच महत्त्वाची भूमिका बजावत आहे. २० लाख रुपयांपर्यंतच्या तक्रारी या मंचाच्या कार्यकक्षेत येतात. त्यापुढील २० लाख ते १ कोटीपर्यंतच्या तक्रारी राज्य आयोगाकडे, तर एक कोटी रुपयांवरील तक्रारी राष्ट्रीय आयोगाकडे वर्ग करण्यात येतात. न्यायालयाचा दर्जा असलेल्या या मंचात दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून प्रकरणांचा निर्णय दिला जातो.सध्या मंचाच्या अध्यक्षपदी वैशाली गजभिये, तर सदस्य म्हणून अनिल तोष्णीवाल आणि संजय मसंद कार्यरत आहेत. स्थापनेपासून मार्च २०२६ पर्यंत एकूण ४ हजार ७६० प्रकरणे दाखल झाली असून, त्यातील बहुतांश प्रकरणे निकाली



काढण्यात आली आहेत. प्रलंबित प्रकरणेही निर्धारित कालावधीत मार्गी लावण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. बहुतांश प्रकरणे तीन महिन्यांच्या आत निकाली काढण्यावर भर दिला जात आहे.ग्राहक हित जोपासण्यावर भर बँकिंग, रेल्वे, विमा, दूरसंचार, पोस्ट, बांधकाम क्षेत्र, गृहनिर्माण संस्था, वीज वितरण, घरगुती वस्तू खरेदी, शिक्षण आदी विविध क्षेत्रांशी संबंधित तक्रारींची सुनावणी येथे केली जाते. ग्राहकांचे हक्क अबाधित राहावेत, यासाठी मंच सातत्याने प्रयत्नशील आहे.निश्चित कालावधीत प्रकरणांचा निपटारा जानेवारी ते डिसेंबर २०२५ या कालावधीत ११९ प्रकरणे दाखल झाली होती. त्यापैकी ९८ प्रकरणे निकाली काढण्यात आली. तसेच जानेवारी ते मार्च २०२६ दरम्यान ३० प्रकरणे दाखल होऊन २७ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. विशेष म्हणजे, मार्च २०२६ अखेरपर्यंत एकूण १९१९ प्रकरणे निश्चित कालावधीत निकाली काढण्यात आली आहेत.ग्राहकांच्या तक्रारींवर जलदगतीने निर्णय देत त्यांना न्याय मिळवून देण्यात मंच यशस्वी ठरत असल्याचे चित्र समोर येत आहे.

## अंबा व कुंभे उदंचन जलविद्युत प्रकल्प क्षमतावाढीसाठी ‘एनटीपीसी’शी सुधारित सामंजस्य करार

# दोन्ही प्रकल्पांच्या क्षमतेमध्ये १८०० मे.वॅ. वरून २६०० मे.वॅ. वाढ होणार

**मुंबई/जनमाध्यम**

राज्याच्या ऊर्जा क्षेत्राला नवी चालना देणारा महत्त्वपूर्ण निर्णय घेत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत जलसंपदा विभाग आणि NTPC Limited यांच्यात रायगड जिल्ह्यातील अंबा व कुंभे उदंचन जलविद्युत प्रकल्पांच्या क्षमतावाढीसंदर्भात सुधारित सामंजस्य करार करण्यात आला. या करारामुळे दोन्ही प्रकल्पांची एकत्रित क्षमता १८०० मेगावॅटवरून तब्बल २६०० मेगावॅटपर्यंत वाढणार असून,



राज्याच्या वीजउत्पादन क्षमतेत मोठी भर पडणार आहे.

मंत्रालयातील समिती सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमास महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्यासह वरिष्ठ अधिकारी व एनटीपीसीचे उच्चपदस्थ अधिकारी उपस्थित होते. जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर व एनटीपीसीचे प्रादेशिक कार्यकारी संचालक ई. सत्या फानी कुमार यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या.या प्रकल्पांचे सविस्तर सर्वेक्षण केल्यानंतर क्षमतावाढीची मोठी शक्यता लक्षात आली. त्यानुसार अंबा प्रकल्पाची क्षमता ८०० मे.वॅ. वरून १५०० मे.वॅ.पर्यंत वाढवण्यात येणार असून, कुंभे प्रकल्पाची क्षमता १००० मे.वॅ. वरून ११०० मे.वॅ.पर्यंत नेण्यात येणार आहे. परिणामी, एकूण ८०० मे.वॅ.ची भर पडणार असून, दोन्ही प्रकल्पांची एकत्रित क्षमता २६०० मे.वॅ. होणार आहे.राज्य शासनाने सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP) धोरणांतर्गत उदंचन जलविद्युत प्रकल्पांच्या विकासाला गती दिली आहे. २० डिसेंबर २०२३ रोजी जाहीर करण्यात आलेल्या या धोरणाअंतर्गत आतापर्यंत ६० सामंजस्य करार झाले असून, यामधून सुमारे ८२,०१५ मे.वॅ. वीज निर्मितीची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. तसेच, सुमारे ४.२८ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आणि १.३१ लाख रोजगारनिर्मितीचा मार्ग मोकळा होणार आहे.या नव्या करारामुळे रायगड जिल्हा ऊर्जा निर्मितीचा महत्त्वाचा केंद्रबिंदू बनण्याची चिन्हे स्पष्ट झाली आहेत. वाढत्या औद्योगिकीकरणाला बळ देतानाच, राज्यातील वीजटंचाई कमी करण्यासाठी हा प्रकल्प ‘गेमचेंजर’ ठरणार असल्याचा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

## रेल्वे थांब्यांचा प्रश्न पेटला

# खा.अमर काळेंची थेट मंत्र्यांकडे मागणी

**वर्धा/जनमाध्यम**

प्रवाशांच्या वाढत्या गैरसोयीच्या पार्श्वभूमीवर रेल्वे थांब्यांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून खा. अमर काळे यांनी थेट रेल्वेमंत्र्यांकडे पत्र पाठवत महत्त्वाच्या गाड्यांना अतिरिक्त थांबे देण्याची ठाम मागणी केली आहे. प्रवासी, विद्यार्थी आणि रुग्णांना भेडसावणाऱ्या अडचणींमुळे ही मागणी अधिक तीव्र झाली आहे.

काळे यांनी आपल्या पत्रात तेलंगणा एक्सप्रेस (१२७२४) या गाडीला मार्गावरील महत्त्वाच्या स्थानकावर थांबा देण्याची आवश्यकता अधोरेखित केली आहे. सध्या या मार्गावरून प्रवास करणाऱ्या रुग्णांना, शिक्षणासाठी ये-जा




करणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच चंद्रपूरकडे जाणाऱ्या प्रवाशांना थेट रेल्वे सुविधा उपलब्ध नसल्याने त्यांना अतिरिक्त वेळ व खर्च सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर तातडीने थांबा मंजूर करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.दरम्यान, बडनेरा–नरखेड दरम्यान धावणारी मेमू रेल्वे नागपूरपर्यंत वाढविण्याचीही मागणी काळे यांनी केली आहे. नरखेड, वरूड, मोर्शी, काटोल हा परिसर ‘संत्रा हब’ म्हणून ओळखला जातो. या भागातून मोठ्या प्रमाणावर संत्र्यांची निर्यात होत असल्याने व्यापाऱ्यांची सतत ये-जा सुरू असते. ही मेमू नागपूरपर्यंत वाढविल्यास व्यापारी, शेतकरी आणि प्रवाशांसाठी मोठी सोय होणार असून या भागाच्या आर्थिक हालचालींना गती मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.कोविड-१९ नंतर रेल्वे विभागाने अनेक गाड्यांचे थांबे कमी केले तसेच काही सेवा बंद केल्या. या निर्बंधांचा फटका अजूनही प्रवाशांना बसत आहे. त्यामुळे पूर्वीप्रमाणे सर्व थांबे आणि सेवा पुन्हा सुरू कराव्यात, यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा करत आहोत, असेही काळे यांनी स्पष्ट केले.दरम्यान, या मागण्यांमुळे रेल्वे प्रशासनावर दबाव वाढण्याची शक्यता असून प्रवाशांच्या अपेक्षा आता रेल्वे मंत्रालयाच्या निर्णयाकडे लागल्या आहेत.

## उसनवारीच्या पैशावरून वृद्धास मारहाण

**हिंगणघाट-** उसनवारी दिलेल्या पैशांची मागणी करणे एका वृद्धास महागात पडले. पूर्णानंद मेश्राम (६२) यांनी त्यांच्या पत्नीमार्फत लहू खडसे याला १४ हजार रुपये दिले होते. अनेक वर्षे उलटूनही पैसे परत न केल्याने त्यांनी त्याच्याकडे मागणी केली. याच कारणावरून दोघांत वाद झाला. वाद चिघळल्याने लहू खडसे याने पूर्णानंद मेश्राम यांना मारहाण केली. या घटनेत ते जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेनंतर परिसरात संताप व्यक्त होत आहे. या प्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १५४**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

## संक्षिप्त

### १ ते १० मे पर्यत श्रीगुरुदेव सर्वांगीण सुसंस्कार शिबिराचे आयोजन

**तिवसा**-वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज जयंती अर्थात ग्राम जयंती महोत्सव व श्री संत अच्युत महाराज जयंती तसेच श्री संत गुणवंत महाराज व श्री संत शंकर महाराज यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्ताने अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाचे तत्त्वप्रणालीनुसार श्री गुरुदेव सर्वांगीण सुसंस्कार शिबिराचे आयोजन १ मे ते १० मे पर्यंत मोझरी गुरुकुंज येथील शिव मंदिर, मंगल कार्यालय येथे मुला-मुलींचे शिबिर आयोजित करण्यात आलेले आहे. या शिबिरामध्ये सामुदायिक ध्यान, सामुदायिक प्रार्थना, रामधून, थोरांचे चरित्र, स्वावलंबन, सर्वधर्मसमभाव, आज्ञापालन, ग्रामगीता तत्त्वज्ञान, अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ सक्रिय पाठ, भाषण कला, तबला, पेटी, टाळ, प्राथमिक शिक्षण, व्यायामामध्ये योगासन, प्राणायाम, सूर्यनमस्कार, लाठीकाठी, कराटे,पंजाबी गटका चक्कर, तलवार, दांडपट्टा, भाला, जंबिया, लेझीम, कुस्ती, मल्लखांब, सांघिक आणि वैयक्तिक कवायती इत्यादी शिकविल्या जाईल.आयोजक मानवता प्रतिष्ठान सरस्वती मंदिर व वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज मानव विकास संस्था तसेच समस्त मोझरी गुरुकुंज ग्रामस्थ मंडळी यांनी आपल्या मुला-मुलींना या सुसंस्कार शिबिरामध्ये पाठविण्याचे आवाहन ग्रामगीताचार्य रायजीप्रभू शेलोटकर महाराज यांनी केलेले आहे.

### श्री संत तुकाराम महाराज गाथा पारायण सोहळा

**कुऱ्हा**-विदर्भाची पंढरी आई रूक्मिणी मातेचे हरण केलेल्या श्री अंबिका देवी संस्थान श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथे कृपा आशीर्वाद श्री गाथा स्वरूप गुरुवर्य रामचंद्र बोधे बाबा पंढरपूर आळंदी, कृपा आशीर्वाद श्री ह.भ.प.वै. गुरुवर्य रंगराव महाराज टापरे आखतवाडा आणि श्री ह.भ.प नरेंद्र महाराज पुजारी कौंडण्यपूर यांच्या उपास्थिती श्री संत तुकाराम महाराज गाथा पारायण गेल्या ४८ वर्षापासून सुरू असलेल्या व्यासपीठ नेतृत्व हभप नामदेव महाराज टापरे (आखतवाडा) यांचे वाणीतून सुरु आहे. या पारायण सोहळा मध्ये किर्तनकार हभप आशिष महाराज लसर (सागर), ह.भ प. नामदेव महाराज तसरे (आखतवाडा), ह.भ.प नंदकिशोर महाराज ढेंगे (म्हातोडी बाजार) हभप भगवान महाराज पवार (वरूळ जऊलका) हभप अशोक महाराज फोकमारे (एकलारा) ह.भ.प. गजानन महाराज हिरोळकर (जैनपूर पिंपळोद) हभप विठ्ठल महाराज (घोरझा) हभप संजय महाराज ठाकरे (कौंडण्यपूर) हभप ज्ञानेश्वर महाराज पातसे यांचे किर्तन झाले. गाथा पारायण समाप्ती दि. १ मे २०२६ सकाळी १० ते १२ पर्यंत हभप ऋषीवर्य ज्ञानेश्वर महाराज भांडे (मठाधिपती)(सामदा काशीपूर) यांचे मधूर वाणीतून काल्याचे किर्तन होईल. तर काला व महाप्रसाद मडगे परिवार आर्वी यांचे तर्फे करण्यात येईल.या पारायण गाथेला प्रमुख उपस्थिती दिलीप खताळे (विलास औरंगपूरे अम.) नरेंद्र पाटील (मार्डी) अनिल खळसान (अम), तसेच १ मे २०२६ स. ६ वा.महापुजा डिंगाबर हरिचंद्र पाटील यांचे शुभहस्ते होईल.तरी वरील कार्यक्रमाचा अवश्य लाभ ध्यावा असे विनित विश्वस्त मंडळ श्री अंबिका देवी संस्थान श्री क्षेत्र कौंडण्यपूर यांनी केले.



### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती

**अमरावती**-राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांची जयंती संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात साजरी करण्यात आली. याप्रसंगी वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, उपकुलसचिव मंगेश वरखेडे, उपअभियंता (विद्युत) राजेश एडले, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.

### डॉ.सूरज मडावी ४,५ ला आकाशवाणीवर

**अमरावती**-शासकीय ग्रंथालयाचे जिल्हा ग्रंथालय अधिकारी



डॉ. सूरज मडावी यांची नितीन भट यांनी घेतलेली मुलाखत सोमवार ४ आणि मंगळवार ५ मे रोजी सकाळी दहा वाजता अमरावती आकाशवाणीवरील 'नमस्कार अमरावती' या कार्यक्रमातून प्रसारित होणार आहे. 'वाचनसंस्कृती आणि वैचारिक समृद्धता' हा मुलाखतीचा विषय आहे. या कार्यक्रमाचे सादरकर्ते भय्यालाल टेकाम आहेत. मुलाखतीचा आस्वाद घेण्याचे आवाहन अमरावती आकाशवाणीचे कार्यक्रम प्रमुख भय्यालाल टेकाम आणि कार्यक्रम अधिकारी आशिष गावंडे यांनी केले आहे.

# बच्चू कडूंचा, 'प्रहार' जनशक्ती पक्षाला जय महाराष्ट्र

## भाऊंनी पुन्हा धनुष्यबाण हाती घेतला, राजकारणात पद व सत्ता महत्वाची

**चांदूरबाजार/वार्ताहर**

अचलपूर मतदार संघाचे माजी आमदार बच्चू कडू यांनी,'प्रहार' च्या माध्यमातून २० वर्षे लोकप्रतिनिधी म्हणून सत्ता गाजवली.मात्र २०२४ मध्ये भाजप कडून त्यांना पराभव पत्करावा लागला.

त्यानंतरचा अंदाजे दिड वर्षांचा कालावधी, विविध आंदोलनाच्या निमित्ताने संघर्षमय गेला.अखेर विधान परिषदेच्या निमित्ताने,त्यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला.यासाठी त्यांना आपला प्रहार जनशक्ती पक्ष शिवसेनेत विलीन करावा लागला.ज्या प्रसादने त्यांना पद, प्रतिष्ठा व प्रसिध्दी दिली.त्या 'प्रहार' जनशक्ती पक्षाला जड अंतःकरणाने का होईना. विधान परिषदेच्या आमदारकी साठी,अखेरचा जय महाराष्ट्र केला.

बच्चू कडूच्या संघर्षमय राजकीय जिवनाचा विचार करता, सर्व प्रथम ते हिंदू महासभेचे सदस्य होते.त्यानंतर त्यांनी बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला.ते शिवसेनेचे तालुकाप्रमुख ही झाले.कालांतराने त्यांनी जनकल्याणार्थ स्वतः च्या प्रहार संघटनेची निर्मिती केली. जन सेवेच्या माध्यमातून त्यांनी,लोकांच्या



हृदयात स्थान निर्माण केले.यातूनच त्यांनी अचलपूर मतदार संघात,अविरत २० वर्षे आपले राजकीय साम्राज्य अबाधित ठेवले.राजकारणात परिवर्तन हे क्रमप्राप्त आहे.परिणामी त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले. मात्र त्यांच पराभवानंतरचा दिड वर्षाचा कालखंड खडतड गेला.राजकारणात स्थिर राहण्यासाठी,त्यांना कोठेतरी आपली 'मांड' ठोकणे आवश्यक होते. राजकारणासाठी त्यांनी आपले हिंदूत्व दूर ठेवले असले तरी ,त्यांच्या राजकारणाची सुरुवात हिंदू महासभा व शिवसेने पासूनच सुरु झालेली होती.त्यामुळे हृदयात कोठे तरी खोलवर हिंदूत्व होतच. त्यामुळे बच्चू भाऊंनी पुन्हा 'धनुष्य बाण'हाती घेतला.पराभवाच्या दिड वर्षात त्यांनी बराच अनुभव घेतला.राजकारणात टिकायचे असेल तर,पद आणि सत्ता अत्यावश्यक आहे.हे त्यांनी अनुभवलं. आजच्या घटकेला कॉंग्रेस व उध्दव सेनेची नाव, राजकारणात स्थिर नाही.तिथे जाऊन डुबण्यापेक्षा,सध्याचा विचार करता सत्तेतील कोणाचे तरी बोट धरणे सोईचे होईल.असा मानस त्यांनी केला असावा.जिल्ह्याच्या राजकारणाचा विचार करता, भाजप व राष्ट्रवादी अजित पवार गटात त्यांना कितपत स्थान मिळेल हे अनिश्चित होते.'गोहाटी' च्या प्रवासामुळे,शिंदे गटात त्यांना 'मान' मिळेल हे त्यांनाअपेक्षित होते.अखेर त्यांनी विधान परिषदेच्या माध्यमातून पद आणि सत्तेसाठी,शिवसेना शिंदे गटासी घरोबा केला.हे सर्व करत असतांना त्यांनी, प्रहार संघटना कायम राहणार असे जाहीर केले.मात्र

प्रहार संघटना कायम राहणार काय? हे येणारा काळच ठरवेल.कारण राजकारणात दोन नावेत पाय ठेवून प्रवास करणे धोक्याचे असते.याची जाणीव त्यांना ही आहे. याआधी शिंदे गटाशी सख्य व भाजपला विरोध. या भुमिके मुळेच त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले.याची त्यांना जाण आहे.

# सीताबाई संगई हायस्कूलचे एन.एम.एम.एस.परीक्षेत यश

## २९ विद्यार्थी उत्तीर्ण, तर १४ विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी निवड



**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

सीताबाई संगई हायस्कूल, अंजनगाव सुर्जी येथे सन २०२५-२६ च्या एन.एम.एम.एस. परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करण्यात आले. एकूण ८४ विद्यार्थ्यांपैकी २९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून त्यापैकी १४ विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी निवड झाली आहे. शाळेची शैक्षणिक गुणवत्ता आणि यशाची परंपरा यंदाही कायम राहिली आहे.

या परीक्षेत सोहम श्रीकृष्ण बेराड (१३२ गुण), आतिश विनायक येऊल (१२५ गुण), चैतन्य नरेंद्र आवंडकर (११९ गुण), राजवीर लक्ष्मीकांत शिंगणे (११४ गुण), साई विजय कळसकर (१०१ गुण), कौतुक अनिलसिंग बाजोले (९८ गुण), अथर्व सतीश कोने (९७ गुण), माहीम शशिकांत बोबडे (९६ गुण), शंतनू मोहन धुळे (९४ गुण), पियुष किशोर कतोरे (९४ गुण), वीर अजय येवले (९१ गुण), आयुष संदीप निपाने (९० गुण), धनंजय गणेश धुळे व विराज सतीश खडसे या विद्यार्थ्यांनी यश संपादन करून शिष्यवृत्तीसाठी पात्रता मिळवली आहे.एन.एम.एम.एस. ही परीक्षा कमी उत्पन्न गटातील विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरते.

या योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना सलग चार वर्षे दरवर्षी१२,००० प्रमाणे एकूण ४८,००० शिष्यवृत्ती दिली जाते. यंदा आमच्या शाळेतील २९ पैकी १४ विद्यार्थ्यांना मिळणारी एकूण शिष्यवृत्ती रक्कम तब्बल ६,७२,००० इतकी असून, अभ्यास आणि बुद्धिमत्तेच्या जोरावर आर्थिक सुबत्ता मिळवता येते याचे हे प्रेरणादायी उदाहरण ठरले आहे.या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. उल्हास संगई, उपाध्यक्ष भरत संगई, विवेक संगई, सचिव प्रसाद संगई, सहसचिव अजय संगई, प्रसन्न संगई, कार्यकारी सदस्य अविनाश संगई, ज्येष्ठ सदस्य मुकुंद संगई, अशोक संगई, सदस्य आशिष संगई, विनय संगई, अनुप संगई तसेच सर्व संचालक मंडळ, प्राचार्य राकेश डोणगावकर, उपमुख्याध्यापक राजेश वैद्य, पर्यवेक्षक डॉ. निलेश डाहाळे व सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळेच्या गुणवत्तेत भर पडली असून परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. एन.एम.एम.एस. परीक्षेतील हे यश विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी नवे दालन उघडणारे ठरत आहे.

### उन्हाच्या चटक्यात कसे राबवणार 'शाळा पूर्वतयारी अभियान'

# शिक्षकांसमोर प्रश्नचिन्ह भर उन्हात विद्यार्थी मेळावा

**अमरावती/क्रा.प्र.**

इयत्ता पहिलीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी 'शाळा पूर्वतयारी अभियान' राबवण्याचे निर्देश देण्यात आलेत. असे असताना एप्रिल, मे महिन्यात प्रचंड उन्हामुळे या उपक्रमाच्या अंमलबजावणीवर शिक्षकांकडून आक्षेप घेतला जात आहे. एकीकडे कृती आधारित शिक्षक, पालक सहभाग आणि पूर्वतयारीवर भर देण्यात येत असताना दुसरीकडें ४५ डिग्री तापमानात लहान मुलांना शाळेत बोलावणे कितपत योग्य? असा सवाल उपस्थित होत आहे.

अभियानाची रूपरेषा आणि उद्दिष्ट : अमरावती जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्थेच्या वतीनें शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी शाळा पूर्वतयारी अभियान राबवण्यात येणार आहे. राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या अभियानाचा उद्देश इयत्ता पहिलीत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांची शाळेसाठी मानसिक, सामाजिक आणि शैक्षणिक



तयारी करणे हा आहे. या संदर्भात २६ एप्रिल ते २६ जून या कालावधीत सुमारे सहा ते सात आठवड्यांचा उपक्रम राबवला जाणार आहे.

मेळावे आणि कृती आधारित उपक्रमांची आखणी : या अभियानात शाळास्तरावर दोन प्रमुख मेळावे आयोजित केले जाणार आहेत. पहिला मेळावा २७ एप्रिल ते २६ मेदरम्यान तर दुसरा १५ ते २० जून या कालावधीत होणार आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध स्टॉल्स उभारून कृती आधारित शिक्षण दिले जाणार आहे. यामध्ये भाषिक कौशल्य, संख्याज्ञान, सामाजिक आणि भावनिक विकासावर भर दिला जाणार आहे.

# जिल्हा युवा पुरस्कार जाहीर

**अंजनगाव बारी**-सामाजिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या युवक-युवती आणि संस्थांना प्रदान केला जाणारा राज्य शासनाचा प्रतिष्ठेचा 'जिल्हा युवा पुरस्कार' जाहीर झाला आहे. विशेष म्हणजे, 'नाळ' चित्रपटातून आपली स्वतंत्र ओळख तयार करणाऱ्या बालकलाकार श्रीनिवास गणेश पोकळे याची विशेष जिल्हा युवा पुरस्कारासाठी निवड झाली आहे. महाराष्ट्र दिनाच्या औचित्याने १ मे रोजी पोलीस मुख्यालयात



समारंभात पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे. या वेळी राज्याचो शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान होणार असून जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकारी व लोकप्रतिनिधी यांची उपस्थिती राहणार आहे. दोन वर्षांचे पुरस्कार एकत्र जाहीर यंदा सन २०२४-२५ आणि २०२५-२६ या दोन्ही वर्षांचे युवा पुरस्कार एकत्रितपणे जाहीर करण्यात आले आहेत. सन २०२४-२५ पुरस्कार विजेते विशेष पुरस्कार : श्रीनिवास गणेश पोकळे ('नाळ' फेम) युवक गट : अमर पुरुषोत्तम वानखडे (तिवसा) यांना जाहीर झाला आहे.

# तीन दशकांनंतरही 'लक्ष्मी मुक्ती योजना' नाही

## अपयश कुणाचे? जनजागृतीचा अभाव की नागरिकांची उदासीनता

**चांदूरबाजार/वार्ताहर**

महिलांना सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने, लक्ष्मी मुक्ती योजना लागू केली आहे. या 'लक्ष्मी मुक्ती योजने' अंतर्गत सहहिस्सेदार म्हणून, महिलांची नावे शेतीच्या सातबारा उताऱ्यावर नोंदविले जाते. यासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही. ही योजना १९९२-९३ मध्ये सुरू करण्यात आली. मागील तीन दशकांपेक्षा अधिक काळ ही योजना लागू होऊन झाला. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने २००३ व २०२५ मध्ये सुधारित आदेश काढले. मात्र अजूनही या योजनेला, अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे अपयश नेमके कुणाचे असा प्रश्न निर्माण झाला आहे.प्रशासनाच्या जागृतीचा अभाव की, नागरीकांची उदासीनता.हा प्रश्न अद्यापही अनुत्तरीतच आहे.

ग्रामीण भागातील महिलांना जमीन हक्क मिळवून देण्यासाठी सुरू करण्यात आलेली, 'लक्ष्मी मुक्ती' योजना तीन दशकां नंतरही अपेक्षित परिणाम साधू शकलेली नाही. ही बाब चिंतेची आहे. महिलांच्या नावावर शेत जमीन नोंदवून त्यांना, आर्थिक व सामाजिक स्वावलंबन मिळवून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या योजनेची अंमलबजावणी अनेक ठिकाणी, अद्याप कागदोपत्रीच असल्याचे चित्र दिसत आहे. केंद्र व राज्य शासनाकडून विविध योजना राबविल्या जातात. परंतु बहुतांश योजनांबाबत नागरिक अनभिज्ञ असतात. स्थानिक स्तरावर अनेक योजनेचा प्रसार प्रचार व जनजागृती प्रशासनाकडून होत नाही. परिणामी अनेक चांगल्या योजना नागरिकांसाठी चांगल्या असूनही, त्याचा लाभ सर्व सामान्य नागरीकांना मिळत नाही. ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे लक्ष्मी मुक्ती योजना ही या पैकीच एक आहे. मुळात ही योजना ३४ वर्षापूर्वीच शासनाकडून सुरू करण्यात आली. २००३ मध्ये यात काही सुधारणा करण्यात आली. ग्रामीण भागातील घरे पती-पत्नीच्या संयुक्त नावे करण्याचा शासन आदेश जारी केला होता. २०२५ मध्ये या योजनेला अधिक गती देण्यासाठी, सात बारा वर पत्नीचे नाव लावण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली.ही प्रक्रियाअधिक सुलभ करण्यासाठी, शासनाने विशेष मोहीम व मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.त्यासाठी तलाठ्याकडे विहित नमुन्यात अर्ज द्यावा लागतो. पतीला आपल्या जमिनीवर पत्नीचे नाव लावण्या साठी संमतीपत्र द्यावे लागते. आधार कार्ड, विवाह नोंदणी प्रमाणपत्र (किंवा तत्सम पुरावा) आणि सध्याचा सातबारा उतारा आवश्यक आहे. ही योजना महिलांना आर्थिक सक्षम करण्यासाठी पूर्णतः विनामूल्य राबवली जात आहे.तरी ही या चांगल्या योजनेला प्रतिसाद मिळत नाही.ही या योजनेची शोकांतिकाच म्हणावी लागेल.

शासनाने या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी, कठोर पावले उचलावीत. केवळ आदेश काढून न थांबता, प्रत्यक्ष अंमलबजावणीवर देखरेख ठेवली. साता बारा वरील खातेदारांसी प्रत्यक्ष संपर्क साधावा.प्रशासनाने त्यांच्या मनातील शंका दूर कराव्या. तेव्हाच महिलांना खऱ्या अर्थाने 'लक्ष्मी मुक्ती'चा लाभ मिळू शकेल.

**सुरेखाताई ठाकरे,** माजी जिल्हा परिषद अध्यक्ष

# राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्याकडे शिक्षकांच्या समस्या बैठक

## प्राथमिक शिक्षक समितीने मांडले विविध प्रश्न

**अमरावती/का.प्र.**

राज्यातील शिक्षकांच्या विविध समस्या संबंधात राज्याचे राज्यमंत्री शालेय शिक्षण नाम. डॉ. पंकजभाऊ भोयर साहेब यांचे अध्यक्षतेत बैठक मंत्रालय दालन क्र. २४१ येथे झाली. मान. मंत्री महोदयांचे विशेष कार्य अधिकारी यांनी दिलेल्या संदेशावरून महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती चे राज्याध्यक्ष विजय कोंबे यांचेसह राज्य कार्यालयीन चिटणीस किशोर पाटील (रायगड) बैठकीत सहभागी झाले होते. कोकण विभागाचे शिक्षक आ.ज्ञानेश्वर म्हात्रे आ. मनीषा कायंदे यांचेसह शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव आबासाहेब कवळे, शिक्षण संचालक (प्राथमिक) शरद गोसावी, शिक्षण सहसंचालक (माध्यमिक) श्रीराम पानझडे, मंत्री महोदयांचे खाजगी सचिव,सुधीर राठोड, विशेष कार्य अधिकारी स्वप्निल बेगडे, शालेय शिक्षण विभागाचे अधिकारी,पंकज जाधव, प्रकाश काळे यांचेसह भाजपा शिक्षक आघाडीचे पदाधिकारी आणि महाराष्ट्र मुख्याध्यापक महामंडळाचे पदाधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती कडून- संचमान्यता १५ मार्च २०२४ चा शासन निर्णय रद्द केल्याशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा टिकू शकणार नाही, TET, शिक्षण सेवकांचे मानधन, उन्हाळी सुट्टी कालावधीतील विविध



प्रशिक्षणे रद्द करणे, विदर्भातील शाळा सुरू करण्याबाबत न्यायालयाच्या आदेशानुसार पालन करणे, जनगणनेच्या कामात सहभागी झालेल्या शिक्षकांना २०१० प्रमाणेच अर्जित रजा मिळणे, ऑनलाईन- ऑफलाईन शैक्षणिक व शैक्षणिक कामे बंद करणे, PAT, विषय पदवीधर शिक्षक वेतनश्रेणी, वेतन तृटी, वस्ती शाळा शिक्षकांना पूर्व लक्ष्यी प्रभावाने सेवाविषयक लाभ देणे, नपा-मनपा प्राथमिक शिक्षकांच्या वेतनासाठी स्वतंत्र वेतन पथक गठीत करणे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांना मिळणारे सादील अनुदान, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांसाठी डेस्क बेंच व आसनपट्ट्या पुरविणे, सर्व इयत्तांच्या सर्व विद्यार्थ्यांना विषय निहाय स्वाध्याय पुस्तिका शैक्षणिक क्षेत्राच्या सुरुवातीलाच देणे, त्रिस्तरीय वेतनश्रेणी ऐवजी १०-२०-३० सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करणे, आवश्यक विद्यार्थी संख्या असताना सुद्धा संच मान्यता त्रुटीमुळे व्यपगत झालेली शिक्षकांची पदे व समायोजन प्रक्रियेत एकवाक्यता इत्यादी विषय राज्याध्यक्ष विजय कोंबे यांनी बैठकीत चर्चेच्या वेळी उपस्थित केले.

संचमान्यता शासन निर्णयात आवश्यक दुरुस्ती व बदल तातडीने करण्यासाठी पावले उचलावीत, संच मान्यता त्रुटी दूर कराव्यात, उन्हाळी सुट्टी कालावधीतील प्रशिक्षणे रद्द करण्याबाबत आवश्यक निर्णय घ्यावा तसेच अन्य विषयानुषंगाने राज्य मंत्री महोदयांनी उपस्थित अधिकाऱ्यांना निर्देश दिले. तसेच इतर प्रश्नांबाबत यापूर्वी झालेल्या चर्चेच्या आधारे आजच्या बैठकीचा संदर्भ देऊन शिक्षण मंत्री ना. दादाजी भुसे यांच्याकडे अनुकूल प्रस्ताव सादर करावे अशाप्रकारचे निर्देश देण्यात आले.असे प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

जनमाध्यम एक प्रतिष्ठीत सवय



































